# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिती सभा दि. ०७/०२/२००८

**लालबहादुर शास्त्री स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला,**
दि. ०७/०२/२००८

आज गुरूवार दि. ०७/०२/२००८ रोजी स्थायी समितीची सभा सुचना क्र. ०९ दि. ०१/०२/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरिल विषयांवर विचार विनिमय करण्याकरिता लाल बहादुर शास्त्री, स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे सकाळी ११.०० आयोजित करण्यांत आलेली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी **मा. सभापती, श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स** हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ४) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ५) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ६) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ७) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ८) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| ११) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| १२) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| १३) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १४) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १५) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १६) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

**मा. सभापती सो. :-**

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४३ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४३, दि. १३/१२/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**मिलन म्हात्रे :-**

एकाच मिटींगची प्रोसिडींग का दिली? दोन मिटींगचे तरी द्यायला पाहिजे होते.

**नगरसचिव :-**

प्रोसिडींग तयार आहे. पुढच्या मिटींगला देतो.

**मिलन म्हात्रे :-**

एक दोन नंतर चार आणाल.

**नगरसचिव :-**

नाही. दोन दोन देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्याच्यामागे एक विषय होता. आपण तो पाणी कनेक्शन कट करणार होतो. ज्यांनी टॅक्स भरला नाही. आपण त्याची एक पॉलिसी ठरवली होती. त्याचे काय झाले? ते डिसक्शनला परत आले आहे का? आपण मागे ठरवले होते. ज्या लोकांनी टॅक्स भरला नाही. तर आपण त्या बिल्डिंगचे नळ कनेक्शन कापतो. मागच्या मा. स्टॅण्डींगमध्ये आपण असे ठरवलं होतं की, बिल्डिंगचे नळ कनेक्शन न कापता ते इंण्डीव्ह्यूजवल नळ कनेक्शन कापा. आणि त्याची प्रॉपर्टी सिल करा. असे आपले मागे ठरले होते. बरोबर आहे ना? श्री. बारकुंड साहेब आणि कर अधिकारी अजित पाटील साहेब गेल्या मा. स्टॅण्डींगच्या मिटींगला असे ठरले होते...

**मा. सभापती सो. :-**

ते नंतर घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याच्यामध्ये आहे. आहे त्या इतिवृत्तांतामध्ये ते आहे.

**शरद पाटील :-**

आढावाचे इतिवृत्तांत आहे. आणि आता त्यांनी दिलेले आहे. तेव्हापासून किती झालेला आहे. त्याचा काही खुलासा ह्याच्यात नाही.

**अजित पाटील (कर निर्धारक व संचालक ):-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. त्यावेळी ठरले होते की, तुम्ही त्याला इण्डीव्हयुजवल नोटीस द्या. त्यानंतर कापावी. दोन – तीन नोटीसा सगळ्यांना दिलेल्या आहेत. आमच्याकडे लिस्ट पण तयार आहे. आणि त्यांनी प्रयत्न करुन सुध्दा भरला नाही. आणि सील करण्याच्या दृष्टीने सीलही केलेले आहे. ॲक्च्युअल जे ते राहतात पण टॅक्स भरत नाही. अशा सोसायटींना दहा दिवसाची नोटीस द्या. असे ठरले होते. दोन वेळा सोसायटींना रिमांड दिले होते. तरी पण सोसायटींनी पैसे भरलेले नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, सोसायटी आणि इण्डीव्हयुजवल फ्लॅट नंबर ह्या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. समजा, एका बिल्डींगमध्ये ५० फ्लॅट आहेत आणि पाच फ्लॅटचे पाणी कनेक्शनचे टॅक्स त्या लोकांनी भरलेले नाही. मग तुम्ही त्यांचे पण कट करणार का? अख्या बिल्डींगच्या सोसायटयांचे नळ कनेक्शन कट करणार?

**अजित पाटील (कर निर्धारक व संचालक ):-**

५० टक्केच्या वर ज्यांनी भरलेले नाहीत. अशी आमच्याकडे लिस्ट तयार आहे. ५० ते ६० टक्के ज्यांनी भरले नाही. त्यांची आमच्याकडे लिस्ट तयार आहे...

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण साहेब, आपले असे ठरले होते की, इण्डीव्हयुजवल नळ कनेक्शन करा. सोसायटीचे नाही. असे ठरले होते.

**मा. सभापती :-**

इण्डीव्हयुजवल नळ कनेक्शन कुठे असते?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

टेरेसवरती असते.

**मा. सभापती :-**

मग ती सोसायटी कट करेल ना. आपण करु शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण आपण सोसायटीला अट्टाहास करु शकत नाही की, तुम्ही नळ कनेक्शन कट करा म्हणुन..

**अजित पाटील (कर निर्धारक व संचालक ):-**

आपल्याकडे कायद्यात तरतुद आहेत.....

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग तुम्ही प्रॉपर्टी सील करा.

**अजित पाटील (कर निर्धारक व संचालक ):-**

प्रॉपर्टी सील करता येईल. तरीपण ज्या ५० टक्के लोकांनी पैसे भरलेले नाही. अशा लोकांचीच आम्ही लिस्ट काढली आहे. पुर्वीप्रामणे आपण नळ कनेक्शन कापण्याचे त्याप्रमाणे कोण पैसे भरतच नाही आणि त्यांना दोन – दोन वेळा इंटीमेशन देउन जाहिर पण केलेले आहे. पर्सनल नोटीसाही दिलेल्या आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पसर्नल काही ऑब्जेक्शन आहे का

**ध्रवकिशोर पाटील :-**

साहेब, पसर्नल ऑब्जेक्शन नाही

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

कुठल्या व्यक्तीबाबत असे ऑब्जेक्शन आहे का ?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

असे असते की की, ७०टक्के, ८०टक्के लोक टॅक्स भरतात. तरीसुध्दा हौसिंग सोसायटीवर कम्पलशन करतात की तुम्ही आणखी भरा. परंतु, ते भरु शकत नाही. कारण की, ते इण्डीव्हयुजवल फ्लॅटवरच टॅक्स भरत नाही. आणि शिवाय मेंटनन्सही भरत नाही. मग अशा चार – पाच लोकांमुळे अख्ख्या बिल्डिंगला त्रास होतो. म्हणून हा प्रपोज मांडला आहे.

**अजित पाटील (कर निर्धारक व संचालक ):-**

१५ टक्के, २० टक्के बॅलेन्स राहिल ५० टक्के, ६० टक्के थकबाकीदार आहे. त्यांच्यावर कारवाई करतो.

**एस. ए. खान :-**

पण श्री. अजित पाटील साहेब, एका व्यक्तीचे ५० हजार रु, ६० हजार रु. बाकी आहे. इण्डीव्ह्युजवली त्याच्याविरुध्द काय कारवाई केली?

**अजित पाटील (कर निर्धारक व संचालक ):-**

ते सिल करण्याची प्रोसिजर चालु झाली आहे.

**एस. ए. खान :-**

सील कधी करणार? ६० हजार रु. चे, १ लाख रु. होईपर्यंत सील करणार का?

**अजित पाटील (कर निर्धारक व संचालक ):-**

मी तुम्हांला सांगतो, नगरपालिकेने जवळ जवळ ६६६ प्रॉपटर्या सील केलेले आहे.

**एस. ए. खान :-**

माझ्याकडे लिस्ट ओह. मी तुम्हांला दाखवतो.

**अजित पाटील (कर निर्धारक व संचालक ):-**

नगरपालिकेने ६६६ प्रॉपटर्या बद्दल सील केलेल्या प्रॉपर्टीचे व्हॅल्युएशन केल्याशिवाय.....

**एस. ए. खान :-**

पहिले माझे ऐकुन घ्या. एप्रिल, मे महिन्यामध्ये काम काही करत नाही. लोकांचे ६० - ७० हजार रु. बाकी आहेत.

**अजित पाटील (कर निर्धारक व संचालक ):-**

आता प्रोसेस चालु झाली. आहे. ६६६ प्रॉपटर्या......

**एस.ए.खान :-**

पुर्ण वर्ष काम करायचे नाही फक्त ४ महिने काम करायचे एवढे नक्कीच आहे.

**मा.सभापती :-**

आता हा विषय नाही. नंतर ज्यावेळी आढावा घ्यायचा आहे त्यावेळी आपण आढावा घेउ. इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**एस. ए. खान :-**

इतिवृत्तांमध्ये पान क्र. १३ मध्ये तो शब्द "इनलिगल" असा लिहला तर तो इललिगल आहे. मा. सभापती साहेब, ह्याच्यामध्ये आपण दिलेले होते. इललिगल बिल्डींग ना किती टॅक्स वगैरे आहे त्याची माहिती विचारलेली होती. मा. सभापती साहेब, ह्याच्यामध्ये आपण मागच्या मिटींगमध्ये विचारले होते की, किती इललिगल बिल्डीगंला टॅक्स वगैरे लावलेला आहे. त्याची माहिती पुढच्या सभेत देणार होते. टॅक्स बद्दल काय माहिती आहे का?

**मा.सभापती :-**

टॅक्स यह विषय जब लेंगे तभी बात करेंगे ना।

**मिलन म्हात्रे :-**

नगरसचिव साहेब, प्रत्येक ठिकाणी मा. आयुक्त लिहिलेले आहे. त्या मिटींगला अटेन्डन्स कोणाचे आहे? त्यात अधिका-यांची अटेन्डन्स का देत नाही? आमची जशी अटेन्डन्स आहे तशी अधिका-यांची अटेंन्डन्स आली पाहिजे. बायलॉज मध्ये वाचा.

**नगरसचिव :-**

इतिवृत्तांताला अधिका-यांची अटेन्डेन्स घेउ.

**मिलन म्हात्रे :-**

अधिका-यांची पण हजेरी आली पाहिजे. कूठल्या डिपार्टमेंट चा अधिकारी हजर आहे. गैरहजर आहे ते आम्हांला कळायला नको? आता ह्या सगळ्या मध्ये आयुक्त लिहिलेले आहे. मा. आयुक्त साहेब हजर आहेत का?

**नगरसचिव :-**

नाही मा. आयुक्ताच्यावतीने उपायुक्त......

**मिलन म्हात्रे :-**

नाही मग, आयुक्त कशाला लिहिता?

**नगरसचिव :-**

मा. आयुक्तांच्या वतीने उपायुक्त बसतात ना.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त, उपायुक्त आणि प्रभारी आयुक्त ह्यामध्ये फरक आहे. आहे ना?

**नगरसचिव :-**

त्यावेळी उपायुक्त बसले होते. मग उपायुक्त लिहु.

**मिलन म्हात्रे :-**

हा प्रश्न वळवु नका. ते आयुक्त आहेत का? नाही प्रभारी आयुक्त आहेत का? नाही कोण आहेत?

**नगरसचिव :-**

उपायुक्त आहे. पण मा. आयुक्तांच्या वतीने बसले होते.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त साहेब, कधीही स्टॅण्डींग चालवत नाही. एवढे मला आहे. बरोबर आहे? आयुक्त बसले तरी स्पेशल आयुक्तांचे काही विषय येतात काही बजेट वगैरे चे विषय येतात. त्याच्यातले मा. आयुक्त साहेब, बसातात. बरोबर आहे?

**नगरसचिव :-**

उपायुक्त म्हणुन लिहु.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही सगळीकडे आता आयुक्त असे लिहत चाललेले आहेत. मा. आयुतांचे पावर्स निराळे आहेत. ते काय बोलतात त्यांचे होते. बरोबर आहे ना.

**नगरसचिव :-**

दुरुस्ती करुन घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

श्री.खतगांवकर साहेब, ह्याच्यावरती तुमचे काय म्हणणे आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

ठिक आहे. त्यांचे म्हणणे आहे की, जर आयुक्त साहेब, असतील तर आयुक्त लिहा.

**नगरसचिव :-**

दुरुस्ती करुन घेतो.

**एस.ए.खान :-**

पान नं. २७ वरही इनलिगल आहे ते इललिगल करा.

(शानु गोहिल यांनी प्रकरण क्र. ४३ च्या ठरावाचे वाचन केले.)

**शानु गोहिल :-**

दि. १३/१२/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्या सुचनासह ते पण लिहा की, मा. सभापती साहेबांच्या रुलिंगवरती जी कार्यवाही करायची आहे त्या रुलिंगसह इतिवृत्तांत झाले. त्याच्यावरती काय रुलिंग झाल्या?

**मा. सभापती :-**

पाण्याचा आढावा घेतल्यानंतर आपण त्याच्यात रुलिंग करु.

**मिलन म्हात्रे :-**

तो ठराव आहे. त्याच्यामध्ये रुलिंगसह दिले आहे. तुम्ही रुलिंग दिले आहे. आता बघा. इतिवृत्तांत आपल्या कडे मंजुरीला आले बरोबर आहे. मागच्या काही ५ – ६ मिटींगतध्ये जे वादग्रस्त विषय आहेत. त्याची आपण ठराव मागवले. ते अजुन आलेले नाहीत.

**नगरसचिव :-**

दिले आहेत. जुन महिन्याचे ह्याचे सगळे ठराव दिले ना.

**मिलन म्हात्रे :-**

ते ठराव वाचुन बघा. किती आहेत?काय आहेत? माझ्याकडे सगळे काढलेले आहेत.

**नगरसचिव :-**

फक्त मिनिटस् चे ठराव सोडुन बाकी सगळे दिले आहे. मिनिटस् चे ठराव सोडुन बाकी सगळे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

काही गोष्टी बोलावेसे वाटत नाही.

**मा.सभापती :-**

इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४३ :-**

दि. १३/१२/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ३३ :-**

दि. १३/१२/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल.      अनुमोदक :- श्रीम. सुनिता पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४४ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४४, मा. आयुक्त सो., मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडील दि. ३०/०१/२००८ रोजीचे पत्र. मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या आरक्षित जागा (बगीचे, क्रिडांगण, शाळा) विकसीत करणेकामी दिलेल्या मंजुरीबाबत फेरविचार करणे. (मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ३० दि. २४/०१/२००८). हा मागील सभेचा संदर्भ आहे हे पत्र मा. आयुक्तांनीचे हे केल्याप्रमाणे आपल्यासाठी माहितीसाठी सभागृहात ठेवलेले आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, आता जो हा जागेचा विषय आलेला आहे. तर या जागेला नियमावली आहे का? आणि नियमावली जर असेल तर शासनाची मंजुरी आहे का? याचा पहिला खुलासा करावा.

**मा.सभापती :-**

शासनाने आता मंजुरी कळवलेला आहे ना.

**नयना म्हात्रे :-**

नाही. ती लेखी आहे का? त्याला शासनाची मंजुरी आहे का? शासनाची मंजुरी असेल तर ते आम्हांला सचिव साहेबांनी वाचुन दाखवावी. किंवा आम्हांला द्यावी. आम्हांला त्याच्यावर अभ्यास करु द्या. मा. सभापती साहेब, गेल्या वेळेला तो विषय एवढा गाजला ह्या विषयावर मतदान घेतले विषय तो तुमच्याकडे गेला. तुम्ही देखील त्यावर मतदान केल. आणि परत मा. आयुक्तसाहेबांना हा विषय दिलाच कसा काय?

**नगरसचिव :-**

मा. आयुक्तांनी हे पत्र आपल्याला दिले आहे.

**नयना म्हात्रे :-**

तुम्हांला काय पत्र दिले आहे? की हा विषय पर मा. स्टॅण्डिंगला घ्यावे म्हणुन.

**नगरसचिव :-**

पत्राखाली शेवटचे वाक्य आहे. ते बघा मा. स्थायी समितीला माहितीसाठी अवगत करावे असे पत्रात शेवटचे वाक्य आहे. संपुर्ण पत्र वाचुन दाखवु का?

**नयना म्हात्रे :-**

पत्र वाचुन दाखवा. म्हणजे गेल्या वेळेला आम्ही जो विषय मांडला. त्या मैदानाबद्दल विषय मांडला तो चुकीचा आहे का?

**मा. सभापती :-**

मैदान की गार्डन?

**नयना म्हात्रे :-**

मनुभाईचे मैदान आहे. तो विषय चुकीचा आहे का? आम्ही गेल्या वेळेला जो ठराव घेतला मतदान घेतले सगळा ठराव वाचला गेला. त्याला सुचक अनुमोदक दिले ते चुकीचे आहे का? आणि साहेब, तुम्हांला जर असे वाटत असेल की, त्याच्यावर फेरबदल विचार करावा...

**मा. सभापती :-**

मा. कमिश्नर साहेबांनी काहीही पाठवले आहे ते चुकीचे आहे का?

**नयना म्हात्रे :-**

मा. कमिश्नर साहेब काहीही देतील. साहेब मी तुम्हांला आता तुमच्या भाषेत विचारते की, गेल्या वेळेला ५० लिपीकांचा विषय काढलेला होता की, त्या ५० लिपीकांना परत ठेका पध्दतीने कामावर घ्या म्हणुन ती अद्यापपर्यंत पेपरला जाहिरात का आली नाही? मला त्याचे उत्तर द्या कारण श्री. आर.डी. शिंदे साहेबांचे म्हणणे असे स्पष्ट आहे की,तुमचे जे आयुक्त येतील ते निर्णय घेतील ते सह्या करतील ह्या श्री. आर.डी. शिंदे साहेबांना कोणी हक्क दिले की हे पेपर मा. स्टॅण्डिंगला द्यावे म्हणुन? मला सांगा त्यांना ते अधिकार नाही. हे अधिकार आहेत का? म्हणजे गेल्या वेळी आम्ही जे ठराव मांडले, मतदान झाले ते चुकीचे आहे का? साहेब, मला एवढेच बोलायचे आहे की, जर आपल्या मा.

आयुक्त साहेबांना वाटत असेल की,गेल्या वेळेला आम्ही ठराव केला त्या विषयाला मतदान केले आणि ते चुकीचे असेल तर आपण जे आता मैदान दिलेले आहे ते आपल्या नगरपालिकेच्या ताब्यामध्ये घ्या विषय मिटला. आपण, नगरपालिका ती चालवु. एखाद्या बिल्डरला ते द्यायचे आणि आपल्या महापालिकेचा काय बोर्ड वगैरे नाही, काही नाही. मग, त्या लोकांना कशाला ते मैदान दिले आपली महापालिका एवढी कमजोर आहे का?

**मा. सभापती :-**

आता मा. महासभा असेल तेव्हा मा. कमिश्नर साहेब असतील तेव्हा त्यांना हा प्रश्न विचारु या.

**नयना म्हात्रे :-**

मा. महासभेत आयुक्तांना प्रश्न विचारायचा, मा. महापौर साहेबांना प्रश्न विचारायचा आहे तर मग, तुम्ही हा विषय स्टॅण्डिंगला कशाला घेतला? आमच्याकडे चर्चा करण्याचा अधिकार आहे.

**मा. सभापती :-**

अधिकार आहे तर मग चर्चा करा.

**नयना म्हात्रे :-**

मी चर्चा करत आहे ना.

**मा. सभापती :-**

पण चर्चा करुन काय करणार? इकडे मा. कमिश्नर साहेब नाहीत.

**नयना म्हात्रे :-**

इकडे कमिश्नर साहेब नाहीत तर मग त्यांनी हा विषय दिलाच कसा?

**मा. सभापती :-**

त्यांनी लेटर पाठवलेले आहे.

**नयना म्हात्रे :-**

श्री. आर.डी.शिंदे साहेब, असे आहेत कोणाला राग आला तरी चालेल की, ते कातडी बचाव आहेत. त्यांनी त्यांचे हात सोडले आणि आमचे हात बांधायची सुरुवात केली आहे. गेल्या वेळेला जे मतदान झाले त्याच्यावर आम्ही मतदान केले. तोच ठराव बरोबर आहे. श्री. आर.डी.शिंदे साहेबांनी हे सगळे काम चुकीचे केलेले आहे. आम्ही कुठेतरी बांधीलकी होणार नाही, आम्ही कुठेही कोर्टात जाणार नाही. एखादा सामान्य माणुस कोर्टात गेला तर आम्ही कोर्टात कशाला फेऱ्या मारु? आमच्या कडे तेवढा वेळ नाही. मिटींगला आपण एवढे विषय घेतो परत त्यावर फेरबदल विचार करा. त्याच्यावर कशासाठी विचार करा. म्हणजे एखादा माणुस वकिलाकडे जातो, त्याचा तेवढा वेळ घालवतो सगळे काही करतो मग आयुक्त साहेब परत आपल्याला अशी भाषा शिकवतात का?

**नगरसचिव :-**

मी पत्र वाचुन दाखवतो.

**मिलन म्हात्रे :-**

पहिले वरचे वाचा.

**नगरसचिव :-**

कल्याण - डोबिंवली महानगरपालिका जावक......

**मिलन म्हात्रे :-**

काय संबध आहे? प्रभारी कुठले आहेत? मिरा - भाईंदर महानगरपालिकेत आहे. बिल्डींगच्या एन.ओ.सी कुठल्या देतात?

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदरच्या......

**मिलन म्हात्रे :-**

बिल्डींगची एन.ओ.सी द्यायला मिरा भाईंदर महानगरपालिका आहे. के.डी.एम चा शिक्का मारतात का? कल्याण डोबिंवलीचे लेटर आमच्या महापालिकेला वापरण्याचा काय अधिकार आहे? इथुन सुरुवात होते. वरुन वाचा. रेकॉर्डवर येउ द्या.

**नगरसचिव :-**

कल्याण - डोबिंवली महानगरपालिका जा.क्र./कंडोम/मनपा/आयुक्त - पी.ए. मा. आयुक्त यांचे कार्यालय कल्याण - ४०१ ३०१.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त पी.ए. - ० लिहा. पुढे बोला.

**नगरसचिव :-**

मा. आयुक्त यांचे कार्यालय, कल्याण - ४०१ ३०१, जिल्हा - ठाणे, कार्यालय २२० ४०६५ व फॅक्स - ०२५१२२०५८५८ दि. - ३०/१/२००८ प्रभारी आयुक्त मिरा - भाईंदर महानगरपालिका कॅम्प कल्याण जावक क्रमांक मिरा - भाईंदर मनपा - आयुक्त १९९ - ७०८ दि. ३०/१/२००८. प्रति, नगरसचिव मिरा भाईंदर महानगरपालिका विषय :-

मिरा - भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेला आरक्षित जागा बगीचे, क्रिडांगणे व शाळा विकसीत करणे कामी दिलेल्या ..

**मिलन म्हात्रे :-**

कल्याण – डोबिंवली महानगरपालिकेचे पत्रसुध्दा ३०/१/२००८ चे आहे. प्रभारी आयुक्त मिरा - भाईंदर महानगरपालिका कॅम्प कल्याण ही महानगरपालिका कल्याणला कुठे गेली? जावक क्र. मिरा - भाईंदर परत खाली आले. बरोबर आहे ना? पुढे वाचा श्री. आर. डी. शिंदे साहेबांचे डेसींगनेशन पण वाचा. ते सगळे रेकॉर्डवरती येउ द्या.

(नगरसचिवांनी पत्राचे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

संदर्भिय पत्रान्वये मा. नगरसेवक श्री. मिलन वसंत म्हात्रे यांनी दि. २४/०१/२००८ रोजी संपन्न झालेल्या मा. स्थायी समितीच्या सभेतील प्रकरण क्र. ४०, ठराव क्र. ३० च्या अनुषंगाने महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्तांनी दि. १८/०७/२००७ व दि. ३१/०७/२००७ रोजी केलेले करारनामे रद्द करुन संबंधीत पदाधिकारी व अधिकारी यांची सखोल चौकशी करुन कायदेशीर कारवाई करणेबाबत कळविलेले आहे.

मंजुर विकास योजनेतील शाळा/क्रिडांगणे/बगीचे विकसित करण्यासाठी मा. महासभेने ठराव क्र. ७२, दि. २१/१२/२००६ अन्वये महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या आरक्षित जागा खाजगी विकासकांमार्फत / सेवाभावी संस्थामार्फत भाडेतत्वाने विकसित करण्यासाठी महानगरपालिकेच्या हिताच्या अटीशर्ती ठरवून व निविदा मागवून तसेच प्रस्ताव गठीत केलेल्या समिती समोर ठेवून निर्णय घेण्यास मंजुरी दिलेली आहे.

चार प्रस्तावांच्या निविदा सुचनांना दि. १२/५/२००७ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्दी देवून समितीच्या बैठकीनंतर स्थायी समिती ठराव क्र. ६० (अ), दि. १५/६/२००७ नुसार आ.क्र. ९६ (क्रिडांगण), मे. श्री.जी. एक्झीबीटर, यांची जास्तीची निविदा (रु. १०/- लाख प्रतिवर्ष), आ.क्र. ११६ (प्राथमिक शाळा व खेळ मैदान) मे. अमरदीप शिक्षण संस्था यांची निविदा (रु. ३.३३ लाख प्रतिवर्ष), आ.क्र. १६१ (प्राथमिक शाळा व खेळ मैदान) मे. दिपक चॅरिटेबल ट्रस्ट यांची जास्तीची निविदा (रु. १०/- लाख प्रतिवर्ष), आ.क्र. ३०० (खेळाचे मैदान) मे. गुजरात एंटरप्रायजेस यांची जास्तीची निविदा (रु. २१/- लाख प्रतिवर्ष) मंजुर झालेली आहे.

वरील चारपैकी दोन प्रस्तावाचें जागांचे भाड्यांचे करारनामे मे. श्री.जी. एक्झीबीटर व मे. दिपक चॅरिटेबल ट्रस्ट यांचेसोबत अनुक्रमे दि. ३१/७/२००७ व दि. १८/७/२००७ रोजी दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणी होवून त्यासाठी मुद्रांक शुल्क अनुक्रमे रु. १६.७० लाख व रु. ९.३३ लाख शासनास जमा झालेली आहे. तसेच या दोन प्रस्तावापोटी महानगरपालिकेस वार्षिक रु. २०/- लाख भाडे मिळणार असून त्यापैकी चालू आर्थिक वर्षात रु. १०/- लाखाचा भरणा झालेला आहे.

शहराची विकास योजना मंजुर होवून सुमारे ११ वर्षाचा कालावधी लोटलेला असून आरक्षणे विकसित करणेसाठी महानगरपालिकेने BOT तत्वावर उचललेले पाउल अत्यंत योग्य असुन यानुसार खालीलप्रमाणे फायदे होणार आहेत.

१. आरक्षण विकासापोटी महानगरपालिकेस काहीही खर्च येणार नाही.
२. आरक्षित जमिनीवर अतिक्रमणे होणार नाहीत.
३. वार्षिक भाड्यापोटी महानगरपालिकेस उत्पन्नात वाढ होईल.
४. सदर सुखसुविधा नागरीकांना लवकरात लवकर उपलब्ध होतील.
५. विकास योजनेसाठी जलदगतीने व परिणामकारक अंमलबजावणी.
६. महानगरपालिकेला देखभालीचा खर्च होणार नाही.
७. जागांची मालकी महानगरपालिकेचीच असेल.

मा. स्थायी समितीने दि. २४/०१/२००८ रोजी पारित केलेल्या ठराव क्र. ३० बाबत परिच्छेदनिहाय अभिप्राय खालीलप्रमाणे.

१. ठरावात मंजुर केलेल्या निविदा कायदेशीर असून त्यात संपूर्ण पारदर्शकता अवलंबविण्यात आलेली आहे व त्यात महानगरपालिकेचे हितच पाहिल्याचे दिसते.
२. सदर कृत्य कायदेशीर असल्यामुळे या प्रक्रीयेत ज्या अधिकारी, पदाधिकारी व संबंधितांनी भाग घेतलेला आहे त्यांची खातेनिहाय चौकशी करुन त्यानंतर त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
३. मा. स्थायी समिती मंजुरीनंतर कार्यादेश दिलेले असून त्यातील अटीशर्तीनुसार करारनामा करावयाचा आहे. परिच्छेद क्र. २३ मध्ये आयुक्तांची पुर्वपरवानगीनुसार असे नमुद असून भविष्यात त्या त्या वेळी निर्णय घेणे शक्य आहे.

   आ. क्र. ९६ खालील ६००० चौ.मी. जागा खाजगी मालकीची असून मालकाने जागा ७/१२ उतान्यावर महानगरपालिकेच्या नावे केल्यानंतरच बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. सबब वास्तुविशारदांचे नाव काळ्या यादीत टाकणे संयुक्तिक होणार नाही.

४. सदर कागदपत्रे तपासूनच करारनामे केलेले आहेत. सर्व करारनामे अधिनियमातील तरतुदीनुसार आयुक्तांनीच करावयाचे आहेत.

५. दि. १८/७/२००७ व दि. ३१/७/२००७ रोजीचे करारनामे रद्द करण्याची आवश्यकता नसून आजपर्यंत महानगरपालिकेचे कुठलेही आर्थिक नुकसान झालेले नसून आर्थिक फायदाच झालेला असून, यात चौकशी करण्याची आवश्यकता वाटत नाही. तसेच जबाबदार अधिकारी यांचेकडून व्यक्तीशः वसुल करण्याची व आजमितीस पदावर असलेल्या अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करण्याची आवश्यकता वाटत नाही.

मा. स्थायी समिती ठराव क्र. ३०, दि. २४/०१/२००८ चे अवलोकन करता सदर ठराव अत्यंत संदिग्ध व मोघम स्वरुपाचा आहे. सदर प्रकल्प BOT तत्वावर दिल्याने महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे किंवा भविष्यात होणार आहे ही बाब पूर्णपणे निराधार आहे. या उलट पूर्वी झालेला निर्णय लोकाभिमुख व महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा आहे. असे कागदपत्रांच्या पाहणीवरुन दिसते.

क्रिडांगणासारखे आरक्षण व स्वखर्चाने विकसित करुन त्याची देखभाल करणे व विनामुल्य नागरीकांना उपलब्ध करणे शिवाय महानगरपालिकेला वार्षिक भाडे रु. १०/- लाख देणे ही बाब निश्चितपणे वैशिष्टपुर्ण व प्रशंसनीय आहे.

एकंदर प्रक्रियेचे अवलोकन करता तत्कालीन मा. महासभेचा ठराव व त्यास अनुसरुन महासभेने नियुक्त केलेल्या समितीने घेतलेला निर्णय व त्यास तत्कालीन स्थायी समितीने दिलेली मंजुरी, निविदांची प्रसिध्दी व झालेले करार यात संपूर्णपणे पारदर्शकता असून शंका घेण्यास वाव आहे असे वाटत नाही. विद्यमान स्थायी समितीने सदर करारनामा रद्द करण्याचा घेतलेल्या निर्णयाचे अवलोकन करता त्यातील बहुतांश सन्माननीय सदस्य तत्कालीन महासभेने घेतलेल्या ठरावाच्या प्रक्रीयेत सहभागी होते.

सद्यस्थितीत दोन प्रकल्पांचे कार्यादेश देवून करारनामे झालेली आहेत अशा परिस्थितीत ठराव क्र. ३० ची अंमलबजावणी केल्याने महानगरपालिकेसारख्या लोकशाही संस्थेच्या विश्वासर्हतेला तडा बसेल व कायदेशीर गुंतागुंत निर्माण होईल. प्रथमदर्शनी सदर ठराव करणेसाठी कोणतेही संयुक्तीक कारण दिसून येत नाही केवळ काल्पनिक भितीच्या आधारे पूर्वीच्या प्राधिकरणाने केलेला ठराव रद्द करण्यामुळे महापालिकेत घातक प्रथा पडेल व ते महापालिकेच्या व्यापक हिताच्या दृष्टीने योग्य होणार नाही. तसेच या पुढील लोकहितकारक अशा कोणत्यही प्रकल्पास जनतेकडून भितीपोटी प्रतिसाद मिळणार नाही. समोरील पक्षाला कुठलीही संधी न देता असा ठराव करणे नैसर्गिक न्यायाला धरुन होणार नसल्याने कायदेशीर नाही. सदर बाब विचारात घेता या ठरावाची अंमलबजावणी करणे शक्य होणार नाही. तसेच सदर प्रकरणातील गुणवत्ता व पारदर्शकता पाहता तसे आवश्यकही वाटत नाही.

तरी उपरोक्त वस्तुस्थिती मा. स्थायी समिती समोर मांडावी ही विनंती.

**मिलन म्हात्रे :-**

हे मा. आयुक्त साहेबांचे मत आहे. की काय आहे? हे पत्र म्हणजे आयुंक्ताचे मत आहे असे आम्ही समजायचे का?

**नयना म्हात्रे :-**

मी तर सांगते हे, मा. आयुक्त साहेबांचे मत नाही. आयुक्त साहेब ह्या सगळ्या अधिकाऱ्यांना वाचवण्याचे काम करतात.

**मिलन म्हात्रे :-**

मी प्रश्न विचारला आहे की, हे मा. आयुक्तांचे मत आहे की काय आहे? नियम दाखवले आहे, मत दाखवले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

ठरावाच्या अनुषंगाने त्यांचे अभिप्राय आहेत म्हणजे.....

**मिलन म्हात्रे :-**

अभिप्राय आहे. मत आहे, काय आहे?

**नगरसचिव :-**

ठराव क्र. ३० चा जो ठराव झाला. त्या ठरावाच्या अनुंषगाने लिहिलेले त्यांचे अभिप्राय आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही त्यांचे मत समजायचे का?

**नगरसचिव :-**

त्यांचे अभिप्राय समजायचे.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव वगैरे काय तुम्ही आणले आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नगरसचिव साहेब, ह्याच्यामध्ये असे म्हटले आहे बघा. की, ह्या ठरावाची अमंलबजावणी करणे शक्य होणार नाही. ह्याच्या अर्थ त्यांनी तो ठराव रद्द केलेला आहे.

**नगरसचिव :-**

त्यांचे त्यांनी ते अभिप्राय दिलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठराव रद्द केला आहे म्हणुन असे त्यांनी दाखवलेले आहे.

**नगरसचिव :-**

पत्राचा आशय आहे ना. तो संपुर्ण अभिप्राय झाला.

**मिलन म्हात्रे :-**

विषयाला बगल देवु नका. ठराव रद्द झाला आहे. का नाही? हा ठराव जिवत आहे किंवा मा. आयुक्तांनी त्यांच्या पावरमध्ये रद्द केलेला आहे? आम्ही काय समजायचं?

**नगरसचिव :-**

ह्याच्यात कुठेही ४५१ कलमाचा उल्लेख दिसत नाही. पत्रात स्पष्ट असे कुठे दिसत नाही. फक्त अभिप्राय दिले आहे ४५१ कलम लावणे.....

**मिलन म्हात्रे :-**

हे जे मा. आयुक्तांनी पत्र दिलेले आहे. वरती आय.एस म्हणजे भा. प्र. वगैरे आयुक्तांनी लिहिलेले आहे.ज्या आयुक्त साहेबांनी आम्हांला पत्र देउन शहाणपण शिकवलेले आहे त्यांनी त्यांची कारर्किर्द चो-या मा-या करण्यात घालवली आहे. हे रेकॉर्डला येउ दे. महापालिकेमध्ये, त्यांच्या कारकिर्दीमध्ये जेवढी अनधिकृत बांधकाम झाली. त्याला सर्वस्वी श्री. आर.डी.शिंदे हे जिम्मेदार होते. त्यांनी ह्या महापालिकेच्या आर्थिक विकासाच्या उन्नतीच्या गोष्टी करु नये. ह्या महापालिकेमधली सद्य परिस्थितीतले आरक्षण विकायचे काय. श्री. आर.डी.शिंदे यांनी केलेले आहे. त्याचे प्रमाण विधान परिषदेच्या सभागृहामध्ये सिध्द झालेले आहे. ह्या राज्याचे मा. मुख्यमंत्री मा. श्री. विलासराव देशमुख ह्यांनी ह्याच अधिका-यावरती विधानसभेमध्ये चौकशी सुरु केलेली आहे. त्यावेळेचे आयुक्त विद्यमान श्री. सुदामराव गायकवाड आणि तत्कालीन आयुक्त श्री. आर.डी.शिंदे सुध्दा चोरांनी उलटया बोंब्या मारायच्या नाहीत. ज्यांनी इथे चो-या - मा-या केल्या. आमचे शहर लुटले, महापालिकेला फसवले, ठकवले. अशा अधिका-यांनी आम्हांला शिकवायचे नाही. त्यांची लायकी सुध्दा नाही. कोण त्यांचे खबरी असतील तर त्यांनी त्यांना जाउन सांगावे आता मोबाईलवर सांगावे मला एक बरे वाटते. ह्या अगोदर मला जी काही न्यायालयीन लढाई लढायचे आहे. त्यामध्ये सन्मा. आर.डी.शिंदे त्या रिंगेत नव्हते. पण आता आमचा एक प्रतिवादी वाढला आहे. त्याला कारण असे आहे की, त्या मोहिनीमुळे असे ते जे काही प्रभावित झाले की मी मांडलेल्या ठरावावर, प्रकरण दोन होती. पण त्या मनुभाईच्या टाकलेल्या मोहिनीमुळे आमच्या कमिश्नर साहेबांना अशी नशा चढली. की, त्यांना फक्त एकच रिझर्व्हेशन दिसायला लागले. आम्हांला तारे अनेक दिसतात. जसे शुक्र दिसतो. वगैरे तसे त्यांना फक्त मनुभाईच दिसत होता. ते आंधळे झालेले आहेत. आज आयुक्तांनी हे जे पत्र दिलेले आहे. नियमानुसार ह्या महापालिकेच्या कायद्यानुसार त्यांना हे देण्याचा अधिकार नाही. आयुक्तांनी कुठेही सेक्शन दिलेले नाही. जे इकडेच प्रशासनाचे अधिकारी आहेत. त्यांना पहिले कायदे सांगायचे मी, मिरा - भाईंदर महानगरपालिकेचा प्रभारी आयुक्त आहे. मला अमुक - अमुक कायद्यानुसार प्रदान केलेल्या ह्या कलमानुसार मी हे पत्र लिहीत आहे. हे पहिले आले पाहिजे? त्यांना ह्या नियमानुसार कुठला अधिकार आहे? ते त्यांनी पहिल्याच लाईनमध्ये दिला पाहिजे मागच्या कमिशनरने काय खाल्ले, काय केले सोडुन द्या. पण कुठेतरी जे काही चोरामा-याचे धंदे आहेत. ह्या पुढच्या ५ वर्षात आम्ही सगळे काढणार आहोत आणि नुसती ही सभागृह नाही किंवा अस्मेबली सुध्दा नाही. भरपुर मार्ग असतात. एक मात्र आहे की, ज्यावेळेला पडझड होते. त्यावेळेला कोणी चिरेबंदी वाड्याचे बुरुज असे ते वाड्याचे बुरूज कोसळायला लागतात. तेव्हा कोणी हातभार लावायला येत नाही. एवढे सांगुन ठेवतो. याअगोदर आम्ही बुरूज कोसळलेले आहेत. एक लक्षात घ्या. ह्या ठरावामध्ये फक्त एकच त्यांनी मेंशन केले आहे. मी अगोदर बोललो की, त्यांनी सेक्शन वगैरे काही लिहिलेले नाही. आज आरक्षण क्रमांक ११६ मा. आयुक्तांनी या प्रकरणामध्ये काय बघितले? अधिका-यांनी रात्री त्यांच्याकडे खुष-मस्करी केली, फोन वगैरे झाले असतील मी त्यांच्या बंगल्यावर गेलो. २४/१ चे माझे पत्र मी त्यांच्या बंगल्यावर दिलेले आहे. आमचे कर्तव्य दक्ष आयुक्त माझ्या अंगावर आले मा. स्टँडींगने एक ठराव केला आहे. तुम्ही दुसरा केला असे व्हायला लागले तर आम्ही कामकाज कसे चालवायचे? उद्या सभागृह आख्ख विकून काढतील, बिल्डींग विकून काढतील. काढण्यातच जमा आहे. काही राहिलेले नाही. मी फक्त टेस्ट घ्यायला गेलो होतो. माझी सवय आहे की, आपण केल्यानंतर समोरच्या माणसाचा लूक त्याच्याशिवाय कळत नाही. की त्यांची आता तयारी कितपर्यंत चालली आहे. ते करायला गेलो होतो मा. आयुक्तांनी लॉ पॉईंटवर बोलायचे सोडून दिले की सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, अमुक अमुक सेक्शन नुसार तुमचा ठराव बेकायदेशिर आहे. शासनाच्या पॉवर्स त्यांनी हातात घेउन मा. स्टँडींगला हे पत्र द्यायचे कलम ४५१ हे कशासाठी ठेवले आहे? मा. स्थायी समितीचा कुठलाही ठराव त्यांना जर अयोग्य वाटत असेल, तर ४५१ त्यांच्याकडे लार्जर पावर्स आहेत. त्यांनी स्टेट गर्व्हनमेंटकडे जावे. स्टेट गव्हर्नमेंट कडे काय सेटींग लावायचे ते लावा. गंगा ए च्या मॅटरमध्ये त्याही आणून लावल्या. तेव्हा श्री. आर. डी. शिंदेच होते. गंगा ए च्या प्रकरणामध्ये १२ एकर प्रॉपर्टी त्याला फुकुन काढली होती. २८ नगरसेवकांचा तो ठराव झाला होता. मिलन म्हात्रे नी तक्रार करून तो रद्द करून आणला. मा. आयुक्तांनी तो आणला नाही. त्यांनी आम्हाला विकासाच्या गोष्टी शिकवून नये. माझ्या वॉर्डमध्ये भिमराव चव्हाण सारख्या बिल्डरला त्यावेळेला मार्केटचे आरक्षण ४० लाख रू. ला विकले. चो-यामा-या करतात त्याला प्रमाण आहे. मा. आयुक्तांचे आदेश आहेत. त्यावर कागदे रंगले आहेत. त्याच्यावर सह्या झालेल्या आहेत. आज मार्केट सारखे महत्वाचे रिझर्व्हेशन अर्ध्या टक्क्याने जेव्हा मा. आयुक्त विकतात. त्यावेळेला आम्ही नगरसेवक असुन सुद्धा त्यांना पत्रव्यवहार करतो की, साहेब हे करू नका. भिमराव चव्हाण मध्ये ६८ नंबरचा

मार्केटचा प्लॉट जो रिझर्व्हेशन आहे. मागच्या प्लॉटला त्यांनी एक्सेस होण्यासाठी आपल्या अधिका-याच्या बाहेर लावून महासभेचे पावर्स वापरून ते आरक्षण कमी केल. त्या आरक्षणाचा डेफिनेशन चेंज केल. स्टेट गव्हर्नमेंटच्या ३७/१ च्या पावर्स आयुक्तांनी त्यावेळेला कुठल्या आधाराने वापरले ते मला टाउन प्लानींगच्या अधिका-याने सांगावे.

**मा. साभापती :-**

तुम्ही हा एकच विषय घेता.

**मिलन म्हात्रे :-**

डोन्ट डिस्टर्ब मा. आयुक्तांनी हे पत्र देउन तुमच्या आणि आमच्या सगळ्यांच्या अधिकाराला आव्हान केले आहे. आज दिवसभर आम्ही स्टँडींग चालवणार.

**मा. साभापती :-**

पण ज्या बाबतीत अव्हान केले आहे त्या विषयाला पकडून बोला ना.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी आज आता फक्त ऐकायचे आहे. नाहीतर बाकीच्यांकडे कोणाकडे असेल तर त्यांनी ऐकवायचे आहे. आम्ही नाही ऐकू हे कोण आयुक्त आहेत. सगळ्यांनी चो-यामा-या करायच्या......

**मा. साभापती :-**

तुम्ही कोर्टात जा. काय करायचे ते करा.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या सभागृहातील आणण्याचे पत्र जर तुम्ही ऐक्सेप्ट केले नसते त्याचवेळेला तुम्ही जर आयुक्तांना सांगितले असते. तर हा विषयही इथे आला नसता आणि चर्चाही झाली नसती तो विषय तिकडेच थांबला असता. कोण कुठचे अधिकारी जातील? आज पेपरला १५ दिवस बातम्या येत आहेत. कुठल्या महासभेचे आम्ही अधिकार वापरले? कुठल्या महासभेचा ठराव आम्ही रद्द केला आहे? तुमचे पी.आर.ए. सेक्शन फक्त पेपरचे कटींग कापते. त्यांना दुसरा उद्योग नाही. त्याचे क्लेरीफिकेशन कोण देणार? ही चावडी नाही इथे काहीतरी नियम असतात. अधिका-यांनी मॅनेज करून वाटेल तशा बातम्या द्यायच्या. पत्रकारानी बातम्या छापायच्या बाहेर आम्हाला लोकांनी विचारायचे तुम्ही महासभेचे अधिकार घेतलेत. कुठल्या महासभेचा ठराव आपण रद्द केलेला आहे? काही वाटेल तशा बातम्या ह्या बातम्यावरती सुद्धा कंट्रोल आम्हाला बरोबर ठेवता येते. आम्ही अजुन सक्रीय म्हणजे म्हणतात ना, ते व्यवस्थित रेन्टॉल चे राजकारण सुरू केलेले नाही. अधिकारी बसून बातम्या देत आहेत. त्यांच्यामध्ये बिल्डरला रस्ता दिलेला आहे. तीन टॉवरला त्यांनी एक्सेस वे दिला तुमचे अधिकार सभागृहाने त्याच श्री. आर. डी. शिंदे नी घेतलेले आहे आणि तेच प्रकरण विधानसभेत गाजले. आज जस्टीस न्यायमुर्ती आग्यास्वामीनी समोर हा अधिकारी आरोपी म्हणून उभा राहतो. त्यांची चौकशी चालू आहे. कल्याण डोंबिवली तूट खाल्ली म्हणून. उल्हासनगरचे प्रकरण बाहेर निघाले आहेत. हायकोर्टामध्ये जाउन हातावर हात ठेवून तिकडे दिवसभर उभे असतात. जजेस लोकांकडे कोर्टामध्ये दिवस जातात त्यांनी हित कुठच्या ठिकाणी हे त्यांनी शिकवू नये. त्यांनी जास्त भानगडी करतील तर मी ह्यांचे शंभर प्रकरण काढीन. ऍज पर सेक्शन ने केलेले आहे. अधिका-यांनी त्यात मत मांडावे. श्री. घेवारे साहेब, त्या ॲग्रीमेंटमध्ये मा. महासभेने जो ठराव केला. आणि जी कमिटी नेमली त्याची कागदपत्र आपण पटलावर ठेवा.

**नयना म्हात्रे :-**

आणि साहेब, ते मैदान कसे आहे ते माहित आहे का? ते असे सरळ आहे तर त्यांनी वाकडे दिले आहे. तुम्ही प्लॅनमध्ये बघा ते कसे आहे. त्या मनुभाईची एवढी हिम्मत. तुम्ही जाउन तिकडे बघा आपल्या पालिकेचा एकतरी बोर्ड तिकडे लावले आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

त्या कमिटीचा आम्हाला रिपोर्ट पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

हा मागच्या वेळेस दिला होता ना?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, नाही. त्यावेळी चर्चामध्ये मी पण होतो. ज्या दिवशी ह्या निविदा हे मंजुरीला आले त्याचे इतिवृत्तांत, ज्या कमिटी नेमलेल्या आहेत. त्या कमिटीचे अहवाल.....

**मिलन म्हात्रे :-**

लेखी मागितले होते पण डिपार्टमेंट कडून १५ दिवस झाले मिळत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मला पण अजुनपर्यंत दिलेले नाही. माझ्याकडे मी लिहून ठेवलेले आहे. म्हणून साहेबांनी हे रूलिंग दिले आहे. त्यावेळी हे रूलिंग दिलेले आहे की, इतिवृत्तांत देताना त्या मिटींगच्या इतिवृत्तांत द्यायच्या ज्या मिटींगमध्ये निविदा पास झालेली आहे. त्या मिटींगचे इतिवृत्तांत द्यायच्या मी पत्रही पाठवलेले आहे. नगररचनेला पत्र पाठवले होते. नगररचना विभाग काय सांगितले की, इतिवृत्तांत नगरसचिवांकडे मिळेल.

**नगरसचिव :-**

मला एक क्लिअर करू द्या. त्या समितीचा मी सचिव म्हणून नसतो. म्हणून त्या इतिवृत्तांताशी माझा संबंध येणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी नगररचनेकडे मागितले होते कारण आम्हाला पण त्या भुमिकेत जायचे असते. श्री. खतगांवकर साहेब, त्यावेळेस आमचे पण दोन सदस्य होते. त्या सदस्यांनी काय भुमिका मांडली ते आम्हाला माहित पडले पाहिजे होते. नगररचनेला पत्र दिले. माहितीच्या अधिकाराने पत्र दिले होते. त्यांनी उत्तर दिले. त्यांनी बाकीचे १,२,३,४ जे उत्तर दिले. ह्याचे इतिवृत्तांत तुम्ही सचिवांकडे मागा आणि खरोखर त्या इतिवृत्तांताची कॉपी त्या नगररचनेकडे त्या ठरावाबरोबर असली पाहिजे. संपुर्ण त्या ठरावाची जेवढी प्रोसिडींग आहे ती ठरावाच्या मागे लावली पाहिजे होती. त्यांनी मला उत्तर दिले की, माझ्याकडे नाही आणि आता ह्या विषयावर हाच मुद्दा आहे की, मा. आयुक्त साहेबांनी जे दिलेले आहे. त्यात एकतर कलमाचा कुठेही उल्लेख केलेला नाही. मी हा ठराव रद्द केला आहे म्हणून समजायचा? किंवा फक्त तुमच्या अवलोकनासाठी ठेवला आहे तसे समजायचा? उद्या ह्याचा अर्थ असाही झाला ह्यामध्ये अनेक पॅरेग्राफमध्ये मार्कींग केलेले आहे. शेवटच्या फक्त दोन ओळी वाचतोय.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, जरा त्या कमिटीचे रिपोर्ट बघा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

रिपोर्ट आणलेला आहे.

**नयना म्हात्रे :-**

त्या कमिटीने असा निर्णय घेतला की फक्त मा. आयुक्तांना ते पॉवर नंतर आणि आता असा विषय आला आहे. त्याला जर भाड्याने द्यायचे असेल तर त्याला प्रभाग समितीच्या अध्यक्षांना विचारून पण देउ शकतो. किती ठिकाणी नावे येतात. एका ठिकाणी मा. आयुक्ताचे नाव घेतात. एका ठिकाणी प्रभाग समितीच्या अध्यक्षाचे नाव घेतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणून आता जो हे पत्र ठेवलेले आहे. म्हणजे अवलोकनात ठेवलेले आहे. मग अवलोकनात झाले. जर त्यांचे असे म्हणणे असेल की, ठराव रद्द झाला आहे तर त्यांनी सेक्शनचा उल्लेख करून त्या पद्धतीने केले पाहिजे. आणि शेवटची दोन लाईन मी वाचतोय. समोरील पक्षाला कुठलीही संधी न देता असा ठराव करणे नैसर्गिक न्यायाला धरून होणार नसल्याने कायदेशिर नाही. आम्ही कुठे बोललो? आम्ही हा ठराव मा. स्थायी समितीमध्ये अधिका-यांनी चुक केलेली आहे म्हणून आम्ही हा ठराव रद्द केलेला आहे. तुम्हाला वाटते की, हा ठराव बेकायदेशिर आहे, चुकीचे आहे. तुम्ही त्यांचे म्हणणे ऐकुन घ्या. ह्या दिवशी ह्या विकासकर्त्यांला आम्ही बोलावले आहे. त्याची गा-हाणी ऐकलेली आहे. त्याच्याकडे पुरावे आहे. नंतर दिले पाहिजे ना. म्हणून हा ठराव आम्ही रद्द समजला पाहिजे की, फक्त अवलोकनात आहे असे समजायला पाहिजे? ह्याचे काय आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

सन्मा. आयुक्तांनी मागच्या मा. स्थायी समिती मध्ये जो ठराव झाला होता. आणि सन्मा. सदस्यांनी त्यांना लेखी पत्र सुद्धा दिले होते. त्या अनुषंगाने मा. आयुक्तांकडे काही पत्रव्यवहार केलेला आहे. त्या सर्व बाबी विचारात घेउन मा. आयुक्तांनी दि. ३०/०१/२००८ च्यापत्रान्वये सचिवांना त्यांचे अभिप्राय कळविले आहे. अजुन ह्या ठरावाबाबत आयुक्तांनी हा ठराव रद्द करण्याची प्रोसिडींग केलेली नाही. आणि त्याबाबत यथावकाश पुढील जी कार्यवाही होईल ते सभागृहाच्या निदर्शनास आणलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेबांना ते पावर आहेत का? आम्हाला ते पाहिजे. मी सेक्शन सांगतो ना......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

आज हा ठराव रद्द करण्यासाठीचा प्रस्ताव नाही.

**मिलन म्हात्रे :-**

हे फेरविचारासाठी ठेवायचे आहे, असे बोलण्याचा अधिकारसुद्धा मा. आयुक्त साहेबांकडे आहे का? तुम्ही सेक्शननीस सांगा. मी सेक्शन सांगातोय. माझ्याकडे सेक्शन आहेत. तुम्ही सेक्शनवाईज बोलायचे. मा. आयुक्तांनी हे पत्र कुठल्या सेक्शनने ह्या मा. स्थायी समितीपुढे आणले आहे. मला फक्त सेक्शन सांगा माझ्याकडे पुस्तक आहे. मी सांगतो. बाकीचे काही बोलू नका. साहेब, एक लक्षात घ्या अभिप्राय कुठचे आहे? अधिकार त्यांनी वापरले आहे. आम्हाला सेक्शन पाहिजे. लॉ ऑफिसरने ते ओपन करावे. नंतर मी सांगतो ना की त्याचे काय अधिकार आहेत ते वाटेल तसे कोणी काहीही देतील मग आम्ही इथे स्टँडींगच चालवू शकत नाही. शहर विकायला काढतील, काही कोणी बोलणारच नाही. आम्ही मग एखादे नक्की करावे त्याच्यावर परत निर्णय मा. कमिश्नर देतील. मी तर म्हणतो ह्या पत्राने निराळे काही पायंडे पळायला लागलेत. आम्ही सुद्धा २-२ वर्षे स्टँडींगला काम केले आहे. त्यावेळेच्या कोणत्याही आयुक्तांनी हिम्मत केली नव्हती. हा पहिला प्रयत्न आहे. त्यांनी हे जे काही भीती घालण्याचे काम केले आहे ना. ती भीती कसली आली? कोणाला भीती वाटते? चो-यामा-या ज्यांनी केल्यात ज्यांनी बकायदेशीर काम केले आहे त्यांना भीती वाटेल. आम्हाला भीती वाटणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आणि ते अभिप्राय देतात. त्यांना आम्ही कुठे बोललो आहे? संबंधाची तुम्ही बाजु ऐकू नका?

**मिलन म्हात्रे :-**

त्यांच्यामध्ये चौकशी हा शब्द आहे. मा. आयुक्त साहेब, म्हणताच कसे संधी दिली नाही म्हणून? हे बोलणारे कोण?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आणि सचिव साहेब, तुम्ही हा जो ठराव शेवटी सही सकट दिलेला आहे. एकतर ठराव बहूमताने पारित झालेला आहे तो लिहिलेला नाही. ठराव मतदानाने झालेला आहे तोही लिहिलेला नाही.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, श्री. आर.डी. शिंदे साहेबांनी सांगितले आहे की, त्याच्यावर फेरविचार करा. साहेब, एक काम करा. ते मैदान आपल्या नगरपालिकेच्याच ताब्यात घ्या. त्या मनुभाईच्या थेअटरचे अख्खे शो उडून जाईल.

**नगरसचिव :-**

तो मतदानासाठी आलेला आहे. प्रोसिडींगमध्ये तो आलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे कॉपी दिले आहे ते सांगतो. प्रोसिडींगमध्ये कुठेही उल्लेख नाही.

**मिलन म्हात्रे :-**

श्री. खतगांवकर साहेब, ही कमिटी ह्या ठरावानुसार मा. महापौर, त्याच्यानंतर मा. उपमहापौर, श्री. सुदामराव गायकवाड श्री. स्टिव्हन मेंडोसा, श्री. हॅरल बोर्जीस, श्री. परशुराम पाटील, श्री. मिलिंद वाणी आणि श्री. दिलीप घेवारे ह्या अधिकाऱ्यांची कमिटी बनली. बरोबर आहे? ह्यामध्ये......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

ते त्या बैठकीला उपस्थित होते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, नाही. ती कमिटीच आहे. साहेब, त्याच्यात डेसिगनेशन टाकले आहे. ठरावामध्ये डेसिगनेशन आहे. त्यानुसार ती नावे टाकलीत. पुढे मला बोलू द्या. त्याच्यावर किती लोकांच्या सह्या आहेत? ते मला सांगा. जे श्री. स्टिवन मेंडोसा साहेबांनी ठराव पास केला ना त्यांचीच कमिटीवर सही नाही. या सभापतींनी तो ठराव पास केला. त्यांची सही नाही, विरोधी पक्ष नेत्याची सही नाही.

**नयना म्हात्रे :-**

ते तर मिटींगला आलेच नव्हते.

**मिलन म्हात्रे :-**

आणि बरेचसे आले नव्हते. काय उपद्व्याप आहे. काय असते की, एक पाप केले ना तर मग दहा पाप झाकायला लागतात. कळल. कारण ह्या कॉपीची मी २० दिवसापासून मागणी करतोय. साधे पत्र दिले. परत आणखिन एक पत्र दिले. नंतर आर.टी.आय. मध्ये अर्ज दिला हा अर्ज डॉक्युमेंट उपस्थित होता. साहेब, हे बघा माझ्याकडे सगळ्या फायली आहेत. हे बाकीची माहिती मिळते तर हे डॉक्युमेंट का मिळत नाही? ह्याला काही गोल्ड सील वगैरे वर, पारावरती बसलेले पत्र आहे का? हे पारावरती वडाखाली बसुन तयार केले आहे का? ह्याच्या मिनिट्स कुठे आहेत? ही मिटींग झाली. काही मिनिट्स आहेत की नाहीत? मिनिट्सवरती सचिवांची सही येते. मिनिट्स सचिव बोलवतो. प्रत्येक मिटींगला सचिव उपस्थित असतातच. ह्याच्यावरती श्री. स्टिवन मेंडोसांची सही आजही नाही. श्री. परशुराम पाटील यांचीही सही नाही आणि ज्यांची सही नाही त्यांनी ठराव पास केला. एक लक्षात घ्या ह्या प्रकरणामध्ये मा. आयुक्त साहेबांनी आर्थिक फयद्याचा विचार केला आहे ना. साहेब दि. १८ जुलैला ११६ चे ॲग्रीमेंट तयार झाले. ह्या कमिटीनी ७/१२ उताऱ्यावरती या ११६ चा वसंतलाल वाडीलाल वगैरे चंपाबाई वाडीलाल, मिरा भाईंदर महानगरपालिका अशी ३ नावे आहेत. ह्या कमिटीनी ह्या लोकांनी तुमच्याकडे ॲग्रीमेंट वरतीच एक पत्र दिलेले आहे. त्याच्यामध्ये त्या संस्थेचे पत्र आहे. २७/७/२००७...

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, आपण तर निर्णय घेतलेला आहे. ठराव मांडलेला आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

एक लक्षात घ्या. परत एकदा सांगते. हे जे पत्र तुम्हाला दिलेला आहे. ती सुरूवात आहे. ह्या पत्रावरती त्यांनी आमच्यावरती नी इलिगेशन केले आहेत. ती एलीगेशन आम्हाला खोडून पुराव्यानिशी, सेक्शननिशी मांडायच्या आहेत.

**मा. सभापती :-**

कुठे मांडायच्या आहेत?

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही मांडतो ना. आम्हाला संधी द्या. साहेब, हे सभागृह आहे. ह्या सभागृहात त्यांनी पत्र ठेवले आहे. मा. आयुक्त लिहील ती पुर्व दिशा नाही. त्यांनी बाकीच्या लोकांना शिकवावे. आम्हाला शिकवायचे नाही.

**नयना म्हात्रे :-**

त्यांनी आपल्याला विषयपत्रिकेला विषय दिलेला आहे. मिटींगला तो विषय आला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे पटलावर आहे ना. विषय टर्नअप करु नका. त्या विषयामध्ये आमचा अगोदर विधीवत केलेला ठराव ह्याला चॅलेज ज्या मा. कमिश्नरनी दिले आहे त्यांना आम्हांला बरोबर कायदेशीर शिकवायचे आहे. त्या सभागृहात पण आणि पुढे पण शिकवायचे आहे. मी पहिलेच बोललो. प्रतिवादी नंबर २ ते असतील. अगोदरच तिकडे तारखेला उभे राहातात ना. आमच्यापण तारखेला उभे राहतील. मग, एक आठवडा समज द्यायला जाईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

पत्र दिलेले आहे विषय नाही.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना पत्रही देण्याचा अधिकार नाही. ते काही पारावरची मिटींग नाही. पत्र दिले म्हणजे काय? त्यांनी पत्र नियमानुसार धरुन लिहिले आहे का? त्यांचा जॉब काय आहे ते मी पुढे सांगतो. त्यांनी जी भाषा केलेली आहे. त्यांनी ज्या ह्याच्यामध्ये भाषा केलेली आहे. आम्हांला ते सगळे खोडुन काढायचे आहे. मुद्दे त्यांनी त्यांनी व्यवस्थित दिले आहेत ना आज सगळा त्याच्या पोस्टमार्टम होईल साहेब, आज या संस्थेने तुम्हांला पत्र दिले आहे. त्या ॲग्रीमेंट मध्ये लावले आहे २७/७/२०७ श्री. सुदामराव गायवाड यांनी एक महिन्या अगोदर २०/६/२००७ ला त्यांना वर्कऑर्डर दिली. ॲग्रीमेंट १८ जुलै २००७ ला झाले. तुमची वर्कऑर्डर दिली २० जुन २००७ म्हणजे, तुम्ही त्या कमिटीला पण काही बोलणार की एक महिना अगोदर आम्ही त्यांना वर्कआर्डर दिली आहे. स्किवेन्स सगळ्यांनी लक्षात घ्या. आपण नगरसेवक, सदस्य आहोत काय काय होते ते नगररचनेनी मा. स्थायी समिती पुढे, मा. महासभेपुढे हे पत्र काढायला पाहिजे होते. ह्याच्यात सगळेच इनव्हॉल्व आहेत. साहेब, ह्याच प्रकरणामध्ये मा. आयुक्त म्हणजे श्री. सुदामराव गायकवाडच २३ जुन २००६ ला न.र.राणे कक्ष अधिकारी यांनी आपल्या मा. आयुक्तांना एक पत्र पाठवलेले आहे त्या पत्राचा आशय काय आहे. ते नीट बघुन घ्या. जमिनीचे मालक कोण वाडीलाल शहा, चंपा बहन वगैरे जमिनीच्या मालकाच्या म्हणजे ७/१२ उता-यावर जिथपर्यंत हे ॲग्रीमेंट झाले तिथपर्यंत तरी त्या संस्थेचे नाव नाही. जी जी चॅरिटेबल ट्रस्ट आहे. तिचे नाव नाही. आणि त्या मालकांचे ही नाही मंजुर सुधारित विकास योजना मिरा भाईंदर आरक्षण क्रमांक १९१ ही जागा कॉलेजसाठी विकसीत करणार दिपक चेरिटेबल ट्रस्ट आता बघा. दिपक चेरिटेबल ट्रस्ट १९१ ही जागापण मागते. कॉलेज नामाभिधान बदलण्या करता कळले का? अगोदर सगळे डिटेल दिलेले आहे. आणि ते सगळे ॲग्रीमेंट त्यांनी ह्या फाईलला पण लावलेले आहे. आज त्यांचा एक जुना अर्ज आहे. २३ मार्च २००६ च्या अगोदर पण अर्ज केला असेल. पण मंत्रालयात ते पुढचे अर्ज दिलेले नाहीत. शासनाच्या समक्रमांकाचे पत्र २३ मार्च २००६ चे पत्र, अर्जदार सी.के मेहता यांनी २७ एप्रिल २००६ चा केलेला अर्ज त्याला शासनाने पहिली हे नामाभिधान बदल्याचे नाकारलेले आहे. नामाभिधान शाळा आणि खेळाचे मैदान हे कधीचे झाले आहे. २३ मार्च २००६ ॲग्रीमेंट १८ जुलै २००७ ला बनले. २७ एप्रिल २००७ चा त्यांनी शासनाकडे अर्ज केला आहे. ती संस्था बडोद्याला रजिस्टर झाले त्या संस्थेचे मिरा - भाईंदरशी, महाराष्ट्राशी घेणे - देणे नाही. त्या संस्थेचे ट्रस्टी मंत्रायलात येउन आपल्याला अर्ज करत आहेत की, ह्याचे नामाभिधान बदला. नामाभिधान कोण बदलु शकतो? मी शेतकरी आहे. मी माझ्या शेतीचा ७/१२ उता-यावर ऑब्जेक्शन घेउ शकतो आणि सांगतो की, माझी ही शेती अशी आहे ती अशी करा. ॲग्रीक्ल्चर आहे. त्याचे एन.ए. करा.

**मा. सभापती :-**

हा विषय येथे नाही. मा. कमिश्नर साहेबांन समोर बोलेले तर ते ऐकतील इकडे कोण ऐकणार आहेत?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही सभापती आहात. मी सांगतो ते रेकॉर्डवर येउ द्या. तुम्ही विषयाचे एवढे गांभिर्य तुम्ही मिटवु नका. तुम्ही विषयावरती सगळ घ्या.

**मा. सभापती :-**

आमचे लेटर वाचुन झाले विषय संपला. तुम्हीत्यावर उत्तर द्या.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही. विषय संपला कसा काय?

**मा. सभापती :-**

आपला ठराव काय मांडलेला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी पहिलेच विचारले की, ठराव मांडता का म्हणुन.

**मा. सभापती :-**

कशाला मांडणार? कोण मांडणार का म्हणुन.

**मिलन म्हात्रे :-**

थांबा माझे ऐकुन घ्या. ते माझे पत्र आहे. माझे सगळे डिक्लेरेशन तुम्हांला ऐकायला लागणार आहे. तुम्हांला कुठे बाहेर जायचे असेल तर कोणाला तरी प्रभारी बसवा आणि निघुन जा. स्पष्ट सांगतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.):-**

निर्णय झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

निर्णय झालेला आहे म्हणुन बोलत नाही. निर्णय झाला म्हणजे काय? तो निर्णय नसतो हे तुमचे पत्र रद्द करणार. का तुम्ही पटलावर ठेवणार ते नंतर आहे कशासाठी ठेवतो हे ऐकुन घ्या. शहरामध्ये आमच्यावरती बदनामी चाललेली आहे. २७ एप्रिल २००६ ला त्या संस्थेने आपल्याकडे नामभिधान बदली करण्याची मागणी केली. १ वर्षाअगोदर ह्या मॅटरमध्ये ती संस्था १ वर्षापासुन तुमच्या कडे मागे लागली आहे. आणि तीच संस्था तिचे पुर्ण रिझर्व्हेशन करण्यात येते.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, हे जे पत्र आलेले आहे. त्या पत्रामुळे त्यादिवशी जो ठराव पारित झालेला आहे. त्याच्यावरती काही परिणाम होत आहे का? तो ठराव रद्द झाला आहे. की तो ठराव तसाच आहे. तेवढे सांगा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ज्या दिवशी मा. आयुक्त उपस्थित असतील त्यादिवशी हे पत्र चर्चेला आणा ना.

**नयना म्हात्रे :-**

तो विषयच परत इकडे चर्चेला नको आपण त्या दिवशी जो ठराव मांडला आहे तो बरोबर आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ठराव तुमचा बरोबर असेल. पण इथे पत्र दिलेले आहे मा. आयुक्तांच्या पत्रावरती चर्चा करायची का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.):-**

ठराव अजुन रद्द झाला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव रद्द झाला, झाला नाही हे सोडुन द्या. साहेब, मा. आयुक्तांना मी पाहिलेच बोलतो. मा. आयुक्तांनी हे जे पत्र दिले ही आमची जनरल बॉडी आहे. ही आपली मा. स्थायी आहे. या सभेमध्ये मा. आयुक्तांना कुठलेही पत्र पाठवण्याचा कायदेशीर अधिकार आहे का? नाही बरोबर आहे? मी सेक्शन तुम्हांला सांगतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.):-**

मा. आयुक्तांनी त्याचें मत सभागृहाला कळवावे. म्हणुन पत्र दिलेले आहे. मत कळवण्याचे अधिकार नाहीत असे कसे आपण म्हणु शकतो. असे नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्तांचे अधिकार वाचा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.):-**

मा. स्थायी समितीला त्यांचे वेळोवेळी म्हणजे ते मत कळवु शकतात. आणि त्यांनी अभिप्राय दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी मत मांडलेले आहे. असे काय करता?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.):-**

बरोबर आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

आणि लेखी मत समजणार. असे तसे नाही. लेखी मत समजणार वाटेल तसे कोणीही देतील हे काय सगळं मजाक चालले आहे का? टी.डी.आर.एफ.एस.आय. विकतात तो इकडे धंदा आहे का? ती पण आता गत येणार आहे.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, पहिले तो मैदानच चुकीचा बनवलेला आहे. त्याच्यावर पहिले निर्णय घ्या. त्या मनुभाईने आपल्याला एक प्रकारचे फसवले आहे. त्या प्लॅन प्रमाणे त्याने मैदानच बनवले नाही.

**मा. सभापती :-**

त्याने बरोबर बनवलेले आहे.

**नयना म्हात्रे :-**

जरा जाउन बघा. ते प्लॅन जाउन बघा. साहेब, तुम्ही असे कसे बोलता? तुम्ही पण आता त्याच्या बाजुनेच बोलणार का?

**मा. सभापती :-**

मी त्यांच्या बाजुने बोलणार नाही बघायला गेले होते.

**नयना म्हात्रे :-**

काय बघायला गेले? त्या प्लॅनप्रमाणे मैदानच नाही.

**मा. सभापती :-**

गेल्या स्थायी समितीमध्ये ५ मीटर कमी आहे असे ते बोलले नाही का?

**नयना म्हात्रे :-**
त्याने ते मैदान असे बनवले आहे. तुम्ही काय बोलता? साहेब, नाहीतर आम्हांला मिटींगला बोलवु नका.
**मा. सभापती :-**
बरोबर बनवले आहे. ते बोलले की, फक्त ५ मीटर कमी आहे. एवढे बोलले.
**नयना म्हात्रे :-**
श्री. घेवारे साहेबांना तुम्ही जाउन बघा. त्याने ते कसे बनवले आहे ते जरा जाउन बघा. मा. सभापती साहेब, तुम्ही आम्हांला असे बोला की, मिटींग मध्ये येउ नका. तुम्ही आम्हांला चक्क पत्रात असे उल्लेख करा की, तुम्ही मिटींगला येवु नका तुम्ही स्वतः मिटींग घ्या.
**मा. सभापती :-**
आपल्या पुर्ण स्थायीसमिती मध्ये गार्डन बनवलेले आहे. त्यांना काय भरले गेले संपले.
**नयना म्हात्रे :-**
पण मिटींगमध्ये विषय आता घ्या ना. गार्डन कधीपण बनवु द्या.
**मा. सभापती :-**
मग त्याच्यात काय कमी आहे. ते सांगा जे कमी सांगा. तुम्हालां काय पाहिजे असेल तर सांगा गार्डन झाल्यांनतर मग तुम्ही काय ओरडणार?
**नयना म्हात्रे :-**
गार्डन झाल्यानंतर त्याची चुकी आहे? आपली चुकी नाही. तो त्याच्या थेटरचा फायदा बघणार शो गिरी बघणार आहे. आपल्या मिरा - भाईंदरचा कसा फायदा होईल हे तो बघणार नाही.
**शानु गोहिल :-**
मा. सभापती साहेब, ॲग्रीमेंट हुआ उसके अंदर सेप्टी टँक, वॉचमेन का रुम, टॉयलेट यह सब चीजे थी। तो वह क्युँ  बनाई नही गई ? और वहाँ पर महानगरपालिका का बोर्ड भी लगाया नही। उसके बारे मे अधिकारीयोंने हमे थोडा बहुत क्लिअरीफिकेशन देना चाहिए ना। तो आप क्लिअरी फिकेशन दिजीए। वह क्लॉज के अंदर बहुत सारी बाते है। ॲग्रीमेंट के अंदर जो क्लोज है वह क्लॉज २४ के अंदर वॉचमेन का रुम २०X१० का रुम होना चाहिऐ। वह उसके अंदर नही है। ऐसा होता नही है। उसको बोलिए की, जबाब दे। उत्तर दिजिए।
**दिलीप घेवारे (प्रभारी सहा. संचालक, नगररचना) :-**
अभी ॲग्रीमेंट दे के छह महिना हुआ है। उसमे भी प्लॅन अभीतक सबमिट नही किया है। प्लॅन सबमिट करेंगे तभी उसमे से.......
**मिलन म्हात्रे :-**
त्या ॲग्रीमेंटमध्ये प्लॅन सबमिट करण्याचा कालावधी किती दिला आहे?
**दिलीप घेवारे (प्रभारी सहा. संचालक, नगररचना) :-**
१ वर्षाच्या आतमध्ये.
**मिलन म्हात्रे :-**
एवढा लेट का दिला? आपण त्यांना कुठल्या नियमानुसार दिला? त्या कमिटीने सांगितले की, एक वर्षा पर्यंत त्यांना प्लॅन सबमिट करु दे?
**दिलीप घेवारे (प्रभारी सहा. संचालक, नगररचना) :-**
कुठल्याही नियमात असते की, त्यांना १ वर्ष ॲग्रीमेंट मध्ये प्लॅन सबमिट करायला द्यायला पाहिजे.
**मिलन म्हात्रे :-**
कशासाठी? काय गरज आहे? तुमचा करारनामा झाल्यानंतर त्याचे बिल्डींगचे प्लॅन पास झाले. माझ्या आरक्षण क्र. ६९मध्ये सुध्दा हेच झाले. मा. आयुक्तांनी स्वतःचे पावर शासनाच्या ताब्यात घेउन पैसे घेउन ते सगळे आरक्षण बदलले रस्त्याची जागा दिली. पण त्या विकासकाकडुन ती जागा महापालिकेच्या ताब्यात तर घेतली आणि आज ती जागा उघड्यावर पडली आहे. तुमच्या महापालिकेचा बोर्ड होता. मिरा - भाईंदर महानगरपालिका मार्केट आज तिकडे खाजगी जागा म्हणुन बोर्ड आहे हे असेच चालले आहे. तुम्ही प्लॅन पास कुठचा केला त्याच्यामध्ये प्ले ग्राउंडचे दाखवले आहे का?
**दिलीप घेवारे (प्रभारी सहा. संचालक, नगररचना) :-**
दाखवले आहे.
**मिलन म्हात्रे :-**
काय दाखवले आहे? त्यांनी गेट उघडले आहे का?
**दिलीप घेवारे (प्रभारी सहा. संचालक, नगररचना) :-**
उघडले आहे.
**मिलन म्हात्रे :-**
कुठे उघडलेले आहे?

**दिलीप घेवारे (प्रभारी सहा. संचालक, नगररचना) :-**
आपल्या २५ मीटर रुंदीच्या रोडवर

**मिलन म्हात्रे :-**
तुमच्या प्लॅनमध्ये ते आहेत का?

**दिलीप घेवारे (प्रभारी सहा. संचालक, नगररचना) :-**
नाही त्यांनी प्लॅन टाकलाच नाही.

**मिलन म्हात्रे :-**
साहेब, असे कसे करता? तुमच्याकडे विकासकाने जेव्हा प्लॅन पास केले. त्यावेळेला त्या ले - आउट मध्ये त्यांनी बाकी सगळे दाखवले असे चालत नाही. त्यांनी तुमच्या त्याच्या फायद्याच्या जेवढ्या वस्तु आहेत तेवढ्या बरोबर त्यांनी तिकडे दाखवल्या तुम्ही टाउन प्लॅनिंगमध्ये बसता. आणि म्हणता आम्ही हे सगळे केलेले आहे. म्हणजे त्यांना आर्थीक ह्यांची फार काळजी पडलेली आहे. आज हा प्लॅन घ्या. ह्याच्यामध्ये इकडे कुठे इण्ट्री आहे ते जरा दाखवा. हा प्लॅन घ्या. आणि महानगरपालिकेला इण्ट्री कुठे आहे ते दाखवा. ह्याच्यावर तुमचीच सही आहे. जरा रेकॉर्डवर येउ द्या. फक्त प्ले ग्रांउंडच्या ले आउटला इण्ट्री कुठुन आहे ते सांगा. तिकडुन माणसाचे आतमध्ये कुठुन जायचे? उद्या मा. आयुक्त साहेब गेले तर त्यांनी आतमध्ये कुठल्या गेटने यायचे?

**दिलीप घेवारे (प्रभारी सहा. संचालक, नगररचना) :-**
सर्वप्रथम बॉण्ड्री दाखवलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**
ती बॉण्ड्री आहे. आम्ही तेच बोलतोय ती बॉण्ड्री आहे. इण्ट्री नाही. त्या मॉलला इण्ट्री बरोबर आहे. साहेब तुम्ही नीट बघुन घ्या.

**दिलीप घेवारे (प्रभारी सहा. संचालक, नगररचना) :-**
प्लॅन मध्ये बाकी कुठे इण्ट्री दाखवलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**
बिल्डींगची इण्ट्री दाखवलेली आहे. कशाला मिसगाईड करता?

**दिलीप घेवारे (प्रभारी सहा. संचालक, नगररचना) :-**
कुठे दाखवलेली आहे?

**मिलन म्हात्रे :-**
१२ फुट व्हाईड रोड लिहिलेले आहे.

**दिलीप घेवारे (प्रभारी सहा. संचालक, नगररचना) :-**
ते प्ले ग्रांउडला आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**
प्ले ग्रांउडच्या बाहेर इन्टरनल इन्ट्री दाखवा. त्याच प्रिमायसेसमध्ये त्याचा ले आउट निराळा आहे आणि आता गेट कुठे काढले ते तिकडे दाखवलेला आहे. प्लॅन पास करुन झालेला ते तिकडे दाखवलेला आहे. प्लॅन पास करुन घेतांना तुम्ही जरा व्यवस्थीत बघत जा. आज मी उद्या तर कोर्टात जाउन सांगणार त्यांनी गेटच ठेवलेला नाही. हा प्लॅन त्यांनीच मंजुर केलेला आहे. तुम्ही सगळी घाण करायची आणि आम्ही झाडु घेउन सगळी साफ करायची कम टु दी पॉईंट ऐवढे सांगा. तो प्लॅन तुमच्या आधिकारात मंजुर केला तुम्ही सहाय्यक नगररचना संचालक विभागात आहेत महत्त्वाचे आहे. इनफेअर कमिश्नर. त्याच्या मते मला एक सांगा ही आरक्षण साहेब हा जो प्लॅन दिला आहे. हा अलॉंग विथ प्लेग्राउंड आहे. बरोबर आहे ना? त्या प्लॅनमध्ये सुध्दा आपण जेव्हा जे आउट काढतो ना त्यावेळेला इकडे बस स्टॉप आहे. इकडे आमचे २४ तास पाणी आहे. आता एकाचे ब्राउचर आले आहे. ह्याच्यातच आहे २४ हवर आपली एम.बी.एम.टी ची बससेवा आहे. ते सगळे दाखवतात. आज मला सांगा त्या जे आउट मध्ये जसे सन्मा. सदस्या शानु गोहिल मॅडम बोलल्या की, ह्याच्यामध्ये आम्ही बाक किती बसणार? फाउंटंन काय आहे का? झाडे कुठे लावणार? प्ले ग्राउंडमध्ये एकही झाड नाही. आपण झाडे काढतो? त्यानंतर त्याची इण्ट्री कुठे आहे. आम्हांला ह्याच्यातुन बरेचसे काही शिकायला मिळाले हे बघा. त्याच्या मॉलची इण्ट्री कशी असेल म्हणजे तिकडे गार्ड किती असतील त्यांच्या हातात मोबाईल असणार मिलन म्हात्रे आले तर जाउन देणार नाही. कारण खाजगी एण्ट्री आहे. हे बघा तुमची ही सगळी ऑर्थोटिंकली पेपर आहेत. त्याच्यानंतर त्याच्या मॉलचे साहेब मला कुणाचा व्यक्तिगत द्वेष नाही, दुश्मनीही नाही हे बघा हे सगळे दिलेले आहे. जर तुम्ही हे सगळे देतात. फस्ट प्लॅन, थर्ड प्लॅन, सेकंड प्लॅन तर तुम्हाला त्या प्ले ग्रांउडला गेट किती असतील ते देता येत नाही का? ह्याच्यानंतर हा तर अगदी डिटेल आहे. ह्याच्यातुन रेल्वे गाडीपण चालवणार आहे. ही रेल्वे गाडी सुध्दा चालणार आहे. हे त्यांनी ह्याच्यात दिले आहे. इथे काय काय आहे. त्याच्यात तुमच्या प्लेग्राउंडचा उल्लेख नाही. ह्या समोर प्लेग्राउंड आहे. ह्याच्यात कुठेही उल्लेख नाही. लिहीलेले नाही की, प्लेग्रांउड फॉर मिरा - भाईंदर म्युनिसिपल कॉर्पोरेशन पब्लिक गार्डन कुठेही लिहिलेले नाही. साहेब हे पेपर त्यांच्याच डिपार्टमेंट कडुन आलेले आहे. आणि ह्या जागेबाबत ती संस्था तुमच्याकडे १ वर्षा अगोदर पत्रव्यवहार करते आमच्या एकाही सभेमध्ये ते पत्र आलेले नाही. ॲक्युचअल तो आमच्या मा. महासभेचा अधिकार आहे. मा. महासभेने त्याचे नामाभिधान बदलायचे ते मा. कमिश्नर तिकडे १ वर्षापुर्वी आलेले पत्र आमचे सचिव साहेब सांगतात की, तुम्ही तुमचा प्रस्ताव

पाठवा आम्ही ते बदलुन घेउ. आणि आम्हांला रेकॉर्डवर हे पत्र येत नाही तारीख किती आहे? २३ जुनला पत्र आलेले होते २३ जुन २००६ त्याच्यानंतर आमचे हाउस चालले नाही. २० जुन २००७ ला आमची आचारसंहिता लागली एका ही सभेत सचिवांनी हे पत्र ठेवलेले नाही.

**दिलीप घेवारे (प्रभारी सहा. संचालक, नगररचना) :-**

आपल्या नाव चेन्ज करायचे नाही. कशाला नाव चेन्ज करायचे? नाव तेच ठेवायचे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्हांला काय करायचे काय नाही ते महत्त्वाचे नाही. हे शासनाचे पत्र आहे. महापालिकेच्या मालमत्तेचे डेफिनेशन चेन्ज होतेय बरोबर? ऐकुन घ्या. सचिवाकडुन किंवा मा. आयुक्तांकडुन आलेली पत्रे हे काय आहे? मा. आयुक्तांना आलेले पत्र आहे. सचिवांनी हे असेच्या असे म म म्हणुन ते सभागृहापुढे ठेवायचे हे पत्र आले आहे. ते डेसवर, पटलावर ठेवायचे हे ठेवलेच गेले नाही. असे किती पत्र आहेत ते काढा मी आता तिकडे पत्र दिलेले आहे. ह्या पत्राखाली क्लिअर कट टु ते अधिकारी म्हणत आहेत. नगररचना, अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्ताव शासनास सादर केल्यास शासनस्तरावर गुणवत्ते नुसार निर्णय घेण्यात येईल असे कळविण्याचे मला ओदश झालेले आहेत. म्हणजे त्यांना ऑलरेडी आदेश झालेले आहेत. आमचे त्यात प्रस्ताव नाही आणि आम्हांला पत्र नाही सेम प्रॉपर्टी दिपक चॅरीटेबल ट्रस्टच मागते १ वर्षाअगोदर हे सगळे प्रि - प्लॅनिंग होते. नंतर ते टेंडर मागवली जातात साहेब, नंतर ते पत्रमध्ये बरोबर त्यांनाच मिळते आणि तुम्ही कशाला दिले? शाळा आणि क्रिडांगण त्यांनी सरळ म्हटले आहे. मला शाळा बदलुन कॉलेज पाहिजे हे १ वर्षा अगोदर सगळे प्रि - प्लॅनिंग झालेले आहे. त्याच्यामध्ये आपले आयुक्त वगैरे सगळे बाकीचे सामील आहेत आणि साहेब ह्याच्यामध्ये मी तुम्हाला सांगतो २३ मार्चच्या अगोदर म्हणजे जानेवारी २००६ पासुन सुरुवात झालेली आहे. मला बी.ओ.टी तत्त्वावरती कुठलाही विरोध नाही कुठलाही अधिकाऱ्यांनी असा संभ्रम तयार करु नये आज तरी मी एक फाईल कमी आणली आहे. तूमच्या त्या पार्कशी जाउन ती बी.ओ.टी ची फाईल काढा सेट्रंल गव्हर्नमेंटचे नॉर्म्स आहेत. प्रत्येक वर्कऑडर वरती मा. आयुक्तांचीच सही पाहिजे. श्री. घेवारे ना कोणी चार्ज दिला? तुम्हाला मा. आयुक्तांचा आदेश आहे का? की, प्रत्येक वर्क ऑर्डरवर सगळ्यावरती सही करायचा? पत्र लिहिलेले आहे अजुन उत्तर आलेले नाही.

**दिलीप घेवारे (प्रभारी सहा. संचालक, नगररचना) :-**

उत्तर दिले आहे. आयुक्तांचीच सही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नेवर ती पण कॉपी आहे. तुम्ही एस.डी केले आहे. ही बघा दाखवतो. हे बघा. टेंडर फॉर्म वरती तुम्ही सगळीकडे एस.डी करुन टाकलेले आहे. तुमचीच सही आहे. सगळी तुमचीच सही आहे. आयुक्त एस.डी. श्री. खतगांवकर साहेब......

**दिलीप घेवारे (प्रभारी सहा. संचालक, नगररचना) :-**

साहेबांची एका बाजुला सही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मला ते माहित नाही. माझ्याकडे जी सांक्षाकित कॉपी आली.

**दिलीप घेवारे (प्रभारी सहा. संचालक, नगररचना) :-**

ट्रु कॉपी वर साहेबांची सही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण त्याच्यावर सही पाहिजे ना. एक नगरसेवक, स्थायी समितीचा सदस्य तुम्हांला अर्ज देतो आणि तुम्ही आम्हांला तिसरी कॉपी देता? मा. आयुक्तांची का देत नाही? साहेब, तुमच्या डिपार्टमेंटकडुन मिळाली. श्री. खतगांवकर साहेब, हे सगळे एस.डी आणि एकाच अधिकाऱ्याचे सगळीकडे सेम इक्विअल आपल्या बी.ओ.टी तत्त्वावरती आपण जे शिवार गार्डनचे टेंडर दिले त्याचे ॲग्रीमेंट सेंट्रल गव्हर्नमेंटच्या नॉर्म्सनुसार बनलेले आहे. सेंट्रल गव्हर्मेन्टचे सगळे नॉर्म्स आहेत. प्रत्येक वास्तुची आपल्या आर्किटेकने आपले वास्तु विशारद आहे. त्यांनी प्रत्येक वास्तुचे जे काही छोटे छोटे आहे म्हणजे आपला क्लब आहे किंवा प्याउ आहे किंवा काहीही असेल प्रत्येक वस्तुचे ५ लाख, १० लाख, २० लाख असे व्हॅल्युएशन काढुन दिलेले आहे. आणि त्याच्यानुसार तुम्ही बी.ओ.टी चे रेट ठरवले आहे. आणि मग ते टेंडर निघाले आहे. त्याच्यात सुध्दा टेंडरमध्ये पण परत जब्लिंग झाली ते हायकोर्टात केस गेली त्याचे मी पुन्हा जजमेंट काढुन आणले ती टेंडर देण्याची प्रक्रिया कशी होती. तीच चॅलेंज झाली. ती हायकोर्टात पिटीशन फाईल झाली. त्याची पण जजमेंट माझ्या कडे आहेत. एक लक्षात घ्या. तसे नसते मा. आयुक्तांना आर्थीक चिंता एवढी असेल मग टेंडर मिळाले नाही म्हणुन एखादी पार्टी तिकडे का जाते? पब्लिक टेंडर आहेत. सगळे द्यावे आणि आता ह्याच्यामध्ये ज्या लोकांनी तुमच्याकडे कागदपत्रे सबमिट केली नाही. ते पण मी फाईल आणले आहेत. तुमच्या जर कोण मागणीदार नसेल तर तुम्ही रिकॉल करा. एक माणुस तुमची चेन १ वर्ष बरोबर लावतो ती जागा बरोबर तो टार्गेट करतो. त्या टार्गेटचे नामभिधान बदलण्याकरता जमीन मालक नसतांना सुध्दा भाईंदर शहरामध्ये ती संस्था ॲक्टिव्हेट नसतांना सुध्दा तिचा कुठलाही रिप्युटेशन नसतांना सुध्दा ती जागेचे नामभिधान बदली करण्याकरता ती संस्था अर्ज करते? ७/१२ त्या वाडीलाल शहाच्या नावावर मिरा - भाईंदर महानगरपालिकेच्या नावावर आमचे नशीब चांगले आहे, सौभाग्य आहे की, त्या मा. आयुक्तांनीच पत्र दिलेले नाही की, ते दुकान चालवा म्हणुन नाहीतर मा. आयुक्तांनीच दिलं असते

की, एक पार्टी आलेली आहे. त्या जागेचे नामाभिधान बदलुन देउन टाकु. जसे श्री. आर.डी. शिंदे साहेबांनी केले आहे. तसे ह्यांनी केले नाही. त्यावेळेला डोक्यात गेले नसेल कोणी आयडिया वगैरे दिले नसेल. आम्हांला कळलेही नसते. मा. आयुक्तांनी त्या आचारसंहितेच्या कालावधीत ते बदलुन सगळे आणलेपण असते. एक लक्षात घ्या. सुप्रीम कोर्टाचे काही जजमेंटस आहेत. आचारसंहिता वगैरे ह्या कालावधीमध्ये मा. आयुक्तांनी कुठलेही महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय आयुक्त म्हणजे आता सचिव आले. आता समजा एक २० हजार करोड रु. चा प्रोजेक्ट आहे. रस्ता द्यायचा आहे. तर ते महत्त्वाचे निर्णय समजा महाराष्ट्र शासनाला आचारसहिंता लागली. असेम्बलीची इलेक्शन लागली. पार्लमेंटची इलेक्शन लागली त्यावेळेला कुठलेही धोरणात्मक निर्णय बॉडी अस्तीत्वात असतांना घेवु नये. माझ्याकडे जजमेंट आहेत. साहेब, मला आपण रुलिंग द्या इन शॉर्ट हा सगळा जो प्रकार झाला मी ठराव ठेवलेला आहे. ह्याच्यावर माझी पसर्नल एलिगेशन माझी आहे. कोणी आम्हाला भिती वगैरे दाखवायचा प्रयत्न केला नाही. कशासाठी? आम्ही कशाला भीती दाखवणार त्यात कसली भीती आहे? तुमच्या ठरावाने भीती आहे? माझ्या ठरावामध्ये माझा मी ठराव १०० टक्के मांडलेला आहे ठणठणीत ठराव आहे. त्यामध्ये जे कोणी अधिकारी आहेत. त्यांची चौकशी लावण्याकरता आपण बोललेलो आहे. आम्ही असे बोललो नाही. आपण आज ठराव वाचून कायम केला. आता त्यांना रुलिंगची ऑर्डर देवून टाका. कुठे बोललो? नैसर्गिक न्याय आम्ही कोणाला नाकारले? मा. आयुक्त काहीही लिहून देतात. हे नैसर्गिक न्याय दुस-यांचे नाकारतात. त्यांना वाटते की, सगळेच नाकारतात. त्या कुठल्या ठरावामध्ये असा उल्लेख की आत्ताच्या आता कारवाई करा म्हणून. ठराव वाचून कायम केला तर तो आमचा अधिकार आहे. त्यानुसार तुम्ही त्यांना नोटीस काढा. चौकशीला घ्या आणि चौकशीची प्रोसेस चालू करा आणि साहेब हे संपूर्णपणे महासभेचे अधिकार असताना सेक्शन ७९ जरा वाचा. ७७ पासून ७९ वाचा. हे सगळे सेक्शन मा. आयुक्तांनी महापालिकच्या महासभेपुढे रेफर करायचे आहे. मुल्यांकन आता हे बी.ओ.टी. चे १० लाख रु. डिपॉझिट घ्या. २ लाख रु. घ्या. १० लाख रु. त्याचे आकारणी करा. एक दिवसाचे १०० रु. लागतील. हे श्री. घेवारेंना कोणी ठरवून दिले? त्यांना अधिकार कोणी दिले? साहेब टेंबा हॉस्पिटलची केस मी केलेली आहे. आपण स्वतः ठराव केला. आणि त्याच्यामध्ये पुढे आचारसंहिता ३ महिन्यांचा असेल. त्याकरता पुढे होणारी कारवाई मा. आयुक्तांनी करावी असा ठणठणीत ठराव आपण पास करु दिला. बरोबर आहे की नाही? त्यानुसार मा. आयुक्तांनी जाउन रजिट्रेशन केले. तुमच्या मालमत्ता ह्या तुम्हांला सेंक्शन ७९ वगैरे ह्याच्यात माझ्या वकिलांची नोटीस आहे. त्यानुसार महापालिकेच्या कुठल्याही अधिका-यांनी परवागनी न घेताना काही उपद्रव्याप करता कामा नये. कुठेही दिवे लावायचे नाहीत. मा. महासभेपुढे आणा. काही खायचे असेल ते बाहेर करा. आम्हांला जे योग्य वाटेल ते आम्ही ठरवणार आम्ही म्हणजे इलेक्टेड बॉडीचे सगळे नगरसेवक ठरवणार. मोठे ज्येष्ठ सभागृह आहे. त्याचे पॉवर घेण्याचे काम श्री. आर. डी. शिंदे साहेबांनी केलेले आहे. कल्याण-डोबिंवलीला अगोदरच सगळं पेटलेले आहे. नवीन कुठे गळ्यात बांधून घेतले आहे ते मला कळत नाही. सगळे फुकटचे व्याप आहे. आज एक लक्षात घ्या पटलावरील मा. आयुक्तांचे हे पत्र तुम्ही रद्द करा. नसेल तर ह्या पत्रानुसार तुम्ही काय कारवाई केली आहे ते मला सांगा. आणि तुम्ही म्हणत असाल की ठराव स्टिक अप आहे. तुम्ही ३ महिने स्टॅण्डींगचा ठराव रद्द करुच शकत नाही. सेक्शन सांगतो सचिव साहेब ते वाचा, रेकॉर्डवर ते येउ द्या.

**मा. सभापती सो. :-**

बरोबर माहिती आहे. ते रद्दच होउ शकत नाही ते बोलले ना.

**मिलन म्हात्रे :-**

मला रुलिंग पाहिजे. उद्या अधिकारी पैसे खायला घालून वर्तमानपत्रामध्ये बातम्या देतात. तुमचे पी.आर.ओ. कुठे आहेत? त्यांना उभे करा. आघाडीचे सरकार तुम्ही चालवता? अडीच करोड रु. तुम्ही दिले नाही. म्हणून पेपरला बातमी आली. शहराला पाणी मिळत नाही म्हणून आणि तोच पत्रकार पेपरला लिहितो. अडीच कोटी रु. दिले तरी सुद्धा टप्याटप्यांनी पाणी येते. आम्हाला शरमेने मान खाली घालावी लागते. रस्त्यावर फिरताना आम्हांला अपमानास्पद वाटते. पी.आर.ओ. सेक्शन काय करतो? ते इस्त्रीवाले, लॉण्ड्रीवाले सगळे देतात. तसे त्यांना जिन्याखाली घुसवले आहे. तुम्ही बाकीच्या महापालिकेत जाउन बघा. तुम्ही टी.एम.सी. करुन आलेले आहात. तुमचे पी.आर.ओ. डिपार्टमेंट किती व्यवस्थित आहे? पी.आर.ओ. मध्ये फक्त कात्रणे कापायला ठेवले आहे का? साहेब तुमची प्रत्येक येणारी बातमी जर ती महापालिकेबद्दल खोटी बातमी असेल तर त्यांचा तुम्ही खुलासा केला पाहिजे. तुमच्या पी.आर.ओ. डिपार्टमेंटने तुमच्याकडे आणले पाहिजे. वस्तुस्थिती अशी आहे म्हणून. एक पत्रकार, तोच पत्रकार, तोच पेपर. १० दिवसापूर्वी बातमी छापतो. त्यांनतर दुसरी छापतो. काय चालले आहे? सगळे नागरिक पेपर वाचून आम्हांला हैराण करतात. कोणी काहीही बातमी द्यावे. त्या पत्रकाराने त्याची शहानिशा केली पाहिजे. मा. स्थायी समितीने मा. महासभेचे पॉवर हातात घेतले. बाकीच्या महापालिकेतले नगरसेवक मला फोन करायला लागले. म्हात्रे साहेब, तुम्ही हे असे कसे केले? तुमच्याकडून ही चुक झाली? मी म्हटलो, कुठली? तुम्ही मा. महासभेचे ठरावावरती हे आणलेत म्हणजे त्यांचे अधिकार तुम्ही ताब्यात घेतले. मी म्हटलो, असे काहीही झालेले नाही. आपल्या प्रशासनाच्या वतीने कुठलाही खुलासा अजून दिला गेला नाही. मा. आयुक्तांचे पहिले ते काम होते. प्रभारी म्हणून ते प्रभारी आहेत की भारी आहेत तेच कळत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

प्रभारी वगैरे नसते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब एक लक्षात घ्या. मला एवढं माहित आहे. मा. आयुक्तांनी पत्र दिल्यानंतर आयुक्त साहेबांना मी पत्र दिले होते. मा. आयुक्तांनी तो ठराव वाचून घ्यायला पाहिजे होते. त्याच्याबरोबर ठरावाची कॉपी राहिली. आम्ही मा. महासभेचा कुठला ठराव रद्द केला? मा. महासभेने काय करु नये असे कुठल्या ठरावात लिहिलेले आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

पेपरला काय झाले. त्याच्याशी...

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही त्याचा खुलासा करायला पाहिजे. असे कसे करता? मा. स्थायी समितीने मा. महासभेचे पॉवर्स हातात घेतले अशी एवढी मोठी बातमी येते. मा. आयुक्त साहेबांना त्याबद्दल खुलासा करण्याचे काम नाही का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नवभारत पेपर आहे. दोन दिवसापूर्वीचा तो पेपर मागवा. म्हणजे, हे पत्र मा. आयुक्त साहेबांनी सचिवांना कधी दिले ते माहित नाही. बातमी त्याच्या आधी आली की, मा. स्थायी समितीने ठराव रद्द केला. म्हणजे पी.आर.ओ. शेवटी.. मी काय बोलतो? हा विषय नाही. पी.आर.ओ.चा मतलब आहे त्यांनी ह्या बातमीची कात्रणं मा. आयुक्तांना, संबंधित खात्याला दाखवावी की हे तुमच्या बद्दल आलेले आहे दाखवले नाही. मला लोकांनी विचारले. तुमच्या ठरावाचे काय केले? उडवले ना. या पद्धतींनी असते. पी.आर.ओ. कुठे आहे? पी.आर.ओ. साहेब नवभारत पेपरची या विषयासंबंधित कात्रणं घेउन या. मा. सभापती साहेब.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

काय असते की पी.आर.ओ. आपल्याकडे आहे आणि प्रत्येक दिवसाचे महापालिकेचे संबंधित बातम्याचे कात्रणं मा. आयुक्तांकडे पी.आर.ओ कडून सादर केले जाते. मा. आयुक्तांनी विभाग प्रमुखाला निर्देश दिले की ह्या बातमीचा खुलासा करावा तर विभाग प्रमुख तसा अहवाल सादर करु शकतात ना. परस्पर विभागप्रमुख तसा खुलासा करु शकत नाही. जोपर्यंत मा. आयुक्त निर्देश देत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जर शहरामध्ये कधी एका वक्तव्यावरुन आग लागली, आणि लोकांमध्ये मारहाण झाली. तर मग कोणाला जबाबदार धरले जाईल?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

आपल्याकडे तशी सिस्टिम आहे. आपण सर्व बातम्यांचे कात्रणं मा. आयुक्त साहेबांकडे सादर करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग, मा. आयुक्त साहेबांनी नवभारत पेपरच्या बातमीच्या कात्रणाबाबत का खुलासा केला नाही?

**शरद पाटील :-**

खरं म्हणजे पेपरला चुकीची बातमी येते त्याला खुलासा द्यायला पाहिजे. साहेब महाराष्ट्र टाईम्सला एक आपल्याविरुद्ध बातमी आली होती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

सगळ्या बातम्यांचा खुलासा शक्य असतो का?

**मिलन म्हात्रे :-**

एक लक्षात घ्या. पाण्याच्या प्रश्नावरती मोर्चे येतात आणि तुम्ही काय सांगता?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ही बातमी जो ठराव झालेला आहे आणि ठरावाचा......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

एव्हरी गोष्ट सांगणे शक्य नाही.

**शरद पाटील :-**

साहेब प्रत्येक गोष्टीचा खुलासा योग्य नाही. ठिक आहे. आम्ही समजतो. पण जी खोटी बातमी आहे. श्री. खतगांवकर साहेब, तुम्ही आजचा महाराष्ट्र टाईम्स पेपर वाचला का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

नाही मी पेपर वाचला नाही.

**शरद पाटील :-**

तुमच्या नावानिशी आहे. माजी उपमहापौर चंद्रकांत वैती यांच्या नावानिशी बातमी आलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब सकाळीच तुम्हांला फोन करुन सांगितले. मी ह्यांना सकाळीच फोन करुन सांगितले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

नाही मी पेपर बघितला नाही.

**शरद पाटील :-**

आपला जो खर्च आहे. तो किती टक्के होता? किती टक्के आहे? अशी खोटी पत्रे इथे दिलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे ती किती खोटी बातमी आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

हे पाहा. आस्थापना खर्च लेखा विभाग मेंटेन करतो. आणि त्याचा अहवाल लेखा विभागाकडून शासनाला सादर केलेला आहे. आता ते पत्रकाराला बातमी आली. त्याचे प्रत्येक वाक्याचे कसे काय खुलासा केले जाईल?

**शरद पाटील :-**

पण लोकांमध्ये आपल्या महापालिकेची गैरसमजाची अशी एक बातमी जाते ना की एवढा खोटा व्यवहार चाललेला असतो का? साहेब तेवढे येथे खोटे आहे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बातमी अशी आहे की, ह्यांनी खोटी रिपोर्टींग महाराष्ट्र शासनाला केलेली आहे. रिपोर्टींग अशी आहे की, बातमी काय आहे? आस्थापना विभागाने खोटी जी फिगर्स आहे ती महाराष्ट शासनाला दिलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी समितीला खुलासा करु इच्छितो. महाराष्ट्र शासनाला खतगांवकर उपायुक्तांकडून कोणतेही आस्थापना खर्चाबाबतचा पत्रव्यवहार केलेला नाही. तो लेखा अधिकारी यांच्याकडून केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जरा या विषयावरती परत येउ. ही जी कमिटी बनवली आहे ना. ह्यांची प्रोसिडींग कुठे आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

होय. मी ही तेच विचारत होतो. तेच घ्या. एकतर हे मला पत्र दिले आहे २६/०१ च्या सभेचे. ही कसली प्रोसिडींग आहे? मी सचिवांना ही तेच विचारले की हे काय आहे? ते बोलले की मला पण माहित नाही.

**मिलन म्हात्रे :-**

होय साहेब ते कळायला मार्ग नाही. ह्या सह्याबद्दल पण काही कळत नाही. माझ्याकडे पण सह्या आहे. ह्याचा ड्राफ्ट आहे. साहेब, ह्याच्या को-या सह्याचा माझ्याकडे पण ड्राफ्ट आहे. आणि दोन म्हणजे मा. स्थायी समितीच्या सभापतींचीच ह्याच्यावर सह्या नाहीत. म्हणजे महत्वाचा पार्ट आहे. बाकीचे ठिक आहे. सभागृह नेता, विरोधी पक्षनेता इव्हन मा. महापौर पण ज्या स्टॅन्डीगमध्ये तुम्ही आणलेत. त्या सभापतींची सही नाही. ह्या एक महिन्याच्या कालावधीमध्ये हे उपलब्ध झाले नाही, वाटते ह्यांच्यावरती आठ लोकांचे डेसिग्नेशन टाकलेले आहे. १, २, ३, ४, ५, ६ दोन माणसांच्या सह्या कमी आहेत. आणि महत्वाचे म्हणजे मा. स्थायी समितीच्या सभापतींनी सही केलेली नाही. असे असताना तुम्ही तो तुम्ही परिपूर्ण समजणार का? परत ते व्हॅल्युएशन त्याच्याच पुढे आले. श्री. खतगांवकर साहेब, कळले का? हे ठरवायचे परत त्यांच्याच पुढे आले. आणि ऑर्बिटेटर म्हणजे कोण? ह्याच्यावरती कोण ऑर्बिटेटर नेमणार? श्री. घेवारे साहेब, ह्यांच्यामध्ये ऑर्बिटेटर कोण असणार?

**दिलीप घेवारे (प्र. स. नगररचना संचालक) :-**

ह्या प्रोसिडींग बरोबर मिनिट्स दाखवले आहे ते फक्त उपस्थिती दाखवतात.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मिनिट्स दिले नाही. हा चर्चा करण्याचा विषय नाही. १५-२० दिवसांपासून पत्र व्यवहार केला आहे. माहितीचा अधिकार एक महिन्यापासून आहे. कॉपी का देत नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे पहा, मा. महासभा ठराव क्र.७२, दि. २१/१२/२००६ च्या ठरावाप्रमाणेच बी.ओ.टी. च्या वर करण्यावर हे जे धोरणात्मक निर्णय झाले होते. त्याच्याअंतर्गत दि. २६/४/२००७ रोजी ११.०० वाजता खालील पदाधिका-यांची बैठक झाली. त्याच्यात दुसरे मिनिट्स आहेत. दुसरे खालचे घ्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

तो गोषवाराच आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

होय. ती बैठक झाली होती. आणि त्यावेळेचे तात्कालीन मा. महापौर होते, उपमहापौर होते, मा. महापौर श्रीम. निर्मला सावळे - कांबळे मॅडम, उपमहापौर चंद्रकांत वैती, स्थायी समिती सभापती - स्टीवन जॉन मेंडोंसा, तत्कालीन आयुक्त सुदामराव गायकवाड, शहर अभियंता मिलिंद वाणी आणि प्रभारी सहाय्यक संचालक नगररचनाकार दिलीप घेवारे हे सहा लोक होते. आणि ह्या कमिटीचा आणि त्या सभेचा इतिवृत्तांत सोबत जोडलेला आहे की, त्या सभेमध्ये ठरले आहे. मा. महासभेमध्ये जे निर्णय दिलेले आहेत त्या पध्दतीने हे आपण करायचे. त्याचे मिनिट्स तुम्हाला दिलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तो प्रश्न नाही. आता हा विषय आला ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
त्याच्यात फक्त उपसिथती आहे. ते आहे ना.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
साहेब ही २६/०४ ची मिटींग आहे. त्याच्यात इतिवृत्तांत हा आहे. म्हणजे २१ तारखेला काय ......
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
२१ तारखेला मा. महासभा झाली. २६ तारखेला त्यांची बैठक झाली.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
साहेब, मी तेच बोलत आहे. २६ तारखेची प्रोसिडींग येथे संपली. बरोबर आहे?
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
बरोबर आहे. त्याच्यानंतर त्यांनी निविदा काढल्या.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
कोणी निविदा काढल्या?
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
विभागांनी. मा. आयुक्त साहेबांनी निविदा काढल्या. ह्या ठरावाने दिले ना.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
मा. आयुक्तांना अधिकार आहेत का?
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
ह्या ठरावाचे दिले आहे ना.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
काय दिले?
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
बी.ओ.टी. चे कामे घ्यावेत.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
इकडे कुठे उल्लेख आहे?
**मिलन म्हात्रे :-**
साहेब, तुम्ही काय सांगता? त्या तुमच्या बी.ओ.टी. च्या दुसऱ्या निविदा तुमच्या शहर अभियंता काढतो. नगररचनेने निविदा काढायला कधी सुरुवात केली? बी.ओ.टी. च्या संपूर्ण प्रकरणामध्ये श्री. घेवारे साहेबांची २५ पत्रे आहेत.
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
कामाचे निविदा बांधकाम विभागाकडून काढले गेले. तीन कामांचे नगररचनेकडून काढले गेले. जाहिरातीला ...
**मिलन म्हात्रे :-**
नाही. असे नसते.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
एक निविदा काढली. बरोबर आहे?
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
निविदा आलेल्या आहेत. मा. स्थायी समितीला सादर केल्या.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
एक निविदा बांधकाम विभागाकडून काढली. आणि हे तीन म्हणजे ४ आल्या. म्हणजे ह्या चार निविदा परत कोणाकडे गेल्या?
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
मा. आयुक्तांकडेच जातात ना.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
मग, त्या चारही निविदा मा. आयुक्तांकडे गेल्या. ह्या सहीचे काय अर्थ आहे ते विचारायचे आहे.
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
सही हे त्यांना कार्यवाही करण्यासाठी धोरण निश्चित करुन दिले.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
साहेब, हा ठराव आहे. हा ठराव पास झाला इकडे हा विषय संपला. म्हणजे तुम्हाला सांगण्याचा अर्थ आहे की, निविदा मंजुरी देताना मा. स्थायी समितीमध्ये माणसे दुसरे नव्हती.
**मिलन म्हात्रे :-**
साहेब, ११/६ तारखेला मिटींग झाली का? श्री. खतगांवकर साहेब, जरा पेपर बघा. ही ११/६ ला मिटींग झाली का? ११/६ ला नेमके काय झाले ते सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही जे म्हणतात त्या कमिटीसमोर ते टेंडर उघडण्यात आले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, ही कुठली प्रथा आली? निविदा मागवण्याच्या कमिटीला कोणी अधिकार दिला? तुम्ही मा. महासभेचे ठराव वाचा. महासभेचा ठराव आहे की, हे बी.ओ.टी. च्या बेसवर देण्यासाठी नियमावली बनवावे. त्यांना टेंडर मागवण्याचा किंवा टेंडर उघडविण्याचे सांगितलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, दुसरे एक सांगु का? ह्याच्यात जे देण्यात आलेली आहेत. ते राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आहेत आणि मंजुर करणारे पदाधिकारी आहेत. मला पण इंटीमेशन एकदम क्लिअर आहे.

**शानु गोहिल :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी वह वापस बोलीए। वह बराबर है।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्हाला थोडक्यात सांगतो. ह्याच्यावर फार चर्चा व्हायला लागली आहे. २१/१२/२००६ ला महासभेने ठराव क्र. ७२ अन्वये बी.ओ.टी. ची कामे करावी हे धोरण निश्चित झाले आहे. महासभेच्या ठरावाच्या अनुषंगाने......

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही किती तारीख सांगितली?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

२१/१२/२००६ चा ठराव आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने दि. २६/४/२००७, ११ वाजून ३० मिनिटाला मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली धोरणात्मक बैठक झाली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग त्याची प्रोसिडींग दिली नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जरा ऐका.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला अधिकारी काहीतरी भलते सलते पेपर देतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पेपर तुमच्यासमोर ........

**मिलन म्हात्रे :-**

मी तेच म्हणतोय. जरा ऐका ११/६ ला मिटींग झाली त्याचे कुठे आहे? ते वाचा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

११/६ ची मिटींग आहे ना. ते पुढे येते ना.

**मिलन म्हात्रे :-**

ते वाचा. ह्याच्यात तो वाचा ना. कुठे ११/६ दिले आहे ते वाचा. फक्त २१/६ आहे आणि २६/४ आहे. २१/१२ आणि २६/४. दि. २१/१२/२००६ चा ठराव .....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

२१/१२ ला ठराव २६/४ ला जी समिती कायम केली होती त्याची पहिली बैठक.

**मिलन म्हात्रे :-**

कुठली? इकडे तुमचे ११/६/२००७ बोलतोय.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या निविदा आल्यानंतरच्या त्या समितीची दुसरी बैठक आहे. महासभेने २१/१२/२००६ ला ठराव क्र. ७२ अन्वये एक समिती कायम करुन बी.ओ.टी. ची कामे करावी हे धोरण निश्चित केले हे मान्य आहे?

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे. आमच्या बी.ओ.टी. ला विरोध आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे, त्यांना फक्त नियमावली बनवायचा अधिकार दिला ते देण्याकरीता, नियम घेण्याकरिता म्हणजे त्यांनी जे जिथे नियम बनवले आहे. ते त्यांना अधिकार दिलेले आहेत. आणि हे नियम झाल्यानंतर आपण निविदा मागवणार. मा. स्थायी समिती हा ठराव जेव्हा मा. महासभेत येईल. महासभेत आल्यानंतर ज्या समितीनी यांच्या अटीशर्ती शिफारस केली आहे. हे महासभेला मंजुर आहे. बरोबर आहे? मा. महासभेने मान्यता दिल्यानंतर जे जे आरक्षण द्यायची आहे. ती त्या संबंधीत खात्यामध्ये बांधकाम किंवा नगररचना ज्यांना अधिकार दिला असेल किंवा मा. आयुक्तांना असेल त्यांनी निविदा मागवायची निविदा मागविल्यानंतर ती निविदा आल्यानंतर ज्यांना जास्त गरज आहे त्यांनी घ्यायची. त्या कमिटीने, स्थायी समितीने महासभेने फक्त त्या नियमावली बनवायला दिली होती.

**मिलन म्हात्रे :-**

महापालिकेच्या हिताच्या अटीशर्ती ठरवून, निविदा मागवून. कोणी मागवायच्या आहेत? साहेब, मा. आयुक्त साहेबांनी मागवायच्या आहेत. कमिटीने फक्त अटीशर्ती ठरवल्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांना फक्त अटीशर्तीसाठी दिलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आता तिकडे त्यादिवशी आमच्या बरोबर बी.ओ.टी. चे १२ एकरचे आरक्षण मोठे सगळे डेव्हलप झाले. त्यामध्ये आपल्या शहर अभियंताने निविदा काढल्या. आपल्या मा. आयुक्तांनी त्याचे प्रत्येक पार्टीवाईज त्याचे व्हॅल्युएशन काढून दिले. त्या प्रकरणात कुठेही व्हॅल्युएशन नाही. जमिनीचे पण नाही. कुठे काय तो स्ट्रक्चर बनवणार. त्याचेही काही नाही. कोणीही कोणाचे पॉवर वापरु नये. श्री. घेवारे साहेबांचे बी.ओ.टी. च्या प्रकरणात २५ पत्रे आहेत. पार्कच्या की तुम्ही ह्याचे टेंडर काढा, त्याचे टेंडर काढा. पेपरला निविदा द्या. पेपरलानोटीस द्या. मग ह्या प्रकरणामध्ये स्पेशली पॉवर्स ह्यांच्याकडे कमी दिल्या गेल्या. म्हणजे मोठ्या प्रकरणामध्ये तोच अधिकारी त्या अधिकाऱ्याला सांगतो की तु हे करायचे, तु हे लवकर आणि ह्या प्रकरणामध्ये स्वतः करतात. आम्ही विचारतो ना की, साहेब तुम्हाला काय आदेश दिले असतील तर आम्हाला त्याची कॉपी द्या. आणि हे जे तुमचे ॲज पर नियम आहेत. ते आम्ही काय करायचे ते नंतर सांगु. शहर अभियंताच हे सगळे काढू शकतो. नगररचनेने फक्त जागा ताब्यात घ्यायचे असते.

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घ्या.

**शानु गोहिल :-**

विधी अधिकाऱ्यांनी मला जरा ऑर्बिटेटर बद्दल माहिती द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

ऑर्बिटेटरचा काय अर्थच कळत नाही.

**शानु गोहिल :-**

ऑर्बिटेटर बद्दल माहिती द्या.

**मिलन म्हात्रे :-**

ऑर्बिटेटर कोण असणार?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

ते आहे ना. त्याच्यात दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना सांगु द्या ना. पुढचे मी बोलतो ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

पण बैठकीत त्याची चचार्झाली आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

नाही. त्यांना बोलू द्या. जरा सांगु द्या.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

ॲज पर क्लॉज ४० तो वाचून दाखवते. द डिस्पुट टु बी सॉल्व्ह आर्बिट्रेटींग बाय द अ पार्टी बाय अपॉईटींग अे डायरेक्टर टाउन प्लनिंग ऑर एनी कॉम्पीटंट ऑफिसर ऑफ द कॉरपोरेशन ॲन ऑर्बिटेटर.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम तुम्ही काय सुरुवात केली?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

द डिस्पुट टु बी सॉल्व्ह ऑर्बिटेटींग.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ४० वर वाचत आहात ना. तुमचं पान नंबर किती आहे?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

पान नंबर १५.

**मिलन म्हात्रे :-**

पान नं. १५ नीट परत वाचा. माझ्याकडे ४० चे जे रजिस्टर केलेले डॉक्युमेन्टस आहे ना. त्याच्यामध्ये इन केस ऑफ एनी डीस्पुट आहे.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

हो. पण ती ओळ वाचली नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ती ओळ पण वाचा. मॅडम, पण त्यांनी असा प्रश्न विचारला आहे की, ऑर्बिटेटर कोण? तर तुम्हाला ते क्लॉज वाचायची गरज नाही. त्यामध्ये कोण ऑर्बिटेटर असणार ते ........

**मिलन म्हात्रे :-**

ते पण वाचा. आपल्याला ते पण कळेल ना. ते विधी अधिकारी आहेत. पुढे तुम्ही जरा वाचा.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

ए.डी.टी.पी. किंवा कॉम्पीटंट ऑफिसर ऑफ द कॉर्पोरेशन.

**मिलन म्हात्रे :-**

ऑर्बिटेटर नंतर पुढे काय बोलतात? बिटव्हीन पुढे ते वाचा.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

इन केस ऑफ एनी डीस्पुट बिटवीन अफॉरशीट पार्टी द ॲग्रीमेन्ट द डिस्पुट टू द सॉल्व्ह आरबिईटींग बाय द पार्टीज.

**मिलन म्हात्रे :-**

आरबिट्रेटींग चा अर्थ काय ते मला व्यवस्थित सांगा.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

लवादाचा मार्गांनी.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

आर्बिट्रेनिंग म्हणजेच, लवादांनी.

**मिलन म्हात्रे :-**

लवादाच्या मार्गांनीच. पुढची लाईन काय म्हणतात? तुम्ही त्याच्या पुढे जाउ शकत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

लेखी खुलासा दिला आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम्, पुढे कोण असणार?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

ए.डी.टी.पी. ऑर ॲनी कॉम्पिटंट ऑफिसर ऑफ द कॉर्पोरेशन.

**मिलन म्हात्रे :-**

मग तो कोण असणार?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

दॅट इज टू बी डिसाईडेड बाय द पार्टीज टू द ॲग्रीमेंट आर्बिट्रेशन ॲक्ट प्रमाणे व आर्बिट्रेशनमध्ये जे पार्टीज आहेत. जर ठरवतील त्याप्रमाणे ते आर्बिट्रेटर होणार?

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये आपण जो ए.डी.टी.पी. पोस्ट तुम्ही कुठच्या पात्रतेवर टाकली? कारण बहूतेक ह्याच्यात आर्बिट्रेटर हे न्यायालय, वकील असे असतात. आता आपल्या ब्रीजचे आर्बिट्रेशनचे काम चालू आहे. ह्याच्यावर चार का सहा वकिलांचे पॅनल आहे. ज्यांनी ॲग्रीमेंट बनवले. ज्यांनी ॲग्रीमेंट सिग्नेट केले. त्याचेच नाव पहिले आहे. ते नाव टाकायलाच नाही पाहिजे. थर्ड पार्टी पाहिजे. असे काय करता? आम्ही नंदलाल साहेबांकडे कंम्प्लेंट केली. बरोबर आहे? एवढे मोठे डिपार्टमेंट आहे. पण तरी सुद्धा नाही. चौकशी थर्ड पार्टी करणार. आम्ही करणार नाही. आमच्याकडे आलेल्या तक्रारीची चौकशी सचिव साहेबांकडे सोपवून टाकली. ही थर्ड पर्सनल आहे आणि ती एक ऑथोरिटी आहे. ह्याच्यामध्ये जज वकील नेमले जातात का टाकले नाही? म्हणजे त्या अधिका-यांनी चुका केल्या. मी पहिलेच बोललो, आमच्याकरिता ही एक चांगली केस आहे आणि महापालिकेकरता पण फार सुंदर केस आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

त्याचा निर्णय घ्या आणि...

**मिलन म्हात्रे :-**

हो आणि विषय संपवून टाका. बाकी आम्हांला काय करायचे आहे ते करतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

आता ह्याच्यात संदर्भ होता की ह्याच्यामध्ये जे काही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेबांचे जे पत्र आहे. त्याच्यावर आम्हांला ठणठणीत उत्तर पाहिजे. मा. आयुक्त साहेबांनी ते पत्र दिले. कुठल्या सेक्शनने दिले.एक आमच्या ठरावानुसार महापालिकेचे कुठले आर्थिक नुकसान होणार आहे? दोन आणि तीन त्या ठरावामध्ये कुठचे बेकायदेशीर कृत्य आहे की त्याच्यात कोणी घाबरले वगैरे भीती दाखवण्याचा प्रयत्न करत आहे ते आम्हांला निर्णय अगदी पॉईंट वाईज पाहिजे. जसे त्यांनी पॉईंट वाईज विश्लेषण केले आहे. रात्री आरामशीर बसून दोन तीन वकील घेउन जसे त्यांनी पॉईंटवाईज विश्लेषण केले आहे. कल्याणवरून वकिल आणले आहेत.

**मा. सभापती सो. :-**

सचिवांनी हे पत्र वाचलेले आहे. आता जर ह्याच्यात पुढे काय करायचे असेल तर आपण महासभेत हा विषय घेउ.

**मिलन म्हात्रे :-**

कुठला?

**मा. सभापती सो. :-**

हाच विषय घेउ.

**मिलन म्हात्रे :-**

पण मा. आयुक्तांच्या पत्रावर काय आहे?

**मा. सभापती सो. :-**

मा. आयुक्तांनी तो वाचून दाखवलेला आहे. आपल्याला जर ते मान्य नसेल तर...

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्तांचे पत्र आहे ना. हे बघा हा विषय तुम्ही मा. महासभेत घेणार बरोबर आहे? तो जो ठराव आहे त्याच्याबद्दल काय?

**मा. सभापती सो. :-**

ठराव कुठला आहे?

**मिलन म्हात्रे :-**

पहिल्याचा.

**मा. सभापती सो. :-**

ठराव कायम आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग हे मा. आयुक्तांचे पत्र काय केलंत?

**मा. सभापती सो. :-**

तुम्हांला आयुक्तांचे पत्र वाचून दाखवले...

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यापुढे काय केले?

**मा. सभापती सो. :-**

ते तुम्ही मान्य करा, अमान्य करा. नाहीतर मग...

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही हे अमान्य केले का? तुम्ही अमान्य केले तर तो ठराव राहणार नाहीतर तो ठराव रद्द होणार. तुम्ही मा.आयुक्तांचे पत्र अमान्य केले आहे का?

**मा. सभापती सो. :-**

मी काही नाही. तुमच्यावर सोपवितो.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्यावर कसे सोडणार? हा विषय काय मतदानाचा नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब गेल्या मा. स्टॅण्डींग च्या मिटींगमध्ये आपण ठराव दिला. तो ठराव आपण मा. कमिशनर साहेबांकडे पाठवला. त्याच्यानंतर त्या ठरावाची अंमलबजावणी करायची की करायची नाही तो विषय मा. कमिशनर साहेबांकडे गेला. मा. कमिशनर साहेबांनी आपल्याला दोन पानांचे पत्र दिले आणि त्यांच्यामध्ये त्यांनी आपली वस्तुस्थिती मांडली. त्यांनी वस्तुस्थिती मा. स्थायी समितीसमोर मांडायला हवी होती. त्यांनी सांगितले नाही की, डिसीजन घ्या म्हणून. त्यांनी त्यांची वस्तुस्थिती मांडलेली आहे. ज्या कोणा व्यक्तिला कोर्टात जायचे आहे. काही डिसीजन घ्यायचे आहे. तो त्यांचा अधिकार आहे. आपण ठराव केलेला आहे आणि मा. कमिशनर साहेबांनी त्यांचे मत मांडलेले आहे. त्याच्यांनतर लेट देम डिसाईड ना. हा ठराव रद्द करायचा आहे की, पास करायचा आहे का इंण्डीह्यूज्वली करायचा आहे. ते मा. कमिशनर साहेब ठरवतील. आपण ठराव करून दिलेला आहे. ठराव करणे हे आपले काम आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आमचे म्हणणे सरळ आहे की, एवढा जर वेळ होता, फुरसत होती तर त्यांनी ४५१ मध्ये वरती पाठवायचा होता. आम्ही काय म्हणतोय. आमचा मुद्दा काय आहे की ह्या कायद्यानुसार ४५१ हेच एक हत्यार मा.आयुक्तांकडे आहे. ते असताना सुद्धा त्यांनी हे उद्योग का केले? हे पोरखेळ आहे का? त्यांनी करावं ना. आमचा हा ठराव जर चुकीचा आहे किंवा नुकसान देणारा आहे. काहीही असेल, भीतीने घाबरवणारा आहे. त्यांनी डिटेल विखेंडनाचे पॉईंटस लिहायचे. स्टेट गर्व्हमेंट कडे पाठवायचे. आम्हांला काय करायचे ते वरती करु. त्यांनी हे उद्योग करु नये. आम्हाला

तुमच्याकडून रुलिंग पाहिजे. हे पत्र त्यांनी सेक्शननुसार पाठवले का? एक साहेब कुठलेही पत्र कोणी देउ शकत नाही. हा पायंडा पडेल. उद्या जे मा. आयुक्त येतील ते ठराव तुम्हांला पत्र देत राहिल. त्यांना कोण ऑपोझिट पार्टी भेटणार. साहेब, बघा हो. झालं हो केलं हो. मग लगेच पत्र फेरविचाराला आले हे काय आहे? फेरविचार म्हणजे काय? स्टेट गर्व्हमेंटचे पॉवर आहेत. ते मा. आयुक्तांनी इकडे आणायचे नाहीत. मंत्रालयाकडे सरळ अपील करायचे. ते ठराव लावून द्यायचे. रिझन ह्या ठरावानुसार महापालिकेचे कोणते आर्थिक नुकसान होणार आहे? त्याच्या हेअरिंग होतात. तिकडे सुद्धा आम्ही हेअरिंगला रितसर जावू. तुमचे जे.यु.डी.चे सेक्रेटरी आहेत. त्यांच्याकडे त्यांनी विखंडनाला पाठवावे. त्याचे हेअरींग होतात त्याच्या तारखा पडतात. त्याच्यात आम्ही जाउ ना. तेच करायचे. हे करायचे नाही. म्हणून बोलतो. मा. आयुक्तांनी हे पत्र सेक्शनवाईज पाठवले का? एक ते आमचे मा. कमिशनर साहेब बोलत आहेत.

**मा. सभापती साो. :-**

म्हणून पुढे सांगितले ना. मा. महासभेत...

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, आत्ता ह्यांनी जे वक्तव्य केले की, मा. कमिशनर जे ठरवावं तर सचिवांनी कृपया मा. कमिशनर साहेबांना पत्र पाठवावं की तुम्ही हे जे काही वस्तुस्थिती मांडलेली आहे आता पुढील कारवाई तुम्ही करायची आहे. ४५१ खाली तुम्ही विखंडीत करा किंवा इंम्प्लिमेंटेशन करा.

**मिलन म्हात्रे :-**

आता महासभेत घ्यायचे आहे की घ्यायचे नाही?

**मा. सभापती साो. :-**

मी आता गप्प बसतोय.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब तुम्ही पिठासिन अधिकारी आहात. तुम्ही निर्णय दिला पाहिजे, तुम्ही सांगितले पाहिजे.

**मा. सभापती साो. :-**

माझे पत्र वाचण्याचे काम आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

यस यस. तुम्ही पत्र वाचून दाखवलेले आहे. आपण सगळ्यांनी चर्चा केलेली आहे. मत मांडलेले आहे. तुम्ही डिसीजन घ्या. अदरवाईज सदर ठराव पुढच्या सभेत घ्या.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब ते पहिले ॲग्रीमेंट त्या मनुभाईंच्या वतीनेच बनवलेले आहे. आणि आत्ता ज्याला श्री. आर. डी. शिदेंजींनी वकिली केली आहे ती त्याचीच केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब आमच्या वकिलाची नोटीस पटलावर आलेली नाही.

**नयना म्हात्रे :-**

साहेब प्रत्येक माणसाने कोर्टामध्ये जावं का? नगरपालिकेने कामकाज बघावं की वॉर्डामधले कामे करायची की कोर्टबाजी करायची?

**मा. सभापती साो. :-**

मग टाळे लावा ना. एवढे नगरसेवक आहेत ना.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब ह्या अनुषंगाने तुम्हांला नोटीस आलेली आहे. मा. आयुक्तांच्या पत्रावर.

**मा. सभापती साो. :-**

तुमची नोटीस आलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

किती तारखेला दिले?

**मा. सभापती साो. :-**

४/०२/२००८ ला दिले.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यात काय मेंशन केले आहे? ते पण वाचा. पत्र वाचले तर तेही वाचायला पाहिजे? सन्मा. सदस्य ॲड. एस. ए. खान पत्र वाचून दाखवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

किती पाने आहेत?

**एस. ए. खान :-**

१० पानं आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कन्फ्युजन सांगा. त्याच्यात काय म्हटले आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी जे मत मांडले आहे ना. मा. आयुक्तांचे मत तिथे आलेले आहेत. मा. आयुक्त साहेब त्याच्यावर निर्णय घेतील. आपल्याला त्यांचे निर्णय मान्य नसतील तर खूप प्लॅटफॉर्म पुढे आहेत ना.

**मिलन म्हात्रे :-**

आता जे हे पत्र दिलेले आहे....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आता सर्वच अशासकीय कामकाज आहे असे ठरवले तर...

**मिलन म्हात्रे :-**

ते तुमचे प्रमुख आहेत. ऐकून घ्या. ते प्रमुख आहेत. तुमचे ते वरिष्ठ आहेत. तुम्ही त्यांच्या निर्णयाविरुद्ध जाणार नाही किंवा त्यांच्या पत्राविरूद्ध जाणार नाहीत. एक लोकप्रतिनिधी म्हणून आम्हांला आज इकडे ह्याचा निर्णय पाहिजे. ही प्रथा पाळायची नाही. मा. स्टॅण्डीगमध्ये पुन्हा अशा प्रकारची उचापतीची पत्रे आली नाही पाहिजे. म्हणून ह्याच्यावरती आम्हांला निर्णय पाहिजे. की तुम्ही मा. आयुक्तांचे पत्र जर एक्सेप्ट करत असाल तर मग तो ठराव तुम्हांला रद्द करावा लागेल. एक ठराव जर कन्फर्म ठेवत असाल तर मग मा. आयुक्तांचे पत्र तुम्हांला ह्या पटलावरून काढायला लागेल. ह्याच्याबद्दल निर्णय द्या.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आत्ता इकडे मा. आयुक्त साहेब उपस्थित नाही. त्याच्यामुळे ही पत्रं आपल्यासमोर मांडणार, त्याच्यावरती चर्चा करणार पण निर्णय होणे शक्य नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पत्र पटलावरून काढण्याचा वगैरे हा विषय इकडे नसतो. त्यांनी पत्र दिलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

वस्तुस्थिती दिलेली आहे. सचिव साहेब, ह्याच्यावर निर्णय घ्यायची गरज आहे का? ऑन दी फॉर्म इन्फॉर्मेशन दिलेले आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

इन्फॉर्मेशन दिलेले नाही. फेरविचार. विषयपत्रिका वाचा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ह्याच्यावर निर्णय करु शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब तुम्ही हे पत्र इंण्डीव्ह्यूज्वली दिले आहे का की, निर्णयासाठी दिलेले आहे?

**नगरसचिव :-**

आयुक्तांकडील पत्र. हा विषय माहितीसाठी ठेवलेला आहे. मा. आयुक्त सो. मिरा भाईदर महानगरपालिका यांचे कडील पत्र आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

व कामकाज.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही काय वाचता? विषय बरोबर विचार करुन वाचा. तुम्ही एवढे का घाबरले ? विषय नीट वाचा.

**नगरसचिव :-**

मा. आयुक्त सो. मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडील दि. ३०/१/२००८रोजीचे पत्र.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्याखाली काय आहे ते नीट वाचा.

**नगरसचिव :-**

त्याच्या विषयाचा संदर्भ आहे.

**मिलन म्हात्रे :-**

फेरविचार म्हणजे काय?

**नगरसचिव :-**

तो विषय होता तसाच..

**मिलन म्हात्रे :-**

फेरविचाराचा अर्थ काय? तुमची ती डिक्शनरी आणा. आणि सांगा. जो विचार केला आहे? त्याच्यावर फेरविचार करा.

**नगरसचिव :-**

त्याच्यावर फेरविचार नाही. त्याचा जो विषय होता. तसा...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य आपले जे तक्रार पत्र होते. त्याचा संदर्भ विषय आहे. विषय बदलत नाही. विषय तोच लिहिला जातो. आता मा. आयुक्तांकडे तुम्ही ज्या पत्राने तक्रार केली होती...

**मिलन म्हात्रे :-**

साहेब मी फेरविचार करण्याकरिता पत्र दिलेले नाही. विषयांतर कशाला करता?

**तुळशीदास म्हात्रे :-**

सचिव साहेब, हे चुक झालेले आहे. आम्हांला फेरविचार नको.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हे पत्र फेरविचारासाठी दिलेले नाही. त्यांनी फक्त इंम्प्लिटेशन साठी दिलेले आहे की मा. आयुक्तांनी हे पत्र दिलेले आहे ते तुम्ही बघा. त्यांनी वस्तुस्थिती मांडलेली आहे आणि...

**मा. सभापती सो. :-**

ह्याच्यावर चुकीचे झालेले आहे. असे ते म्हणतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नाही मा. सभापती साहेब ऐका. मिरा भाईंदर माहनगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या आरक्षित जागा, बगीचे, क्रिडांगण, शाळा विकसित करणेकामी दिलेल्या मंजूरीबाबत फेरविचार करणे. (मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ५० ) म्हणजे हा गेल्या वेळेचा जो विषय आहे ना. तो विषय दिलेला आहे. आणि मा. आयुक्तांनी पत्र आहे. इंम्प्लिटेंशन साठी दिलेले आहे. निर्णय घ्यायची गरज नाही. लेट देम प्रशासनाने डिसीजन घ्यावे ना.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासन कोण?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रशासन म्हणजे हे जे पाठीमागे बसले आहेत ते.

**मिलन म्हात्रे :-**

मा. स्टॅण्डींगमध्ये ठराव झालेला पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब आपण ठराव केलेला आहे. गेल्यावेळी ठराव झालेला आहे. आणि आपण...

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या पत्राचे फेरविचार करा म्हणून असे कुठेही मांडलेले नाही आम्ही फक्त ठरावाचे पालन करा असे म्हणतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तसे नाही. तो विषय आपण...

**मिलन म्हात्रे :-**

हे पाहा. तुम्ही त्याचा निकाल काय तो द्या. त्या पत्राचे तुम्ही काय केले? जर तुम्ही पत्र ह्या पटलावरुन काढून टाकत असाल तर तसे करा. नसेल तर ठराव रद्द आहे. असे सांगा. दोघांपैकी एक काहीतरी करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एक-दोन त्या सभा कामकाजामध्ये तो विषय, पत्र आले ना. तर ते पत्र काढण्याचा विषय कुठे येतो?

**मिलन म्हात्रे :-**

मग तुम्ही ठराव ठेवला का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याच्यावर ठराव ठेवणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तो नाही. मागच्या ठरावाचे काय?

**मा. सभापती सो. :-**

तो ठराव झाला ना. तो ठराव कायम आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

काय झालं?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रथम दर्शनी मा. आयुक्तांनी त्यांचे अभिप्राय त्यांनी दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ते सगळं विसरा. ठिक आहे. पुढे केला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

यापुढे मा. आयुक्त साहेब ह्या प्रकरणात काय निर्णय घेतील ते पुढच्या सभेला करता येईल ना.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हांला त्यांच्या निर्णयाची पण गरज नाही. त्यांना पत्र दिलेले आहे. त्यांचे ह्याच्यात क्लिअर कट झालेले आहे. बिल्डरला वाचवणे. आम्हांला त्यांचा निर्णय कळला. मला एक सांगा. तुम्ही ह्या ठरावाचे काय केले? आज विषय पत्रिकेवरती हे ठेवलेत ना. ठराव कायम आहे का? ह्याचा इकडे आम्हांला निर्णय पाहिजे. आणि ठराव कायम असेल तर एक आठवडयात काय कारवाई केली.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, आपण उत्तर द्या. आता मागच्या वेळी ठराव आलेला आहे. बरोबर आहे? त्या ठरावावरती कमिशनर साहेबांनी आपले मत मांडलेले आहे आणि मा. स्थायी समितीसमोर दिलेले आहे. तर हा प्रश्न इथे सॉल्व्ह झालेला आहे. आता परत इकडे ठराव घ्यायची गरज नाही. आणि मागच्या ठरावाच्या संबंधित ऑलरेडी आपल्या मा. कमिशनर साहेबांनी इम्प्लिमेटेंशन पाठवलेला आहे.

**नगरसचिव :-**

पाठवलेला आहे.

**मा. सभापती सो. :-**

ठराव अजूनही कायम आहे.

**नगरसचिव :-**

ठराव रद्द करण्याचा इथे काहीही नाही.

**मिलन म्हात्रे :-**

काहीही नाही ना. मग आता मला प्रशासनाने सांगा. तुम्ही ठराव तुमचा मंजूर केला.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपणसुद्धा हे पत्राशिवाय आलो की नाही त्याच्यावर आपण ठाम राहिले पाहिजे. आम्ही जो ठराव केलेला आहे. इथे पत्र वाचण्याची गरजच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी ही तेच म्हणतो.

**प्रशांत पालांडे :-**

पत्र आले तर वाचायला नको का?

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

हे मांडले कुठे आहे? पत्र वाचले तर पाहिजेच वाचून झाल्यानंतर या पत्राचे काय केले? निकाल देवून टाकायचा. विषय संपला. आता एक आठवड्यापूर्वी ठराव झाला तर श्री. खतगांवकर साहेब एक आठवडयात त्याच्यावर काय कारवाई केली? का मुद्दामहून बाजूला ठेवलात?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. आयुक्त साहेबांकडे कारवाईसाठी जो ठराव दिलेला आहे. अजून विभागाकडे तो ठराव आलेला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे अजूनपर्यंत आला नाही. कायम झालेला ठराव सुद्धा एक आठवडाभर आपल्याला अजुनसुद्धा काही त्याच्यावरती आलेले नाही. म्हणजे मा. आयुक्तांनी हेतूपुरस्पर उशिर केलेला आहे ना. साहेब महत्त्वाचा विषय आहे. असे काय करता? मा. आयुक्तांनी तुम्हांला काहीतरी पत्र दिले पाहिजे. त्या अधिका-यांचे म्हणणे तरी मागवायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण तो मुद्दा सांगितला.

**मिलन म्हात्रे :-**

तो उपयोग नाही. हे करायला वेळ नाही. हे पत्र कसे चार वकिल बसुन तयार केले. तुम्ही जे दिले त्याच्यावरती काय? आणि त्याचा रिप्लाय हा आहे. लक्षात घ्या. तुम्ही जे दिले ना त्याच्यावरती कारवाई करावे लागेल म्हणून हे एक हत्यार आहे. हे पत्र साधंसुधं समजू नका. साहेब, मी स्वतः पत्र दिले की हा ठरावाचे उद्यापपासून पालन करा. पालन म्हणजे काय, चौकशी सुरु करा. त्याचे स्टेटमेंटस मागवा. काही पुरावे असतील ते घ्या. काही ठराव असतील ते मागवा. हे बाजूला राहिले भलते सलते काहीही उद्योग उरकून पत्र देउन मोकळे. कुठे बैठका होतात, कोण वकील आहेत. आम्हाला सगळे माहित आहे. आमचे लक्ष असते. ब-याचशा बंगल्यावर आम्ही बाहेर रात्री नजर ठेवतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आता चर्चा झाली ना.

**मिलन म्हात्रे :-**

आता मला सांगा. ह्या ठरावावरती इम्प्लिमेंटेशनचे कसे काय? मा. आयुक्तांना दुसरे परत एक रिमायंडर पाठवा, की ठरावामध्ये आपण जे पत्र दिले. ते पटलावर ठेवले. काहीही झाले नाही. काही झाले का? त्या पत्रानुसार आपण दुसरे काय केले का? नाही. असे पत्र मा. आयुक्त साहेबांना द्या. पुढील कारवाईसाठी सदस्यांनी अपेक्षा करा. आणि अशी पत्रे पुन्हा पाठवायचे नाही. हे मा. आयुक्तांना पावर्स नाहीत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सदर पत्र वाचून नगरसेवकांना कल्पना देण्यांत आली. एवढेच ह्याच्यावर होउ शकते. बाकी ह्याच्यावर काहीही होउ शकत नाही. किंवा ह्याच्यावर उघड अशी चर्चा झाली. ते प्रोसिडींगमध्ये येईलच.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, एखादा ठराव विखंडीत करायचे असेल ती किती साधारण कालावधी लागेल?

**ज्योस्त्ना हसनाळे :-**

तीन महिने.

**तुळशीदास म्हात्रे :-**

कमीत कमी तीन महिने लागेल.

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे मा. कमिशनर साहेबांकडे तेवढा वेळ आहे...

**मिलन म्हात्रे :-**

मी काय म्हणतो, मा. कमिशनर साहेबांकडे ४५१ आहे, तीन महिन्याचा कालावधी आहे. एवढी घाई का केली? त्यांनी त्यांचे निर्णय कळवायचे होते. आपण ठराव केला आहे. पण सकृतदर्शनी मला हे चुकीचे वाटते. त्यामुळे मी हा निर्णय देतोय. आम्हांला पत्र कसली पाठवता? किंवा स्टेट गर्व्हमेंटला विखंडीत करण्याकरिता पाठवावे.

**नयना म्हात्रे :-**

त्यांनी घाई ह्याच्यासाठी केली की आता नवीन कमिशनर येईल माझे कमिशन मला मिळणार नाही. ह्याच्यासाठी त्यांनी घाई केली असेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

नाही. इतके.... ही चर्चा अपेक्षित नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब भूक लागली आहे जेवणाची सुट्टी द्या.

**मा. सभापती साो. :-**

पुढच्या विषयावर चर्चा करा.

(नगरसचिवांना प्रकरण क्र. ४५ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

भाईंदर (पूर्व) व भाईंदर (पश्चिम) बाजार लिलाव (१२ महिन्याच्या कालावधीकरिता) अभिकर्ता (एजंट) नेमणेकामी बोली पध्दतीने लिलावास मंजुरी देणेबाबत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ह्याच्यामध्ये अभिनंदनाचा ठराव मांडायचा आहे ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब हे जे विषय वाढले आहेत. ६८ लाख रु. श्री. अजित पाटील साहेब, ६८ लाख रु. मिरा भाईंदर महानगरपालिकेने, मा. स्थायी समितीने फायदे केलेला आहे. आपले ह्याच्याबद्दल काय मत आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हांला जरा अटीशर्तीचे द्या. अटीशर्तीचे काय? सगळी अपूर्ण कागद का? सर्व मागितल्यावर देतात.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, ठराव कुणाकडे आहे.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. पाटील साहेब अटीशर्तीचे द्या.

**मा. सभापती साो. :-**

ठराव वाचून घ्या.

**शरद पाटील :-**

पण अटीशर्ती द्यावा लागतील ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

श्री. अजित पाटील साहेब ह्याच्यामध्ये अटीशर्ती पूर्वीच्याच होत्या. फक्त त्याच्यामध्ये मागच्या मा. स्थायी समितीमध्ये १० लाख रु. चे डिपॉझिट बोली बोलण्यासाठी आपण ॲड केलेले आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सर्वांना अटीशर्तीचे एकेक कॉपी द्या.

**शानु गोहिलः-**

सगळ्यांना एकेक अटीशर्तीची कॉपी असेल तर द्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

म्हणजे आपल्याला सिक्युरिटी डिपॉझिट काय ते माहित पडेल.

**शानु गोहिल :-**

सिक्युरिटी डिपॉझिट काय? कितना पैसा जमा कराया है वह मालूम पडेगा।

**शरद पाटील :-**

श्री. पाटील साहेब मा. सभापती महोदय, ह्याच्यामध्ये ४ नं. चा क्लॉज आहे. महापालिकेने घोषित केलेल्या ना फेरिवाला क्षेत्रामध्ये बाजार फी ची वसूली ठेकेदारास करता येणार नाही आणि केली तर त्याचे काय?

**तुळशीदास म्हात्रे :-**

म्हणून तर कॉपी मागितली ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

झेरॉक्सची कॉपी नंतर द्या. पहिले ह्याचे उत्तर द्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

त्याच्यावर कारवाई काय केली?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ना फेरिवाला क्षेत्रामध्ये जे फेरिवाले बसतात. त्यांच्यावर काय कारवाई होणार?

**मा. सभापती सो. :-**

जे फेरिवाले बसतात. त्यांच्याकडून आपण सगळे उचलून आणायचे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

नाही. आपली माणसे उचलायला जात नाही. ते इम्प्लिमेंट करत नाही. त्याच्याकरता त्यांच्यावरती काय कारवाई करणार?

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, हा जो विषय आणलेला आहे. दरवेळेला आपल्याला फेरिवाला झोन, ना फेरिवाला झोन ह्याच्यात तुमचे एकूण ३ ठराव आहेत. स्टॅण्डींगचे एक दोन ठराव आहेत. मा. महासभेचे अलग अलग आहेत. तुम्ही एक कुठलातरी एक व्यवस्थित संक्षिप्त ठराव आणा.

**नगरसचिव :-**

अटीशर्तीचे ठराव?

**मिलन म्हात्रे :-**

नाही. ना फेरिवाला झोन, फेरिवाला झोन तो तुम्ही जिथंपर्यंत कायम करत नाही. तिथंपर्यंत ह्यांनी केलेल्या मागण्या तुम्ही कसे काय इम्प्लिमेंटेशन करणार? पहिला फेरिवाला झोन पुढचा.

**शरद पाटील :-**

साहेब, ना फेरिवाला क्षेत्रातले झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

३ ठराव आहेत.

**शरद पाटील :-**

मी सांगतो. नवघर रोड, बी.पी.रोड, केबिन रोड, भाईंदर पश्चिमचा फक्त बाजार रोड हे रोड जे झालेले आहे. तुम्ही ते तर करा.

**मिलन म्हात्रे :-**

तो प्रश्न नाही. मी काय म्हणतो ते ऐका. ही कारवाई करा. पण फक्त एकच काहीतरी फायनल ठरवा. अधिकारी काय करतात ते उचलून आणलं. साहेब हे फेरिवाला झोनमध्ये बसले होते. ॲक्च्युअली ते ना फेरिवालामध्ये असतात. ना फेरिवाल्याचे पण उचलून आणतात आणि मग पावत्या फाडायला लागतात. तुम्ही टेंडर काढताना आज तुमचं लाखो-करोडो रु.चे इन्कम आहे. त्यांना व्यवस्थित एकच ठराव करुन द्या. स्टॅण्डींगचा करा, मा. महासभेचा करा. ते पहिले सगळे ठराव रद्द करा आणि एकच व्यवस्थित करुन देउन टाका म्हणजे त्या अधिका-यालासुद्धा कारवाई करायला बरे पडेल ना.

**मा. सभापती सो. :-**

दोन्हीचे ठराव सारखेच आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब भाईंदर पश्चिम आणि भाईंदर पूर्व ह्या २ ठरावामध्ये डिस्टर्ब झालेले आहेत की भाईंदर पूर्वेला जो आहे ना तो ठराव झालेला आहे तो बरोबर झालेला आहे. भाईंदर पश्चिमेचा जो ठराव आलेला आहे ना तो

चुकीचा झालेला आहे. मा. स्थायी समितीचा ठराव आणि मा. महासभेचा ठराव ह्या दोघांमध्ये विसंगती आढळून आलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आता आमचे राम मंदिर रोडवर फेरिवाले बसतात. तो ना फेरिवाला झोनमध्ये आहे. अजून बसतात. मोठा अख्खा बाजार बसतो.

**शरद पाटील :-**

भाईंदर पश्चिम खालील "अ" वाजवी किंवा किरकोळ विक्रेता आदी फेरिवाले यांना परवानगी देता येत नाही. असे नाव दिलेले आहेत ना.

**मिलन म्हात्रे :-**

कुठली कुठली जरा सांगा.

**शरद पाटील :-**

भाईंदर स्टेशन ते पोलिस चौकीपर्यंत, फाटक ते पोलिस स्टेशनपर्यंत, जनता मैदानाकडे जाणारा रस्ता, जैन मंदिरच्या बाजूने देवचंद नगरकडे जाणाऱ्या दोन्ही गल्ल्या सदर रस्तेच्या दोन्ही बाजूस स्टॉल व टपऱ्या लावण्यास मनाई आहे. राम मंदिर रोडवर फेरिवाले बसू नये, मोदी पटेल रोडवर फेरिवाले बसू नये. वरील रस्त्यावर दोन्ही बाजूचे स्टॉल, टपऱ्या स्थलांतर करण्यात यावेत. तसेच अटीशर्तीचे भंग झाले असल्यास संबंधित स्टॉल अथवा टपऱ्या आदीचे परवाने रद्द करण्यात यावे.

**मिलन म्हात्रे :-**

त्या अटीशर्ती बनवण्याकरिता तुम्हांला सुप्रीम कोर्टापासून काही नियम आणि आदेश आहेत. तुम्ही ठरवले तर तसे होत नाही.

**शरद पाटील :-**

आम्ही ठरवत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही सांगतो तो ठराव त्याच्यात सुद्धा ऐका. सगळ्यात पहिले आम्ही मा. स्थायी समितीला मी ते ठराव दिले होते. अधिकाऱ्यांनी ती नीती वापरली नाही. त्या ऑर्डरचे इम्प्लिमेंटेंशन केले नाही ते करा आणि व्यवस्थित ठराव आणून द्या. त्याच्यामध्ये काय लिहिले आहे माहित आहे का? एखाद्या प्रमुख वॉर्डाला तुम्ही जेव्हा बंधन घालता तेव्हा आतले जे सर्व्हिस रोड असतात. त्याच्यावरती वन साईडला तुम्ही कुठेतरी ऑकॉर्ड करुन दिले पाहिजे. हे सुप्रीम कोर्टाचे जजमेंट आहेत. आणि त्यानुसार आपल्याला पालन करायचे आहे. ते त्याचेकडे मी सगळं आणून दिले. त्याचे पालन कोण करते आता राम मंदिर रोडला आमच्याकडे मैता काढायला भारी पडले. धार्मीक सण वगैरे तो रस्ता आमचा मुख्य आहे. एखादी व्यक्ती जर मेली तर बाजार उठवायचे का? सकाळी उभा राहून.....

**शानु गोहिल :-**

मा. सभापती साहेब, गेल्या १५ वर्षापासून फेरिवाले जेसल पार्कच्या लेफ्ट साईडला बसतात. आता राईट साईडला पण बसायला त्या लोकांनी सुरुवात केली. त्याच्याबद्दल काय कारवाई करणार?

**तुळशीदास म्हात्रे :-**

पण हायकोर्टाचे निकष आहेत......

**शानु गोहिल :-**

तरीसुद्धा ते बसतात ना. अगोदर बसत नव्हते आता बसायला सुरुवात केली.

**शरद पाटील :-**

आपल्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून कसलीच कारवाई होत नाही. स्पष्ट म्हणणे आहे. म्हात्रे साहेब, एस.पी. साहेब येथे २ तास येउन गेलेले आहे. तर दोन तासांनी एस.पी. साहेबांनी सांगितले मी कारवाई केल्यानंतर महापालिकेने त्याच्यावर कारवाई केली पाहिजे. त्या लॉजिंगवर तर आपल्या महापालिकेकडून कारवाई होत नाही. पोलिस स्टेशनकडून कारवाई झाली. आपल्याकडून का कारवाई होत नाही? एस.पी. साहेबांनी इथे येउन थांबून सांगितले. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी तर आपल्या अधिकाऱ्यांचे इथेच त्यांच्यासमोर काढले. म्हणजे ते खरे बोलले. एस.पी. साहेब बोलले. तो माणूस खरं बोलतोय एकही कारवाई होत नाही. का होत नाही?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

२० पत्रे पाठवली आहेत आणि ते बोलले की साहेब आम्ही जे करतोय त्याच्यावर तुम्हांला पुष्कळ राईटच आहेत. आणि त्यांना जागं केल्यानंतर महापालिकेला ५० राखीव आहेत. लॉज बंद करण्याचा पण पाणी बंद करण्याचा पण

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

जे आता प्रभाग अधिकारी बसले असतील ना. त्यांना जरा विचारा की कारवाई का करत नाही?

**शरद पाटील :-**

म्हणजे आपण पोलिसांवर ठपका प्रत्येक वेळेला ठेवतो. पोलिसांचे तर असे म्हणणे आहे की, आम्ही येतो आम्ही आल्यानंतर तुमची ही कारवाई बाकी आहे की, ती कारवाई बाकी आहे. हे पत्र घ्यायचे आहे त्याच्यात दोन वाजवतात कशासाठी?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य शरद पाटील साहेब, विषय भरकटलेला आहे. तो विषय चेंज झालेला आहे.

**प्रशांत पालांडे :-**

त्यांचे म्हणणे असे होते...

**शानु गोहिल :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने मी ठराव वाचते.

**मिलन म्हात्रे :-**

ठरावामध्ये रक्कमांचा उल्लेख झाला पाहिजे. एका गोषवा-यामध्ये दोन झिरो कमी टाकल्यानंतर तो तुमचे येते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मग टाका ना.

(सन्मा. सदस्या श्रीम. शानू गोहिल यांनी प्रकरण क्र. ४५ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**शानु गोहिल :-**

उपरोक्त विषयाबाबत मा.आयुक्त महोदयांनी सादर केलेल्या गोषवा-यांचे वाचन करण्यांत आले आहे. सदर प्रकरणाबाबत **मा. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक १६, दि.०३/०१/२००८** अन्वये जाहीर बोली पध्दतीने लिलाव करण्याचेनिश्चित केल्यानुसार **"दै.लोकमत"** व **" दै. सागर"** वृत्तपत्रात **दि. १५/०१/२००८** रोजी जाहीर निविदा प्रसिध्द करुन खालीलप्रमाणे ठेकेदारांनी जाहीर लिलावात भाग घेऊन बोलीची रक्कम बोलली आहे.

**<u>भाईंदर (पुर्व) विभाग :- देकाराची रक्कम रु. ९२,५५,७९५/-</u>**

| अ.क्र. | लिलावात भाग घेणा-या अर्जदारांचे नांव | लिलावात केलेली जाहीर बोलीची रक्कम (आकडे लाखात) | |
|---|---|---|---|
| १ | मे. दत्तछाया कंस्ट्रक्शन कंपनी<br>श्री. शेखर एस. शिंदे (ठाणे) | ---- | <u>९९.१५</u> |
| २ | मे. आदित्य एन्टरप्रायझेस | ---- | ---- |
| ३ | मे. रिध्दीका एन्टरप्रायझेस | ---- | ---- |
| ४ | मे. ललित कंस्ट्रक्शन | **९७.५०** | ---- |
| ५ | श्री. प्रेम चौहाण | **९६.००** | ---- |
| ६ | मे. एस. एस. एन्टरप्रायझेस | **९७.७५** | ---- |
| ७ | श्री. रविराज राठोड | ----- | ---- |
| ८ | श्री. शरद माधवराव दहेरकर | **९९.००** | ---- |
| ९ | मे. संकल्प ट्रेडिंग कंपनी | **९८.२५** | ---- |
| १० | श्री. सायमन बस्त्याव आल्मेडा | **९९.१०** | ---- |

**<u>भाईंदर (पश्चिम) विभाग :- देकाराची रक्कम रु. ८५,२१,०२५/-</u>**

| अ. क्र. | लिलावात भाग घेणा-या अर्जदारांचे नांव | लिलावात केलेली जाहीर बोलीची रक्कम (आकडे लाखात) | |
|---|---|---|---|
| १ | मे. रिध्दीका एन्टरप्रायझेस | ---- | <u>९९.००</u> |
| २ | मे. ललित कंस्ट्रक्शन | ---- | ---- |
| ३ | मे. एस. एस. एन्टरप्रायझेस | ---- | ---- |
| ४ | श्री. शरद माधवराव दहेरकर | ८६.०० | ---- |
| ५ | श्री. अतुल प्रभाकर ठाकूर | ९४.०० | ---- |
| ६ | मे. संकल्प ट्रेडिंग कंपनी | ९८.८० | ---- |
| ७ | श्री. सायमन बस्त्याव आल्मेडा | ९८.७५ | ---- |
| ८ | मे. आशापुरा कंस्ट्रक्शन कंपनी | ९२.०० | ---- |

वरीलप्रमाणे **भाईंदर (पुर्व)** विभागाकरिता **मे. दत्तछाया कंस्ट्रक्शन कंपनी, ठाणे** यांची सर्वात जास्त दराची बोलीची रक्कम **रु. ९९,१५,०००/-** आहे. तसेच **भाईंदर (पश्चिम)** विभागाकरिता **मे. रिध्दीका एन्टरप्रायझेस** यांची सर्वात जास्त दराची बोलीची रक्कम **रु. ९९,००,०००/-** आहे. वरीलप्रमाणे जाहीर बोलीतील प्राप्त झालेल्या रक्कमा या महानगरपालिकेने निश्चित केलेल्या देकारापेक्षा जास्तीच्या आहेत.

जाहीर बोलीतील प्राप्त झालेल्या रक्कमा जास्तीच्या असल्याने, अनुक्रमे **भाईंदर (पुर्व)** विभागाकरीता **मे. दत्तछाया कंस्ट्रक्शन कंपनी आणि भाईंदर (पश्चिम)** विभागाकरिता **मे. रिध्दीका एन्टरप्रायझेस** यांना दि. १६ फ्रेबुवारी-२००८ पासून १२ महिन्याच्या कालावधीकरीता **"बाजार फी"** वसुलीकरिता ठेका देण्यास मा.स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

मा. स्थायी समितीने बोली पध्दतीने घेतलेल्या निर्णयामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले असल्याने मा. स्थायी सभापती व सन्मा. सदस्याचे ही सभा अभिनंदन करीत आहे. तसेच महानगरपालिकेने **"ना-फेरीवाला क्षेत्र"** घोषित केलेले आहे. त्या क्षेत्रात फेरीवाल्याना बसण्यास मनाई केलेली आहे. **"ना-फेरीवाला क्षेत्रात"** फेरीवाले बसल्यास फेरीवाल्याविरुध्द अतिक्रमण नियंत्रण विभागाने त्यावर प्रभावीपणे कार्यवाही करावी. कोणत्याही परिस्थितीत **"ना-फेरीवाला क्षेत्रात"** फेरीवाले बसणार नाहीत, याबाबत अतिक्रमण विभागाने दक्षता घेऊन कारवाई करण्यांत यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, ह्यामध्ये दोन सुचना होत्या. एक सुचना ह्या ठरावाला जेव्हा कमी दराची निविदा आली. मा. स्थायी समितीने निर्णय घेतल्यानंतर आज महापालिकेचा ६६ लाख रु. चा फायदा झाला आहे. त्यामुळे मा. स्थायी समितीच्या सभापती साहेबांच्या अभिनंदनाचा ह्याच्यात उल्लेख करा. दुसरा आपला जो अतिक्रमणाचा विषय निघाला. म्हणजे जिथे फेरिवाले बसतात. अतिक्रमण विभागाकडे आपली १०० पेक्षा जास्त माणसे आहेत. त्यावेळी जिकडे ना फेरिवाला झोन आहे. त्यावेळी तिकडे बसले आणि किमान नगरसेवकांनी तक्रार केली तर त्याच्यावर लक्ष अतिक्रमण विभागाने दिले पाहिजे. तिकडे आम्ही बघायला जाणार नाही.

**शानु गोहिल :-**

नगरसेवकोंने तक्रारी नही करने का। अधिकारीयोंने वहाँ जाके कारवाई करनी चाहिए। नगरसेवक तक्रार करे या ना करे।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ना फेरिवाला झोनमध्ये फेरिवाले बसल्यावर अधिका-यांनी कारवाई करावी. असे त्याच्यामध्ये उल्लेख करा.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, ह्याच्यामध्ये एक उल्लेख नाही की ना फेरिवाले क्षेत्रामध्ये जर बाजार फी वसूल केली तर त्याबद्दल ठेकेदारावर काय कारवाई करणार?

**मा. सभापती सो. :-**

काय करणार? एवढे वर्ष असेच चालले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

पण काहीतरी करायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही सांगितले पाहिजे. असे होणार नाही नियम टाकायला पाहिजे.

**मा. सभापती सो. :-**

नियम टाकले आहेत ना.

**शरद पाटील :-**

साहेब वसूली केल्यावर आपण ठेकेदारावर काय कारवाई करणार?

**मा. सभापती सो. :-**

आपला ठराव करुन झालेला आहे. ॲग्रीमेंट करुन देताना त्याच्यात सर्व रुलिंग मिळाली.

**मिलन म्हात्रे :-**

मनुभाई वर कारवाई गेली निघुन.....

**मा. सभापती सो. :-**

अतिक्रमण विभागाने ह्याच्यावरती सतत कारवाई करावी. सदर ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४५ :-**

भाईंदर (पूर्व) व भाईंदर (पश्चिम) बाजार लिलाव (१२ महिन्याच्या कालावधीकरिता) अभिकर्ता (एजंट) नेमणेकामी बोली पध्दतीने लिलावास मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. ३४ :-**

उपरोक्त विषयाबाबत मा.आयुक्त महोदयांनी सादर केलेल्या गोषवा-यांचे वाचन करण्यांत आले आहे. सदर प्रकरणाबाबत **मा. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक १६, दि.०३/०१/२००८** अन्वये जाहीर बोली पध्दतीने लिलाव

करण्याचेनिश्चित केल्यानुसार **"दै.लोकमत"** व **" दै. सागर"** वृत्तपत्रात **दि. १५/०१/२००८** रोजी जाहीर निविदा प्रसिध्द करुन खालीलप्रमाणे ठेकेदारांनी जाहीर लिलावात भाग घेऊन बोलीची रक्कम बोलली आहे.

**भाईंदर (पुर्व) विभाग :- देकाराची रक्कम रु. ९२,५५,७९५/-**

| **अ.क्र.** | **लिलावात भाग घेणा-या अर्जदारांचे नांव** | **लिलावात केलेली जाहीर बोलीची रक्कम (आकडे लाखात)** | |
|---|---|---|---|
| १ | मे. दत्तछाया कंस्ट्रक्शन कंपनी<br>श्री. शेखर एस. शिंदे (ठाणे) | ---- | **९९.१५** |
| २ | मे. आदित्य एन्टरप्रायझेस | ---- | ---- |
| ३ | मे. रिध्दीका एन्टरप्रायझेस | ---- | ---- |
| ४ | मे. ललित कंस्ट्रक्शन | **९७.५०** | ---- |
| ५ | श्री. प्रेम चौहाण | **९६.००** | ---- |
| ६ | मे. एस. एस. एन्टरप्रायझेस | **९७.७५** | ---- |
| ७ | श्री. रविराज राठोड | ----- | ---- |
| ८ | श्री. शरद माधवराव दहेरकर | **९९.००** | ---- |
| ९ | मे. संकल्प ट्रेडिंग कंपनी | **९८.२५** | ---- |
| १० | श्री. सायमन बस्त्याव आल्मेडा | **९९.१०** | ---- |

**भाईंदर (पश्चिम) विभाग :- देकाराची रक्कम रु. ८५,२१,०२५/-**

| **अ. क्र.** | **लिलावात भाग घेणा-या अर्जदारांचे नांव** | **लिलावात केलेली जाहीर बोलीची रक्कम (आकडे लाखात)** | |
|---|---|---|---|
| १ | मे. रिध्दीका एन्टरप्रायझेस | ---- | **९९.००** |
| २ | मे. ललित कंस्ट्रक्शन | ---- | ---- |
| ३ | मे. एस. एस. एन्टरप्रायझेस | ---- | ---- |
| ४ | श्री. शरद माधवराव दहेरकर | ८६.०० | ---- |
| ५ | श्री. अतुल प्रभाकर ठाकूर | ९४.०० | ---- |
| ६ | मे. संकल्प ट्रेडिंग कंपनी | ९८.८० | ---- |
| ७ | श्री. सायमन बस्त्याव आल्मेडा | ९८.७५ | ---- |
| ८ | मे. आशापुरा कंस्ट्रक्शन कंपनी | ९२.०० | ---- |

वरीलप्रमाणे **भाईंदर (पुर्व)** विभागाकरिता **मे. दत्तछाया कंस्ट्रक्शन कंपनी, ठाणे** यांची सर्वात जास्त दराची बोलीची रक्कम **रु. ९९,१५,०००/-** आहे. तसेच **भाईंदर (पश्चिम)** विभागाकरिता **मे. रिध्दीका एन्टरप्रायझेस** यांची सर्वात जास्त दराची बोलीची रक्कम **रु. ९९,००,०००/-** आहे. वरीलप्रमाणे जाहीर बोलीतील प्राप्त झालेल्या रक्कमा या महानगरपालिकेने निश्चित केलेल्या देकारापेक्षा जास्तीच्या आहेत.

जाहीर बोलीतील प्राप्त झालेल्या रक्कमा जास्तीच्या असल्याने, अनुक्रमे **भाईंदर (पुर्व)** विभागाकरीता **मे. दत्तछाया कंस्ट्रक्शन कंपनी आणि भाईंदर (पश्चिम)** विभागाकरिता **मे. रिध्दीका एन्टरप्रायझेस** यांना दि. १६ फ्रेबुवारी-२००८ पासून १२ महिन्याच्या कालावधीकरीता **"बाजार फी"** वसुलीकरिता ठेका देण्यास मा.स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

मा. स्थायी समितीने बोली पध्दतीने घेतलेल्या निर्णयामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले असल्याने मा. स्थायी सभापती व सन्मा. सदस्याचे ही सभा अभिनंदन करीत आहे. तसेच महानगरपालिकेने **"ना-फेरीवाला क्षेत्र"** घोषित केलेले आहे. त्या क्षेत्रात फेरीवाल्याना बसण्यास मनाई केलेली आहे. **"ना-फेरीवाला क्षेत्रात"** फेरीवाले बसल्यास फेरीवाल्याविरुध्द अतिक्रमण नियंत्रण विभागाने त्यावर प्रभावीपणे कार्यवाही करावी. कोणत्याही परिस्थितीत **"ना-फेरीवाला क्षेत्रात"** फेरीवाले बसणार नाहीत, याबाबत अतिक्रमण विभागाने दक्षता घेऊन कारवाई करण्यांत यावी.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल. अनुमोदक :- श्रीम. सुनिता पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४६ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४६, भाईंदर (पूर्व) व भाईंदर (पश्चिम) बाजार लिलाव (१२ महिन्याच्या कालावधीकरिता) अभिकर्ता (एजंट) नेमणेकामी बोली पध्दतीने लिलावास मंजुरी देणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, मा. महासभेत प्रश्न आला होता की ह्या हॉस्पिटलसाठी यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी त्यावेळी आर्थिक-प्रशासकीय, आर्थिक बाब नसल्याने मा. सचिव साहेब बरोबर आहे? हा ठराव फेटाळला गेला. मिरारोडच्या हॉस्पिटलसाठी......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

हा हॉस्पिटलचा विषय नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही. मला माहित आहे ना.

**प्रशांत पालांडे :-**

त्यांचे म्हणणे बरोबर आहे. त्यावेळी निधी नव्हती म्हणून यंत्रसामुग्री खरेदी करावयाची नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यावेळी निधी नव्हती. म्हणून यंत्रसामुग्री खरेदी करायची नाही आणि अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा ठराव आणला.आज तेव्हा कुठल्या फंडामध्ये त्याचे फंड होते. त्यावेळी प्रशासनाने का सांगितले की, यंत्रसामुग्री आम्ही हे पैसे इथे वर्गीकरण करुन परत यंत्रसामुग्री तुम्ही भिंत बांधतात, माती भराव करतात. कशासाठी? त्या हॉस्पिटलला यंत्र पाहिजे, सामुग्री पाहिजे. लिफ्टसाठी आम्ही २५ लाख रु. दिले. आज तुम्ही १७ लाख रु. लागतात. ह्याच्यावर ....

**एस. ए. खान :-**

ही चर्चा आहे. बरोबर आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उस वक्त प्रशासन सोया था क्या? त्यावेळी मा. महासभेमध्ये अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रस्ताव आला. आर्थिक बाब नसताना ही विषय कसा आणला?

**शरद पाटील :-**

अधिकाऱ्यांनी आम्हांला सांगावं ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आज तुमच्याकडे तरतुद कुठली आली? त्यावेळी तुम्हांला काय बोलता आले नाही आणि आजपर्यंत तुम्ही असे विषय मा. महासभेमध्ये का आणले नाही? की यंत्रसामुग्री खरेदीसाठी असे असे पैसे आमच्याकडे शिल्लक आहे. त्याच्यातून आम्ही करतो. म्हणजे शेवटी उद्दिष्ट काय आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

यंत्रसामुग्रीचा तो विषय कितीचा होता?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब मी काय म्हणतो? हे १७ लाख रु.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

साहेब हे सर्व पगाराच्या रक्कमा आहेत. विकासकामाच्या रक्कमा नाहीत. ह्याच्यात तरतुदी आहेत. त्या निव्वळ पगाराच्या आहेत. विषय तो नाही. म्हणजे हे तिकडे वर्ग करायचा होता. असे म्हणायचे होते का?

**शरद पाटील :-**

वर्ग करायचा विषय नाही. त्यावेळी काय सांगितले? त्यावेळेला तिथे वक्तव्य केले. ते वक्तव्य करुन इथे दाखवा ना. अधिकाऱ्यांनी सांगावं ना. त्यावेळेला लेखाविभागाने सांगितले का? की तिकडे तरतुद नाही म्हणून...

**एस. ए. खान :-**

ते जे निघालेले ना. ते सांगा ना. काय तरतुद होती?

**शरद पाटील :-**

म्हणजे त्यावेळी का तरतुद नव्हती? तरतुद आता कुठून आली? आपण त्याच्यामध्ये २ अधिकाऱ्यांना सस्पेन्ड केले, कार्यमुक्त केले.

**एस. ए. खान :-**

पथकर किती वसूल झाला आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा लेखाविभागाचा विषय नाही.

**एस. ए. खान :-**

तो लेखाविभागाचा विषय आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमचा विषय काय आहे...

**प्रशांत पालांडे :-**

मॅडम, लिफ्ट ४५ लाख रु. हूआ है।

**शानु गोहिल :-**

तभी अमाउंट ज्यादा था ना। अभी अमाउंट ज्यादा नही है?

**प्रशांत पालांडे :-**

वह ४५ लाख रु. यह १७ लाख रु. है। बाद में और भी है ना।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही काय मुद्दा मांडत आहेत ते मला माहित नाही.

**प्रशांत पालांडे :-**

कसे आहे? त्यावेळी हॉस्पिटलचे जे कर्मचारी आणि ते आतमध्ये जे ऑपरेशन थिएटर इन्स्ट्रूमेंटस्साठी दोन ठराव आले होते. मा. महासभेमध्ये त्यावेळी आर्थिक तरतुद नाही. म्हणून त्यावेळी ते ठराव फेटाळले. आणि तो ठराव आणणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाईचे वगैरे ते सगळे झाले होते. आता मागे आम्ही लिफ्टसाठी ४५ लाख रु. मंजूर केले. आता हे पुन्हा करतोय. पुढे अजून आहेत. तुमच्याकडे हे फंड अव्हेलेबल असताना त्यावेळी मा. महासभेमध्ये विषय का फेटाळला गेला होता? त्यावेळी आर्थिक तरतुद नव्हती म्हणून दाखविले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्या फंडमुळे ते फंड अव्हेलेबल आहेत असे वाटते का?

**प्रशांत पालांडे :-**

त्यासाठी पण ॲप्रोप्रिएशन झाले असते ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कोणत्या?

**प्रशांत पालांडे :-**

पैसे अव्हेलेबल होते ना. तेव्हा पण रिॲप्रोप्रिएशन करता आले असते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पण ह्याच्यावर रिॲप्रोप्रिएशन तशी कोणी केली नाही ना.

**प्रशांत पालांडे :-**

करायला पाहिजे होती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही नकारार्थी कशाला चर्चा करता? तुम्ही कोणी मागितले तर नकारार्थी कोण चर्चा करणार?

**प्रशांत पालांडे :-**

हॉस्पिटलची अमाउंट किती होती?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कोटी रु.च्यावर होती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दोन वेळा दिली. २५ लाख रु. रु. लिफ्टला दिली. आता हे १७ लाख रु...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आता आपण हे दवाखान्यासाठी वर्गीकरण करत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही बोलणार आम्हांला माहित पडणार आहे. आता माती भराव केला नाही म्हणून माती भरावाचे पैसे इकडे टाका. असे करता ना. ह्यात आपण आधी लिफ्टसाठी पैसे आणले. हे कुठून पैसे आणले? आता कुंपणाचा विषय आहे. माती भराव भिंत आहे...

**प्रशांत पालांडे :-**

ते रिॲप्रोप्रिएशन लिहून आणले का?

**नयना म्हात्रे :-**

आमच्या मुर्धाचा ब्रिज एवढा तुटायला आला आहे. ॲक्सिडेंट होतात. त्याच्यावर लक्ष नाही. आणि हॉस्पिटलचा जो विषय आहे तो पहिला पास झाला पाहिजे. कमालची गोष्ट आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. खतगांवकर साहेब, म्हणजे अस्थायी आस्थापनाचा खर्च शिल्लक आहे. तो हॉस्पिटलच्या कामाकरता करता येत नाही का असे आहे का? म्हणजे मला सांगितले तर बरे होईल. माझा विषय संपला.

**प्रशांत पालांडे :-**

करु शकतो ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मा. महासभेत करता येतो. स्थायी समितीच्या शिफारशीने...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बरोबर आहे. म्हणजे आता तुम्ही सहज विषय आणतात. मा. महासभेला ज्यावेळी यंत्रसामुग्री आवश्यकता होती. त्यावेळी हे सर्व का सांगितले गेले नाही की, पैसे शिल्लक आहे. त्यावेळी स्थायी समितीकडून मंजूरी घेउन मा. महासभेत का विषय आणला नाही? आतापर्यंत पण का आणला नाही? हॉस्पिटल चा पैसा आहे आणि तुम्ही दुसऱ्या ठिकाणी फिरवता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

हॉस्पिटलच्या विकास कामाचा हा पैसा नाही. हा पैसा पगाराचा पैसा आहे. त्या हेडला वर्ग करण्याचे मा. स्थायी समितीला अधिकार आहेत. म्हणून हा विषय आणला आहे आता त्याविषयाशी का आणला नाही. ते विभागाशी चर्चा करायला पाहिजे. तो पुढचा विषय आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पगाराच्या पैशावर करता येत नाही का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

पगाराच्यावरती कसे करता येतात?

**मिलन म्हात्रे :-**

हा जो विषय आला आहे ना. त्यांचे म्हणणे अगदी बरोबर आहे. मी त्यावेळेलासुद्धा सांगितले होते की जी माणसे आपल्याला आता...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

तो विषय न फेटाळता बहुमतांनी पेंडिंग ठेवून ॲप्रोप्रिएशन चा प्रस्ताव सादर करावा असा निर्णय व्हायला पाहिजे होता ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सांगितले पाहिजे ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आता ते जे निर्णय होतील त्यांची इथे चर्चा कशी करता येईल?

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासनाने खिशामध्ये काय आहे तेवढे बोलायचे असते. जर नसेल तर नाही बोला. जर असेल तर हो बोला. त्या प्रस्तावातसुद्धा आम्ही आमच्या ग्रुपला पण सांगितले होते की हॉस्पिटलचे काम आहे. जिकडे १४० आहे. त्याच्यावरती ४० घ्या. १०० नंतर घ्या. हे कसे आहे. लग्न होण्याच्या अगोदरच साडी चोळी तयार आहे. अजून डॉक्टर यायचे बाकी आहे. हॉस्पिटल तयार आहे. कोर्टाची ऑर्डर असूनसुद्धा तिकडे आमच्याकडे पोस्टमार्टम रुमचा अजून ठिकाणा नाही. आमच्याकडे कोर्टाची ऑर्डर आहे. ६ आठवडयाच्या आत तुमच्या हॉस्पिटलचे काम सुरु झाले पाहिजे. इकडे कसलाही ठिकाणा नाही. रेल्वे इकडच्या डेथबॉड्या वसईला नेतात आणि आपल्या इकडच्या पालीला नेतात. राहता राहिला ठाण्याला आणतात. तुम्ही सत्यनारायणाची पुजा घालू नका.

**एस. ए. खान :-**

त्याची माहिति द्या की तुम्ही जी पथकावर वगैरे लावले आहे. किती पैसे वसूल झालेले आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कशाचा विषय घेतला?

**एस. ए. खान :-**

तोच विषय आहे. होमगार्ड वगैरे कुठे लावले आहे? त्याच्यामध्ये होमगार्ड दिले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. खतगांवकर साहेब मी जो विषय मांडलेला आहे. म्हणजे तुम्ही सांगितले...

**मा. सभापती सो. :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, एकच विषय पकडू नका. आता काहीतरी बोला ना.

**मिलन म्हात्रे :-**

आता मी मगाशी बोललो. मी काय बोलायला लागलो ना. तर बरच काही बोलीन. प्रश्न तो नाही. आता मला सांगा हॉस्पिटलचे तिकडे मंजूरी दिली नाही. अगोदर सगळं बांधायला लावलेत. आज तुम्ही तुमची घरची बिल्डिंग अपुरे ठेवाल का? तुमची कन्स्ट्रक्शन कॉस्ट चा व्याज किती आहे? तुमच्या लेखाविभागाने त्या मिटींगमध्ये द्यायला पाहिजे. आज जे स्ट्रक्चर उभे केले. जमिनीची किंमत स्ट्रक्चरचे पैसे त्याच्यावर चालणारे बाजार मुल्यांवर व्याज आणि महानगरपालिका किती लॉसमध्ये आहे. साहेब त्यावेळी आम्ही बोललो. आपल्या ग्रुपमध्ये पण बोललो. आज ऐकून घ्या. आमच्यावर त्यावेळी टिका पण झाली. आम्ही बोलतो १४० च्या ऐवजी एक स्टाफ घ्या. जो अगदी इमरजन्सी सेवेतला आहे. १४० च्या ऐवजी कमसे कम ३०, ४० तर घ्या. मी मा. मुझफ्फर साहेबांच्या मम्मीला पण बोललो, हे चुकीचे चालले आहे. ४० ला मंजूरी द्या. ती तिकडे पाठवा ती काय वर्ष वर्ष येत नाही. एवढयाला ती आली असती. मी काय बोलणार. आम्ही हतबल राहिलो तुमच्यामुळे आम्हांला टिकेचा मार सहन करावं लागतं. आमच्या ह्याला विरोध नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. खतगांवकर साहेब आता तुम्ही हे सांगितले की हे पगाराचे पैसे आहेत. पुढे तुमच्याकडे आरक्षित जागा माती भराव ह्याच्यासाठी शिल्लक आहे. आमचे असेच म्हणणे आहे, ज्या पद्धतीने हे माहित होते की स्थायी समितीमध्ये आणून ते पैसे यंत्र सामुग्रीमध्ये हे करुन नंतर महासभेत प्रस्ताव आणू शकतो अशी त्यावेळी टिप्पणीमध्ये कोण आज ही सांगत नाही. कुठल्या कुठल्या हेडमध्ये दवाखान्याखाली किती पैसे शिल्लक आहे? म्हणजे तुम्ही माती भराव कराल, लिफ्ट कराल हे कोणासाठी? तिकडे माणसे नसेल, यंत्र नसेल, डॉक्टर नसेल तर तुम्हांला यंत्राचं काय काम राहणार आहे?

**एस. ए. खान :-**

पुढच्या वेळेला पूर्ण माहिती आणा ना.

**गोविंद परब :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेतील पथकर ऑक्टोंबर २००७ मध्ये अजून चालू झालेले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हांला लेखी पाहिजे. असे नाही पाहिजे. तुम्ही कसलं वाचता? पाहिजे तर आम्ही विषय थांबवतो. आम्ही विचारले तर तुम्ही प्रत्येकवेळी विषयाचा अपमान करता का? तुम्ही आम्हांला लेखी द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे पहा पथकर सँक्शन होत नसेल. जे मा. आयुक्तांच्या अधिकारामध्ये पथकर सुरु केलेले आहे. ठेक्याचे जे काही होमगार्ड घेउन जिल्हा समावेशक ॲक्टप्रमाणे, तर ते मला नाईलाजाने बंद करावे लागतील. पगार होत नसेल तर मग...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब वेळोवेळी सांगून...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ऐकून घ्या. जी वस्तुस्थिती आहे. ते जी आपल्या समितीसमोर आणलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब आमचे हे म्हणणे नाही. आता बोलायला उठले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. आयुक्त साहेबांच्या अधिकारात जे मा. महासभेने निर्देश दिल्यानंतर एस्कॉट सुरु केलेले आहे. जर हे सभागृहाला मान्य नसेल तर मी उद्यापासून तो एस्कॉट बंद करेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, जी वस्तुस्थिती होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांना मान्य नसेल कसे करणार? आता मी सांगतो.

**शरद पाटील :-**

आम्ही पगार द्यायला सांगत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**एस. ए. खान :-**

पुढच्या सभेत माहिती द्या का देत नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे पहा आपल्याकडे पथकर ऑक्टोंबर महिन्यापासून सुरु केलेले आहे. ऑक्टोंबर महिन्यामध्ये आपल्याकडे ४ लाख ६९ हजार ९८६ रु. जमा झालेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब कसले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एस्कॉटचे.

**मिलन म्हात्रे :-**

ऑक्टोंबर २००७?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

२००७.

**मिलन म्हात्रे :-**

किती रुपये?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

४ लाख ६९हजार ९८६ रु. नोंव्हेंबर २००७...

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे वसूल झाले? ह्याच महिन्यात पगारापोटी किती गेले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पगारापोटी दिड लाख रु. आपले जे अस्थायी परमंन्टंट कर्मचारी आहेत. त्यांचे तर आपल्या पगाराच्या हेडमधून होतात. ते एस्कॉट असले का...

**मिलन म्हात्रे :-**

ऐकून घ्या. माझ्या माहितीनुसार पथकाराला जो आपण चेन्याला जो नाका लावला आहे. तिकडे खर्च किती आहे? चेन्याला एक नाका लावला आहे. तुमचे तिकडे ३ शिफ्टमध्ये ६ कर्मचारी लागतात. २,२,२ त्यांचा पगार किती झाला? ६ हजार रु. पकडा. ६X६=३६. ३६ हजार रु. महिन्याला आणि दिवसाला इन्कम किती आहे माहित आहे का? १००रु., २००रु.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नाही. दिवसाला २०-२० हजार रु. चे इन्कम

**मिलन म्हात्रे :-**

मी सांगतो. गोराईचा नाका बंद करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

२०-२० हजार रु. ही बाब...

**मिलन म्हात्रे :-**

साहेब मी गोराईच्या नाक्याची गोष्ट करतोय, तिकडून एकही ट्रक येत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्याबाबत हा ठेका ठेकापद्धतीने देण्याचा विषय आम्ही प्रस्तावित केलेला आहे. आणि मा. आयुक्त साहेबांकडे तो सबमिट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेबांचे पद पण बी.ओ.टी. ला दिले पाहिजे. महापालिकेचे अती नुकसान होते. बोली लागलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही पुढच्या सभेला एस्कॉटसुद्धा ठेका देण्याचा तो विषय आणू. तत्पूर्वी त्यांचे जे पगार द्यायचे आहे त्याला आपण मान्यता देणं अपेक्षित आहे. नाहीतर मला ते कामकाज बंद करावे लागेल.

**मा. सभापती सो. :-**

श्री. खतगांवकर साहेब आपल्याला दिड लाख रु. पगार चुकवायचा आहे. तर ४ महिन्याचे दिड लाखप्रमाणे सहा लाख रु. झाले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आणि त्याच्याशिवाय अग्निशमनमध्ये २७ आहेत?

**मा. सभापती सो. :-**

बाकी आहेत ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पण ते ठेवले आहेत.

**मा. सभापती साो. :-**

ते राहू द्या. तुम्हांला ६ लाख रु. पाहिजे तर मी ६ लाख रु. देउन टाकतो ना. उद्यापासून बंद करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

चालेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब ज्यावेळेला आर्थिक नुकसान होईल त्याला जबाबदार कोण?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

समिती ठरवते त्याला आम्ही काय करणार?

**मा. सभापती साो. :-**

मला प्रॉफीट कुठे ते दाखवा ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रॉफिट आहे ना. बघा पेपरवर आहे ना.

**मा. सभापती साो. :-**

आता हे सांगतात ना. पेपरवरुन सांगतात. ४० हजार रु. आले, २० हजार रु., आले. मग आजच्या दिवसाचे, आजच्या तारखेचे... मी त्यांना घेउन जातो. किती कलेक्शन होतो. तुम्हांला माहिती काढून देतो. हे मान्य आहे? ४ जण...

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब मान्य आहे. पण ते उपायुक्त आहेत ते कशाला खोटं बोलतील?

**मा. सभापती साो. :-**

मी तसे बोलत नाही. ही हेड कशाकशात वापरली जाते. मी दिड लाख रु. पगार द्यायला तयार आहे. असे बोललो ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे, तुम्हांला पुन्हा निर्णय ते मंजूर करायला लागेल.

**मा. सभापती साो. :-**

मग ते ६ लाख रु. ४ महिन्यासाठी देतो ना. आज हे एवढे लॉस मध्ये चालले आहे हे मला माहितीपूर्ण आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब लॉसमध्ये नाही.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब ते किती प्रॉफिट झाले आहे ते जरा एकदा वाचून दाखवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

नोव्हेंबर २००७ मध्ये १० लाख १० हजार ६१५ रु.

**प्रशांत पालांडे :-**

काय कलेक्शन का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

होय, डिसेंबर २००७ मध्ये ८ लाख ८४ हजार २८५ रु. जानेवारी २००८ मध्ये ७ लाख ८६हजार रु. असे एकूण ४ महिन्यामध्ये ३१ लाख ५० हजार ८८६ रु.

**प्रशांत पालांडे :-**

कलेक्शनचे?

**मिलन म्हात्रे :-**

मला एक सांगा. ३१ महिन्यामध्ये तुम्ही वन साईड सांगता. ठेका पद्धतीचे अमाउंट सांगा आणि आपले जे कर्मचारी काम करत होते. त्यांचा पगार, साहेब तो आस्थापनाचा खर्च झाला. मग, आस्थापनाला कायम असू दे. अकायम असू दे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण ती बाब विचारात घेउन त्यावर जो आपला जास्तीचा कर्मचारी एगेंज होतो ते आणि त्याच्या कार्यक्षमतेने उत्पन्न वाढवण्यासाठी हा एस्कॉर्ट पर्यावदीत तत्वावर ४ महिन्यासाठी ठेक्याला घेण्याचा आणि प्रस्ताव केलेला आहे. आणि त्यामध्ये आपण दिड कोटी रु.ची रक्कम अपेक्षित केलेली आहे. ४ महिन्यासाठी जी इकडे आपल्या ३१ लाख रु. झालेली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब इथे सगळा खर्च किती आहे?

**मिलन म्हात्रे :-**

आपण हे जे आता पथकर घेतो ना. त्याच्या गाडया रस्त्यात उभ्या राहतात. हायवेला मोठेमोठे सगळे डोझर वगैरे मा. महापौर साहेबांना मी विचारले की ह्या ज्या गाडया उभ्या राहतात त्यांना पार्किंगला कुठची जागा आहे? कारण साहेब तुम्ही हायवेला तीन लाईन थांबवू शकत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

डायरेक्ट लाईन वर नाही. शेवटच्या लाईनला आपण सगळं कामकाज करतो.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तुम्ही काय सांगता. तुम्ही दररोज त्या रस्त्याने जाता येतात. साहेब हॉटेल सुरेखाच्या इकडे हायवेला तुमचा नाका आहे. तिकडेच गाड्या अडवतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

आपल्या स्वतःची जागा नसल्यामुळे नॅशनल हायवेला कन्सेट करून रहदारीला अडथळा न होता आपण शेवटच्या ट्रकला हे कामकाज करतो.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यामध्ये मा. महापौर साहेबांनी मला असे सांगितले की आपण बी.ओ.टी. ला दिले की तो माणूस काय आहे ते बघेल. असे झुलते मनोरे ठेवू नका.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब माझी चर्चा झाली. ह्याच्यावरती आम्हांला चर्चेला बोलवले होते असे काय करता? मी स्पष्ट त्यांना त्यावरती कंम्प्लेंट केली. ते बोलले आपण बी.ओ.टी. ला दिले ना. तो त्याचे काय ते बघेल. असे कसे? तुम्ही इन्फ्रास्ट्रक्चर बघा. आता जो ऑक्ट्रॉयचा नाका दिलात. त्याचे किती नाके आहेत. एकूण २८, २३ जे काही नाके आहेत. ते नाके तुमची जी काही ती जागा. हे सगळे तुम्ही त्याला इन्फ्रास्ट्रक्चर दिले. त्याच्यानंतर तुम्ही व्यवहाराला बसलात ना. म्हणजे, तुम्ही ह्याचे पहिले नॉर्म्स बनवलेत का? किंवा अमुक अमुक नाके आहेत. तिकडे पार्किंग १० गाड्यांचे, ४ गाडयांचे, २ गाडयांचे आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

तुम्हांला वस्तुस्थिती समोर आणतो की, आपल्या महापालिकेच्या मालकीची एकही जागा नाही. आम्ही बांधकाम विभागाला, नगररचना विभागाला पत्रसुद्धा दिलेले आहे. किमान आम्हांला भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन द्यावी पण त्याला कोणता रिसपॉन्स भेटत नाही. आणि आपली मालकीची जागा नसल्यामुळे आणि ते कायद्यामध्ये तरतुद असल्यामुळे उत्पन्न घेण्याचे नाहीतर आपल्या महापालिकेचे नुकसान होईल आणि इतर महापालिकेचे सुद्धा नाके पण नॅशनल हायवेवरच आहेत. स्वतःच्या मालकीच्या जागेत फार तुरळक आहेत. ट्रॅफिकला व्यत्यय न येता जर आपण ही वसूली केली तर यामध्ये आपल्याला उत्पन्न मिळू शकते. साधारणतः याच्यामध्ये वर्षाला...

**मिलन म्हात्रे :-**

साहेब माझा तुम्हांला सुझाव असा होता की साहेब आजची परिस्थिती अशी आहे की लोक ते ट्रॉर्च घेउन रस्त्यात उभे राहतात. आणि ते गाड्या जोरात सुसाट वेगाने मोठे मोठे ड्रेंजर असतात ते थांबू शकत नाही. कारण ३५-३५ टनाचा वजन आहे आता ते उभे असतात. एकतर त्यांना ट्रक उडवून जाणार. त्यामुळे कर्मचारी लांब कुठेतरी उभे असतात मी रात्री जातो आणि त्याच्यामध्ये तुमची एकही गाडी थांबली जात नाही. जेव्हा ५० गाडया पास होतात तेव्हा एक गाडी थांबते. कुठची खाली वगैरे असेल तर ती थांबवतात. तो जो नाका थांबते. तो जर तुम्ही टोल टॅक्सकडे नेलात तर गाडयाची रहदारीसुद्धा कमी होते. टोल टॅक्सला जी माणसे उभी राहतात तिकडेच तुम्ही जर दिले की आमची ही अशी पावती किती? टोलचे २०, २५ रु. ५० रु. झाले. आमचे किती असतील १०, २० रु. तर त्याच्याबरोबर तुम्ही जर एकत्ररित्या घेतलीत तर तिकडे पण तुम्हांला आरामशीर ४, ६ पथकर मिळतात. परत तिकडे किती आहे? तुम्हांला तीन खिडक्यांना तीन माणसे लावायला लागणार आहेत? आज तुमची ६ माणसे एका शिफ्टला त्या नाक्यावरती बसून असतात. साहेब आमचा हा सुझाव आहे. विरोध नाही. आता बघा, ट्रफिक तिकडे थांबणार, ॲक्सीडेंट होणार त्यापेक्षा टोलला गाड्या थांबतातच ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

आपण आय.आर.बी. ला कन्सेन्ट करणार.

**मिलन म्हात्रे :-**

आणि तुमची माणसे त्यांच्या पावती फाडून तुमची माणसे वसूली करतील म्हणजे वाहन इंधनाची बचत, वायुप्रदूषण नाही. म्हणजे तिकडे तसे बघायला गेले तर भरपूर त्रास असतो आणि तिकडे तर भयानक ॲक्सिडेंट असतात. आता काजू पाड्याला तो कन्टेनर पलटी झालेला आहे. १० दिवस झाले. त्याला अजून काढलेला नाही. एक गॅस सिलेंडरची अख्खी गाडी पलटी झाली. साहेब त्या रस्त्यावरती भरपूर ट्रफिक आहे. आपली माणसे उभी राहून माणसे उडवून खल्लास करुन टाकतील. रात्री उभे राहतात. कधी कळत नाही. कधी विदाउट ड्रेस उभे राहतात.

त्यांच्या हातात काही नाही. फक्त एक रेड सिग्नल आहे. बॉम्बेला तर अख्खे सिग्नल उडवून गाडया निघून जातात तुमच्या त्या एका सिग्नलला कोण विचारते. स्पीड ब्रेकर काही नाही. कसले इन्फॉर्मेशन नाही. आता बघा. आपण टोलचे जर पुणे एक्सप्रेस हायवेला गेलात तर ४ कि.मी. अगोदर बोर्ड लागलेले आहेत. रेडियमचे व्यवस्थित की पुढे अमुक अमुक चौकी आहेत. तिकडे एवढे एवढे पैसे तुम्हांला द्यायचे आहेत. दर दिलेले आहेत. आपले काहीही इन्फ्रास्ट्रक्चर नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण जर हे इन्फ्रास्ट्रक्चर तयार करुन दिले तर आपल्याला वर्षाला ५,६ कोटी रु. म्हणजे ५,६ च्यावर रक्कम जमा होउ शकते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब दुकान साफ सुत्र करुन चालवायला लागते ना नाहीतर...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपल्या मालकीच्या जागा नाहीत. आम्ही प्रयत्न केले तरी जागा उपलब्ध होउ शकल्या नाहीत.

**मा. सभापती :-**

प्रॉफीट किती झाले? श्री. बेलवटे साहेब किती आपल्याला प्रॉफीट झाले ते सांगा.

**प्रशांत पालांडे :-**

३१ लाख रु. समोर आपला खर्च किती आहे?

**मा. सभापती साो. :-**

४ वर्षापूर्वी ह्यांनी कमावले होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नाही. ४ महिन्यासाठी.

**मा. सभापती साो. :-**

४ वर्षासाठी हे प्रकरण चालू आहे. हेड कुठे आहे? हेडच नाही ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हेड कसे इन्कम आहे.

**मा. सभापती साो. :-**

४ महिन्याचे हेड दिलेले नाही. हा पैसा कुठल्या ह्याच्यात जमा झालेला आहे. हेड आहे ना. हे सांगतात नाही. चार महिने झाले आपले चालू केले आहे ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

जास्तीचे जे होमगार्ड घेतले आहे ना.

**मा. सभापती साो. :-**

होमगार्डचे सोडा. मी हा विषय सांगतोय. पथकराचे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

हेड आहे ना. पथकरात जमा होतात ना.

**मा. सभापती साो. :-**

किती जमा झाले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

४ महिने झाले आपण हे सुरु केले.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब ३१ लाख रु. बोलले ना.

**शरद बेलवटे (लेखाधिकारी) :-**

गेली ३-४ वर्षे झाली आपण पथकर चालू करू म्हणून त्या लेखाशिर्षाखाली ४-५ कोटी अपेक्षित करून त्या प्रकारची काम निघतात. परंतु त्या प्रमाणात काय होत नाही. नंतर पुन्हा शाळा व भाडे ते पण ४-५ कोटी आपण पकडतो पण एकही पैसा आलेला नाही. त्यातल्या त्यात आता निदान ...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण प्रयत्न करतोय.

**प्रशांत पालांडे :-**

ठिक आहे. ३१ लाख रु. जमा झाले आहेत. खर्च किती होईल विचारतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

टोटल १५ लाख रु.पर्यंत खर्च होतो. ५० टक्के.

**प्रशांत पालांडे :-**

५० टक्के मग चांगले आहे काय वाईट आहे? कोण बोलतो लॉस होतो म्हणून.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

म्हणजे स्थायी आणि डेलिवेजर्स चे पगार धरले ना. तर साधारणतः ३ लाख रु. महिना जाते.

**एस. ए. खान :-**

लेखी माहिती द्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

नाही. पण आपले पत्रव्यवहार पोहोचत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. खतगांवकर साहेब हे ४ महिन्याचे ३१ लाख रु. कलेक्शन आहे ना. मग हे ४-५ कोटी रु. कसे काय होउ शकेल?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

साहेब आपण हे पथकर वसूल करताना मा. महासभेत जे हे बजेट मंजूर झाले. बजेटला जी अपेक्षित तरतुद ठेवली होती. इतर महापालिकेचा अभ्यास करुन तर ती रक्कम ठेवलेली आहे. तर त्याप्रमाणे वसुल करण्यासाठी आपल्याला हा एक सन्मा. सदस्य बोलल्याप्रमाणे आपल्याला इन्फ्रास्ट्रक्चर तयार करावा लागतो. तो आपल्याकडे नसल्यामुळे ते उत्पन्न होत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

कारण अव्हरेज प्रमाणे ८ लाख रु. मन्थली आहे. म्हणजे साधारणपणे १ कोटी रु. वर्षाला होउ शकते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

नाही. वर्षाला ३ कोटी रु. होउ शकतात.

**मिलन म्हात्रे :-**

गणित कच्चं आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब आपण गोराईला जो नाका ठेवला आहे. त्याच्यामध्ये इन्कम नाही. त्यामुळे आपण तो बंद करावा. आणि त्याच्यात आणखी एक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कुठचा?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

गोराई.

**मिलन म्हात्रे :-**

गोराईचा एक आहे. तसे भरपूर आहे. त्यादिवशी मी गेलो. तीन माणसे आहे. म्हणजे २, २ ,२ असे ६ माणसे तिकडे कामाला आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तुम्ही डिवीजन करा. जे नाके लॉसमध्ये जातात. त्याची काही गरज नाही. ते बंद करा. आणि साहेब ते आय.आर.बी. चे सांगितले ना. ते आय.आर.बी. वाया जवळ  नाका आहे. टोल प्लाझा ते ठाण्याच्या हद्दीमध्ये सॅन्क्शन झाला होता. तो त्याठिकाणी हलवला आणि इकडे आणून शिफ्ट केला. साहेब समजा जर त्या लोकांनी आपले प्रपोजल रिजेक्ट केले. तुम्ही सांगितलेले प्रपोजल रिजेक्ट केले तर काय होणार की, आम्ही तुम्हांला परमिशन मिरा भाईंदर हद्दीमध्ये दिलीच नाही. आम्ही ते कॅन्सल करु. तुम्ही टोल प्लाझा हलवा. ते थोडे टेंशन मध्ये येतील. आणि ते आपल्याला अलाव्ह करतील.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब आणि दहिसर चेकनाक्यावरून जेव्हा व्हेईकल येतात ना. त्या गाडया परत तुमच्या पेणकर पाडयाला उभ्या करतात. तिकडे सुद्धा ॲक्सिडेंट होण्याची शक्यता आहे. पेणकर पाडयाला लावलेले एक स्टॉल. साहेब जर तुम्ही वरच्या टोलवाल्याशी आपण जर सहकार्य केले किंवा आपण त्यांच्याकडून परवानगी मागितली तर ते सुद्धा आपल्या भाईंदरमधून पास ऑन होणाऱ्या ट्रकचे कलेक्शन जास्त येईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

गाडयाचे?

**मिलन म्हात्रे :-**

होय. त्या गाड्या कुठे लावतात माहित आहे का? आपल्या पेणकर पाडयात ते हॉटेल आहे ना. त्याच्यापुढेच मेन रोडला आपला तिकडे एक नाका आहे. म्हणजे तिकडून सुटल्यावरती त्या ट्रॅफिकमधून गाडी सुटली की त्या मोसंब्या येतात आणि तिकडे त्या अडवल्या जातात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. खतगांवकर साहेब जरा प्रत्येकाची माहिती देत जा. आम्ही विचारल्यानंतर देत नाही. असा वेळ फुकटचा जातो. ह्याच्यात फुकटचे दोन तास गेले. एवढी रक्कम आली आहे. ते तुम्ही डिटेल द्या का देत नाही? प्रत्येक विषयावर सांगायला लागते की डिटेल द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कोणीही सदस्य ठराव मांडायला तयार होत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

ठराव मांडा.

**एस. ए. खान :-**

पुढच्या सभेत काय आहे ते डिटेल द्या.

**मा. सभापती साो. :-**

पुढच्या सभेत गोषवाऱ्यासहित माहिती देउन...

**प्रशांत पालांडे :-**

पण ते साहेब म्हणतात बंद होईल ना.

**मिलन म्हात्रे :-**

बंद होणार नाही.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब म्हणत आहेत ना, बंद होईल. त्यांना काय अडचण माहिती असेल ना?

**एस. ए. खान :-**

आता आपले करोडो रु. चे टॅक्सेशन बंद आहेत. अजून वसूल करत नाही. एक आठवडा पैसे दिल्यावर बंद होउन जाईल का? करोडो रु. चे टॅक्स बाकी आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब त्यांना पेमेंट द्यायला अधिकार नाही. तोपर्यंत त्या हेडमध्ये शिल्लक होत नसेल तर ते पगार देउ शकत नाही.

**एस. ए. खान :-**

टॅक्सचे किती बाकी आहे? का वसूल करत नाही?

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब तुम्ही व्यवस्थित रुलिंग द्या.

**मा. सभापती साो. :-**

पुढच्या सभेत सर्व विषयाचे मिसळ करुन देउ नये. आपल्याला संपूर्ण माहितीसह होमगार्डसाठी किती पाहिजे, तुम्हांला ह्याच्यासाठी किती पाहिजे. ते सर्व डिटेलने गोषवारासहित माहिती पाहिजे. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४६ :-**

पुर्नविनियोजन करणेबाबत. (आस्थापना विभाग) आस्थापना विभागातील सामान्य प्रशासन व अग्निशमन अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षात पुर्नविनियोजनाद्वारे निधी वर्ग करणेस मंजुरी मिळणेबाबत.

(सदरचा विषय मा. सभापती साो. यांच्या आदेशानुसार तहकुब करण्यात आला.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४७ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४७, विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब हा गोषवारा कोणी काढला? हा गोषवारा बरोबर आहे की चुकीचा आहे?

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

गोषवारा कार्यकारी अभियंत्याची सही ने दिलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सिग्नेचर बरोबर आहे.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

त्याच्यामध्ये वर्डीग चे थोडेसे झालेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

काय झालेले नाही?

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

म्हणजे आमदार निधीतून हॉस्पिटल बांधणे असे आहे. त्याच्यामध्ये सर्व आमदार निधी आहे. प्लस मनपा निधी आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तसे ते लिहा ना.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब आणि डिटेल नाही. भिंतीची साईज, लांबी, रुंदी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब हॉस्पिटलचे जेव्हा तुम्ही डिझाईन बनवले. तुम्ही हॉस्पिटलच्या इमारतीचे कॉस्टिंग काढलंत त्याच्यावरती वॉल कंपाउन्ड का घेतली नव्हती कारण प्रत्येक बिल्डिंगच्या एक्सटेंन्डमध्ये वॉल कंपाउंन्ड असतेच.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

पहिले आपण वॉल कंपाउंड घेतली नव्हती. म्हणून आता....

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ही कोणाची चूक आहे? ज्यावेळी आपल्या महापालिकेचे स्ट्रक्चर तयार केले होते. त्यावेळी ते तुम्ही हे कसे केले होते?

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

पूर्वी त्याचा त्यामध्ये समावेश नव्हता. म्हणून आपण आता सभेत प्रस्तावित ठेवलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्हांला कसे माहित पडेल तो प्रस्ताव होता म्हणून

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

आपल्याला कागदपत्र पाहायला मिळतील ना. हे अंदाजपत्रक पहायला मिळेल.

**शरद पाटील :-**

हे कंपाउंन्ड वॉल किती साईड ना बांधायची आहे? कंपाउंन्ड वॉलला किती साईड आहे?

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

कंपाउंन्ड वॉल ३-४ साईडला बांधायची आहे. एका साईडला बिल्डिंग आहे. तिथे पण आपली कंपाउंन्ड वॉल उभा करायची आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब आमचे असे म्हणणे आहे. हॉस्पिटलची भिंत वगैरे बांधण्याच्या अगोदर आतमध्ये सुविधा झाल्या पाहिजे की नाही फक्त इमारत उभी आहे. त्याच्या आतमध्ये इन्स्ट्रूमेंट नाही, कर्मचाऱ्यांनी भिंतच कशाला बांधत बसायचं.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

साहेब कुठल्याही पालिकेची वास्तू असेल तर कंपाउंन्ड वॉल...

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब ह्यामध्ये जी टिपण्णी दिलेली आहे. कामासाठी जागेचे मोजमाप घेउन. जर तुम्ही मोजमाप घेतलेले आहे. तुम्ही १७ रु. लाख ची अंदाजे रक्कम खर्च मग ती आम्हांला का दिले नाही? की ४ माळ्याची भिंत आहे, ३ X ३ ची भिंत बांधायची आहे. ९ इंचाची भिंत बांधायची आहे. त्याला प्लॅस्टर येणार आहे. त्याला जाळी येणार आहे. त्याला हे येणार आहे. का देत नाही? आणि सर्वांत महत्त्वाचे त्यावेळी भिंतीचा त्यावेळी बिल्डिंग बांधण्यामध्ये घेतले नाही आणि हे घेण्याचे लक्षात आले का? आज तुम्ही ४५ लाख रु.ची रक्कम दाखवली आहे. ही टी.डी.आर. होउन त्याच्यातली रक्कम आहे का शिल्लक आहे? त्यावेळी उपकरण खरेदी करण्यासाठी......

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

आरक्षित जागेवर माती भराव करुन भिंत कुंपण बांधणे हा वेगळा हेड आहे. आणि त्या हेडमध्ये हे शिल्लक आहे. आरक्षित जागेवर जे रिझर्व्हेशन आहे. त्याचे आपण कंपाउंन्ड वॉल आणि माती भरण्यासाठी पैसे त्या हेडमधून आपण हे काम करतो. हे रिझर्व्हेशन...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बरोबर आहे ना? म्हणजे ह्या कुंपण भिंत बांधण्याच्या हेडमधून आपल्याकडे पैसे शिल्लक आहे. बरोबर आहे. या आरक्षणचे एकूण क्षेत्र किती आणि किती पैसे आलेत ते सांगा.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

आपल्याकडे आरक्षित जागेवर माती भराव करुन कुंपण भिंत बांधणे ह्या २००७-०८ ह्या आर्थिक वर्षामध्ये एकूण हा खर्च वगळता आपल्याकडे ४९ लाख रु. शिल्लक आहे. ह्या तरतुदीतून आपण हे काम करतेय.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही. परत बघा. मिस करु नका. तुम्ही हे पैसे एकतर बजेटखाली ठेवलेले आहे. बरोबर आहे?

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

बरोबर आहे. हे आरक्षण आपण डेव्हलप करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

किंवा हा जो आरक्षण आहे. हे आरक्षण आपण डेव्हलप करतोय ना. तर हे तुम्ही जे दाखवले आहे. मग तुम्हांला हा पैसा तिकडे शिफ्ट करता आला नव्हता का?

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

कुठे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उपकरणामध्ये...

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

साहेब हा विषय माझा नाही. उपकरणाचा विषय माझा नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हॉस्पिटलसाठी कुठली आर्थिक बाब शिल्लक नाही?

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

मला वाटते, ह्यामध्ये लेखाशिर्ष कोणता आहे हे नमुद करुन गोषवाऱ्यामध्ये दिलेले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब इथे डिटेल दिलेले नाही. मोजमाप वगैरे काय...

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

ह्याचे कारण काय की नगरपालिका झाल्यापासून आतापर्यंतचा विविध विकासकामांचा आर्थिक प्रशासकीय मंजूरीमध्ये आपण म्हणजे पहिल्यापासूनचे जे आहे की आपण कामाचे नाव त्याचे अंदाजे किंमत देतो. आपल्याला जर सविस्तर अंदाजपत्रक पहायचे असेल तर डिपार्टमेंटला उपलब्ध होईल.

**प्रशांत पालांडे :-**

तुम्ही मोजमाप म्हणतात ना...

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

नाही आपण म्हणजे तो नोटींगमध्ये असते ना.

**एस. ए. खान :-**

विकासकामांना प्रशासकीय...

**नयना म्हात्रे :-**

साहेब एक मिनिट आम्हांला जरा बोलू द्या. पक्की घाई सुटली आहे. साहेब ह्या आता भिंत बांधण्याच्या...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एकतर भिंतीची साईज, माप काय? आणि एका बाजूला चांगली भिंत आहे. त्या सोसायटीची. त्यालाच लागून आपण भिंत बांधणार? खर्च कशाला करायचा? मी बघून आलो. एकदम चांगली भिंत आहे.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

एका साईडला बिल्डिंग आहे. त्याच्या बाजूला हॉस्पिटल आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एका बाजूला रोड आहे.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

एक नाही. तिन्ही बाजूला रस्ताच आहे. एक मेन रोड आहे. पुढील बाजूला आहे. आतल्या बाजूला रस्ते आहे. मागच्या बाजूला बिल्डिंग आहे. मी पण बघून आलोच.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग तुम्ही कशाला? ऑलरेडी भिंत आहे.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

हे पहा, आपण काय करतो. हे अंदाजपत्रक आहे. ॲक्च्युअली काम होतं त्याप्रमाणे पेमेंन्ट करतो. म्हणजे त्याठिकाणी गरज नसेल तर...

**नयना म्हात्रे :-**

साहेब ते जर कंपाउंड चांगले असेल तर मग नवीन कशाला पाहिजे? बनवायला.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

आपण बनवत नाही.

**एस. ए.खान :-**

ते कंपाउंड एक साईड आहे.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

एक मागच्या बाजूला बिल्डिंगच्या कंपाउंड वॉल आहे. त्यांचे म्हणणे काय जर गरज नसेल तर ठिक आहे. पण राहिले तर पूर्ण करावं लागेल ना.

**नयना म्हात्रे :-**

साहेब तिकडे कंपाउंड वॉल करायचा आहे. हा जो विषय इकडे आला आहे. साहेब आमच्या मुर्ध्याला आज त्या ब्रिजवर ॲक्सिडेंट होतात. लोक मरतात. तुम्हांला ते सुचत नाही का? की तो नविन ब्रिज बनवावा म्हणून कंपाउंड विषय कसे बरोबर तुम्ही आणता? साहेब आमचे गेल्या दोन वर्षापासून जास्त पत्रव्यवहार आहे. तो विषय तुम्ही कधी आणत नाही. मग जास्त ह्या कंपाउंडचा विषय कसा बरोबर आला? मिरारोडचा आहे म्हणून का? आमच्या तिकडची त्या भागातली लोक टॅक्स भरत नाही का? त्या लोकांना मरायसाठी तुम्ही तो छोटा पूल ठेवला आहे का? साहेब मी तुम्हांला सांगते. आता जर तुम्ही सहा महिन्यामध्ये नवीन पूल बनवला नाही ना. त्या पुलाला खड्डे पडले आहेत. जरा जाउन बघून या. साहेब तुम्ही जरा बघून या. तुम्हांला त्या भिंती एवढ्या महत्त्वाच्या वाटतात. मग आमच्या भागामधले पूल सगळी लोक तिकडून जातात. कोणाला शेठला भेटायचचं, कोणाला मा. आयुक्त साहेबांना भेटायंचच तुम्ही त्या पुलावरुनच जातात ना? की तिकडे विमानाने जातात? तो तुम्हांला महत्त्वाचे वाटत नाही का? तुम्ही मला माझे उत्तर द्या.

**एस. ए. खान :-**

जो विषय महत्वाचा आहे तो तुम्ही घ्या.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

मॅडम, आपण ब्रिज संदर्भात जो प्रश्न उपस्थित केला आणि आज आपण कंपाउन्ड वॉलचे का घेतले? ज्या ज्या बजेट हेडखाली तरतुद शिल्लक असते. ते काम आपण प्रस्तावित करतो. बजेट मध्ये प्रस्तावित नसेल ते काम आपण प्रस्तावित करीत नाही. आपण जो उल्लेख केला. त्या कामाचे २००७-०८ च्या हेडमध्ये बजेटमध्ये तरतुद नसल्यामुळे ते काम प्रस्तावित केलेले नाही. बजेटमध्ये तरतुद उपलब्ध होताच ते मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केला जाईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब, पुर्नविनियोजन करू ना.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

पण पुर्नविनियोजनाला निधी पाहिजे ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा निधी फिरवू ना.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

हा निधी आपल्याला कसा फिरवता येईल? मॅडम आरक्षित जागेचे जे आहे. हा निधी फिरवता येणार नाही ना.

**नयना म्हात्रे :-**

हा निधी का फिरवू शकत नाही? कारण मिरा रोडचे काम आहे. ते पहिले काम झाले पाहिजे म्हणून त्या भिंतीमुळे कोण तिकडे आजारी पडले आहे का? तुम्ही त्या पुढच्या बजेटमध्ये करा ना.

**एस. ए. खान :-**

पण ऑलरेडी तरतुद आहे ना. तुमच्या विषयावर काय तरतुद करायची आहे ते आपण करू.

**नयना म्हात्रे :-**

तुमच्या या विषयावर माझा विरोध आहे. तुमची ही नाटक बंद करा. पटापट ठराव वाचा. माझा विरोध आहे असे लिहा.

**एस. ए. खान :-**

ठिक आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य खान साहेब, एक मिनिट, पहला आपने इधर लिखा की मोजमाप किया....

**नयना म्हात्रे :-**

त्या पुलावर किती वर्षे झाली साहेब पहिल ५० मिनिटांनी एक गाडी जायची आता १ मिनिटाला ५० गाड्या जातात. त्याचा थोडा तरी पहिले विचार करा ना.

**तुळशीदास म्हात्रे :-**

पण तुम्ही मागच्या टाईमला बजेटमध्ये तुम्ही द्यायला पाहिजे ना.

**नयना म्हात्रे :-**

आम्ही दिले होते. तुम्ही मा. स्टॅंडींगमध्ये होता ना? मग तुम्ही पास करून घ्यायचे नाही का?

**तुळशीदास म्हात्रे :-**

मी स्वतः तो विषय आणला होता.

**नयना म्हात्रे :-**

मग तुम्ही सभापती असताना का पास केला नाही? तुम्ही सभापती होतात त्यावेळी मग का पास केला नाही?

**तुळशीदास म्हात्रे :-**

तेव्हा आपल्या ताब्यात नव्हते.

**नयना म्हात्रे :-**

तेव्हा तुम्हाला वाटले नाही, मी फक्त स्थायी समितीचा सभापती नसून ह्या मिरा भाईंदर चा सभापती आहे म्हणून.

**तुळशीदास म्हात्रे :-**

पहिले आपल्याला शासनाने ताब्यात दिले नव्हते.

(सन्मा. सदस्य श्री. प्रशांत पालांडे यांनी प्रकरण क्र. ४७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**प्रशांत पालांडे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरा रोड येथे महानगरपालिका व आमदारांच्या निधितून हॉस्पीटल बांधण्याचे काम सुरू आहे. सदरचे काम पुर्ण होत आले असुन सदर ठिकाणी सुरक्षितेच्या दृष्टीने इमारतीभोवती कुंपणभिंत बांधणे आहे. त्या कामासाठी प्रकरण क्र. ४७ मध्ये अंदाजित खर्च रू. १७,४३,७२१/- अपेक्षित केलेले आहे. आरक्षित जागेवर माती भराव करून कुंपणभिंत बांधणे या लेखाशिर्षाखाली रू. ४९,१६,७०४/- इतकी तरतुद उपलब्ध आहे, अशी दाखविलेली आहे. प्रशासनाने सदर ठिकाणी जागेचे मोजमाप दिले गेले पाहिजे. तरी सदरचा विषय परिपुर्ण नसल्याने नामंजुर करित आहे व स्थायी समिती सदस्या सौ. नयना म्हात्रे यांच्या सुचनेचा स्विकार करावा असा ठराव मांडत आहे.

**टेरी परेरा :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**नयना म्हात्रे :-**

हे पैसे आमच्या मुर्ध्याच्या पुलासाठी फिरवून टाका.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, बघा ते ठराव काय मांडत आहेत.

**मा. सभापती :-**

काय मांडला आहे?

**एस. ए. खान :-**

पुढच्या वेळेला मग आमच्या मिरारोड हॉस्पीटल कंपाउन्ड वॉल पुर्ण होणार नाही.

**मा. सभापती :-**

चर्चा मसलत करू.

**प्रशांत पालांडे :-**

तसेच स्थायी समितीच्या सन्मा. सदस्या नयना म्हात्रे यांचीही सुचना ह्या ठरावामध्ये ॲड करून घ्यावी.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही काय ठराव मांडत आहात? ह्या १७ लाख रू. मध्ये तुमचा पुल होणार आहे का?

**नयना म्हात्रे :-**

होईल. तुम्ही काम चालू करा. मार्च महिना येतच आहे. नविन बजेट येतेच.

(सन्मा. सदस्य ॲड. एस. ए. खान ह्यांनी प्रकरण क्र. ४७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरा रोड येथे महानगरपालिका व आमदार निधितून हॉस्पीटल बांधण्याचे काम सुरू आहे. सदरचे काम पुर्ण होत असुन सदर ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने इमारतीभोवती कुंपणभिंत बांधणे आहे. सदर कामासाठी जागेचे मोजमाप घेउन खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १. | मिरा रोड हॉस्पीटल करीता कुंपणभिंत बांधणे. | रू. १७,४३,७२१/- |

सदर कामासाठी ''आरक्षित जागेवर माती भराव करून कुंपणभिंत बांधणे'' या लेखाशिर्षाखाली रू. ४९,१६,०७४/- इतकी तरतुद उपलब्ध आहे. तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य एस. ए. खान साहेब, मोजमाप किती आहे? जरा ऐका, किती ब्रासचे काम आहे? किती लांबी रूंदी आहे. मोजमाप व्यवस्थित घ्या. आणि तुम्ही आणा ना. मोजमाप हा शब्द तुम्ही ठरावामध्ये कशाला टाकता? उद्या तुम्ही मोजमाप बोललात बरोबर आहे? तुम्ही कशाला घाई करता?

**शरद पाटील :-**

मोजमाप घेउन पुढच्या मिटींगला टाकावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**
पुढच्या वेळी बजेटची मिटींग आहे.
**ज्योत्स्ना हसनाळे :-**
मंजुरी देतो ना. पुढच्या मिटींगला आणा ना. मंजुरी देतो ना.
**नयना म्हात्रे :-**
आता तुम्ही ठराव वाचला ना तो पुढच्या मिटींगला पास करा. या विषयावर मतदान घ्या.
**ज्योत्स्ना हसनाळे :-**
तो पास करा. ठिक आहे. मतदान घ्या.
**मिलन म्हात्रे :-**
तुम्ही मोजमाप घेतलत ना तर मग त्यांचे मोजमाप मागा. लांबी, रूंदी आणि किती ब्रासचे काम आहे आणि ते काम कसले आहे? आर.सी.सी. आहे का दगड आहे? हा ठराव आहे. ते त्यांच्याकडे मागा. ते देतील ना. आणि ते त्याच्यावर रेकॉर्ड करा.
**एस. ए. खान :-**
चालेल.
**मिलन म्हात्रे :-**
ऐका. तुम्ही १० ब्रासचे द्याल आणि ते १०० ब्रास बांधतील मग? खान साहेब, तसे नसते आपण आता पुढचे जे विषय आहे त्याच्यामध्ये तुम्ही व्यवस्थित रितसर माहिती दिलेली आहे. साहेब, कुठल्याही स्ट्रक्चरला बांधकाम असते. बांधकाम असेल तर ब्रासमध्ये मोजले जाते. ह्याच्यात लांबी, रूंदी काही ड्रॉईंग पाहिजे.
**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**
आपण आजपर्यंत नगरपालिका झाल्यापासून आजच्या घटकेपर्यंत इस्टिमेटचे डिटेल कधीच उपलब्ध झाले नाही. कामाचे नाव असते. अंदाजपत्रक हे डिटेल सर्व फाईल पाहण्यासाठी असते आणि....
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
साहेब, ह्या पत्रात आमचे वैती साहेबांनी सांगितले फार खर्च व्हायला लागले आहे म्हणून हे मोजमाप वगैरे सगळे आले तर आम्हाला पण लक्षात येईल.
**मिलन म्हात्रे :-**
तुम्ही मोजमाप शब्द वापरता ना. ऐका मला इकडून चर्चगेटला जायचे आहे. किती किलोमिटरचा प्रवासावर तिकिट फाडले जाते. तुम्ही त्याच्यावर तिकिट फाडता ना. ऐकून घ्या. आम्हाला ह्याच्यावर काही विरोध करायचा नाही की मस्ती ही करायची नाही. पण तुमचा ठराव व्यवस्थित आला तर तुम्हीही सेफ ना. उद्या तुमच्याकडे समजा आम्ही एक तुमच्याकडे ठराविक ब्रासची एन.ओ.सी. दिली त्या कामाच्या व्यतिरिक्त थोडे काही चुकुन काही काम झाल. तरी रि ॲप्रोप्रिएशन किंवा पुढे त्याच्यावरती तुम्हाला बिलींग वगैरे करायला बरे पडेल. मेजरमेंट वर काहीतरी द्याना.
**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**
आपल्या ह्या मान्यतेपुढे कोण खर्चही करू शकत नाही. मान्यता....
**मिलन म्हात्रे :-**
तसे सांगत नाही. मोजमाप हा शब्द त्यांनी टाकला. त्याठिकाणी लांबी, रुंदी उंची हे आले पाहिजे. ते घाला ना ते तुम्ही द्या ना. आयटम काय आहे ते सांगा.
**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**
सोलिंग चे आयटम आहे. त्याच्यानंतर पीसीसी चे आयटम आहे.
**मिलन म्हात्रे :-**
साहेब, मला ते नाही पाहिजे. अगदी ढोबळ आहे. आपण रोडचे मेजरमेंट देतो ना. गृह हॉटेल पासून पोलिस स्टेशनपर्यंत एवढे एवढे क्षेत्रफळ आहे. साहेब तुम्ही काय सांगता? तुम्ही व्यवस्थित मला द्या. म्हणजे तो ठराव पास झाला पाहिजे. पुढच्या मिटींगमध्ये तरी झाला पाहिजे.
**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**
सदस्यांना प्लॅनची कॉपी देतो.
**मिलन म्हात्रे :-**
नाही. मेजरमेंट सांगा, तुम्ही जमिनी घेतलेत ना. खाली टॉप बॉटम उंची द्या ना. त्याच्यात तुमचे सगळे आयटम आलेत उंची आणि लांबी रूंदी विषय संपला.
**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**
सर्व सन्मा. सदस्यांना प्लॅनची कॉपी देतो. झेरॉक्स कॉपीकाढून देतो.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
तुम्ही इस्टीमेट आणले होते. तर साहेब द्यायला पाहिजे ना.
**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**
साहेब, आजपर्यंत कधीही दिलेले नाही. इस्टीमेटची कॉपी देण्याची प्रथा नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

यापुढे लक्षात ठेवा. आम्हाला लागेल.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आम्ही एकच शब्दात बोलतो. एकाच शब्दात काम होते. हजार शब्द बोलून दोन तास त्याच्यात घालवले. काय निघाले? काहीही निघाले नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अगर स्टँडींग मे इतने सारे बी.ओ.टी. के जगह पर अगर झोपडपट्टीवाला इंटरफेअर करे तो उसको जबाबदार कौन? मतलब आपने किया वह सही और दुसरेने किया वह गलत. हमने कोई गलत काम नही किया है। मिरा रोड के हॉस्पीटल मे वॉल कंपाउंड होना चाहिए आज भी हमारा यही नाईनटेंशन है हम लोग विरोध नही कर रहे है।

(सभागृहात गोंधळ)

**शानु गोहिल :-**

वोटींग होउ द्या.

(सन्मा. सदस्य एस. ए. खान यांनी प्रकरण क्र. ४७ च्या ठरावाचे वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरा रोड येथे महानगरपालिका व आमदार निधितून हॉस्पीटल बांधण्याचे काम सुरू आहे. सदरचे काम पुर्ण होत असुन सदर ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने इमारतीभोवती कुंपणभिंत बांधणे आहे. सदर कामासाठी जागेचे मोजमाप घेउन खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १. | मिरा रोड हॉस्पीटल करीता कुंपणभिंत बांधणे. | रू. १७,४३,७२१/- |

सदर कामासाठी ''आरक्षित जागेवर माती भराव करून कुंपणभिंत बांधणे'' या लेखाशिर्षाखाली रू. ४९,१६,०७४/- इतकी तरतुद उपलब्ध आहे. तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**शानु गोहिल :-**

मा. मुझफ्फर हुसैन साहेब का खुदका हॉस्पीटल था। तब बहुत सारे आमदार लोगोने उसके अंदर पैसा दिया। सबकी निधी जमा कर दी गई।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आज यह बात मालूम पडा क्या? जब मा. महासभा मे यंत्रसामुग्री खरेदी पर तब ध्यान मे नही आया। तभी आपको यह ध्यान मे नही आया। यंत्र सामुग्री खरेदी करने के टाईम पर दीवार बनना जरूरी है।

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४७ करता दोन ठराव झालेले आहेत. पहिला ठराव सुचक प्रशांत पालांडे, अनुमोदक टेरी परेरा. दुसरा ठराव आहे. सुचक एस.ए.खान आणि अनुमोदक तुळशीदास म्हात्रे. अनुक्रमांक दुसरा ठराव मी पहिला मतदानास टाकतोय. ठरावाचे वाचन करतोय. विकास कामाला प्रशासकिय आर्थिक मंजुरी देणे. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरा रोड येथे आमदार निधीतून हॉस्पीटल बांधण्याचे काम सुरू आहे. सदरचे काम पुर्ण होत.......

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एक मिनिट, गलत बात है सन्मा. सदस्या शानुजी अभी आप बोलिए इन्होने क्या पढा? आपने ऐसा बोला की सब आमदार का फंड लगा हुआ है। मनपा का फंड लगा हुआ है। बरोबर है? तभी इन्होने क्या ठराव मांडा। सिर्फ आमदार लोगो का पैसा।

(सभागृहात गोंधळ)

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

त्याच्यामध्ये महानगरपालिका फंड पाहिजे.

**प्रशांत पालांडे :-**

त्याच्यामध्ये महानगरपालिका शब्द पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

मी काय म्हणतोय याच्यामध्ये या कामाला किती आमदारांचे निधी आहेत. आणि अनेक आमदारांचे असतील तर असे लिहा अनेक आमदार मा. खासदार व महापालिका असे लिहा.

(सभागृहात गोंधळ)

